# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/ २०१६** **दिनांक ०७.०८.२०१६**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी ०२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४, (२००४, चा महा.१४) कलम ५, मधील पोटकलम (१) आणि त्यासोबत पोटकलम (२) अन्वये व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम-२०१३, मधील तरतूदीनुसारराज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाचे, दि.२८ जुलै, २०१६, रोजीचे अधिसूचनेनुसार, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती गठीत करणेत आलेली असून, जा.नं.एसएसएस/वशी-०४/२२१२/२०१६, दि. ३ ऑगष्ट, २०१६, रोजीचे पत्रान्वये या व्यवस्थापन समितीची पहिली विशेष सभा रविवार दि.०७.०८.२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दि.०७.०८.२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये सुरु करण्यात आले. परंतु, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अधिनियम-२००४ मधील कलम ११ (२) नुसार सभेस आवश्यक गणपूर्ती नसल्यामुळे सभा अर्धा तास तहकुब करण्यात येऊन, त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०२. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०३. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०४. मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ. अनिताताई विजयराव जगताप, सदस्या

मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली. त्यानंतर मा.कार्यकारी अधिकारी यांनी सर्व उपस्थित व्यवस्थापन समिती सदस्यांचे शॉल, श्रीफळ, श्री साईचरित्र ग्रंथ व बाबांची मुर्ती देऊन सत्कार केला व सर्वांनी आपापला परिचय करुन दिला.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे- अध्यक्ष, मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग- सदस्य यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे, सदस्या, मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी फॅक्स व मेल पत्राद्वारे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली. मा.अध्यक्ष महोदय अनुपस्थित असल्यामुळे अधिनियम-२००४ मधील कलम ११ (३) अन्वये व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली

**विषय नं.०१** **दिनांक १४.०७.२०१६ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४४६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

---

**विषय नं.०२** **दिनांक १५.०७.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेने केलेल्या शिफारशींना पुष्टी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

---

**विषय नं.०३** **दिनांक २७.०७.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेने केलेल्या शिफारशींना पुष्टी देणेबाबत.**

**निर्णय क्र.४४८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली

---

**विषय नं.०४** **व्दारकामाईतील शिळेवरील फोटोला सोन्याचा मुलामा देणेबाबत व चोपदार लाकडी दंडावर चांदीकाम करुन देणगी स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | ५ | संस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती घटित करणे | ४ | या अधिनियमाच्या इतर तरतूदींस अधीन राहून, ही समिती उपरोक्त नावाने ओळखला जाणारा एक निगम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा असेल आणि एक सामाईक मुद्रा असेल आणि तिला स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल, आणि तिच्या उक्त नावाने तिला किंवा तिच्यावर दावा करता येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(क) | मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन |
| | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-**

१. श्री साईबाबा ज्या शिळेवर बसत ती शिळा श्रींचे द्वारकामाई येथे बाहेरील सभामंडपामध्ये ठेवण्यात आलेली आहे. श्रींचे शिळेचे वरील बाजूस एक मोठ्या आकाराचा चांदीचा फोटो ठेवण्यात आलेला आहे

२. तसेच समाधी मंदिरामध्ये दैनंदिन श्रींचे आरतीचे वेळी व उत्सवाचे वेळी समाधी मंदिरामध्ये ड्युटीवरील चोपदार ललकारी देणेकामी चोपदार काठी हातात घेतात. सध्या असलेल्या या दोन काठ्या लाकडी असून त्यावर चांदीचा पत्रा बसविण्यात आलेला आहे.

**प्रस्ताव-**

१. श्री बी.विजयकुमार, रा.हैद्राबाद यांनी श्री शनि-महादेव- गणपती या तिनही मंदिराचे कळसाला तसेच लेंडीबागेतील नंदादीप या मंदिरास सोन्याचा वज्रलेप (मुलामा) देणगीदाखल दिलेला आहे. सदर मुलाम्याचे कामामधील काही मुलामा (पदार्थ) शिल्लक असल्याने श्रीद्वारकामाई येथील शिळेवरील फोटोस सदर सोन्याचा मुलामा ०२ लेयरमध्ये देण्याबाबत इच्छा प्रदर्शीत केली आहे. हे काम फोटोच्या डिझाईनला इजा न पोहोचविता केले जाईल असेही त्यांनी आपल्या अर्जामध्ये विनंती आहे त्याचप्रमाणे हा मुलामा कायमचा राहील असे म्हटले आहे

२. श्री.अजय सुभाष मोरे, उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांनी समाधी मंदिरामध्ये दैनंदिन वापरासाठी०२ नग सागवाणी चोपदार काठ्या चांदीकामासह देणगीदाखल देण्याबाबत इच्छा प्रदर्शीत केलेली आहे श्री.अजय सुभाष मोरे यांनी श्रीसाईबाबा संस्थानचे माजी कार्यकारी अधिकरी पद भुषविलेले आहे

**विभागाचे मत/ अभिप्राय-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ नुसार वरील नमूद तरतूदीस अनुसरुन मत्रिसदस्यीय समितीची मान्यता घेतल्यानंतर उपरोक्त देणगीदार १) श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद यांचेकडुन श्रींचे द्वारकामाईतील शिळेवरील फोटोस मुलामा लावुन घेता येईल तसेच सदर मुलाम्याचे मोजमाप करता येत नसल्याने त्याची देणगी पावती करता येणे शक्य नाही, असे नम्र मत आहे. त्याचप्रमाणे २) श्री.अजय सुभाष मोरे, उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांचेकडुन समाधी मंदिरातील चोपदारांकरवी ०२ नग नवीन सागवाणी काठ्या चांदीकामासह तयार करुन स्विकारणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे सोन्याचा मुलामा व सागवाणी चोपदार काठ्या चांदीकामासह देणगीदाखल स्विकारणेकामी मान्यता मिळावी, ही विनंती.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी श्रींचे समाधी भोवती व गाभाऱ्यातील खांबांना सोन्याचा मुलामा देण्यात आला होता परंतु तो सोन्याचा मुलामा निघून गेलेला आहे आता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.बी.विजयकुमार, हैद्राबाद हे श्रींचे द्वारकामाईतील शिळेवरील फोटोस सोन्याचा मुलामा देणगीदाखल देणार आहेत, त्यांची देणगी स्विकारणेत यावी. परंतु सदरहू मुलामादर्जेदार असावा, असे त्यांना कळविणेत यावे. तसेच श्री.अजय सुभाष मोरे, उपविभागीय अधिकारी, मालेगांव यांचेकडुन समाधी मंदिरातील चोपदारांसाठी ०२ नग नवीन सागवाणी काठ्या चांदीकामासह देणगी स्वरुपात स्विकारण्यात याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **श्रींचे समाधी मंदिराचे स्टेजवर एकादशीस कीर्तन करणेस परवानगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्रमांक | तततूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** एकादशीला अनन्य साधारण असे महत्व आहे. त्यामुळे पुर्वीपासुन प्रत्येक महिन्याचे शुद्ध व वद्य एकादशीस (भागवत) संस्थानमार्फत कीर्तन करण्याची प्रथा आहे. सध्या श्रींचे समाधी मंदिराचे समोरील स्टेजवर एकादशीचे कीर्तन कार्यक्रम होतो. मंदिर विभागाकडील गवई पुजारी या पदावरील कर्मचारी हे काम करतात.

**प्रस्ताव-** ह.भ.प.परशुराम अनर्थे महाराज, संत विचारधारा वारकरी शिक्षण संस्था, भोजडे यांनी दि.०२/०७/२०१६चा अर्जामध्ये समाधी मंदिरामध्ये होणा-या प्रत्येक महिन्याच्या एकादशीस येऊन कीर्तन सेवा करण्याबाबतची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. तसेच सदर सेवेपोटी त्यांना कुठलेही मानधन अथवा बिदागीची अपेक्षा नाही. तसेच फक्त त्यांचे साथीदारासह येण्या-जाण्याची सोय करावी अथवा वाहन खर्च द्यावा, असे अर्जात नमूद केलेले आहे.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** यापुर्वी श्री.मधुकर गणेश सुर्यवंशी हे गवई या पदावर काम करत होते, ते प्रत्येक एकादशीस कीर्तन करत असे. परंतु, सन-२०१३ मध्ये त्यांनी संस्थान सेवेचा राजिनामा दिल्यामुळे त्यानंतर सध्याचे पुजारी पदाचे काम करत असलेले श्री.उल्हास अनंतराव वाळुंजकर हे सध्याचे कीर्तन करतात व त्यांचे सुट्टीचे दिवशी मंदिर विभागाकडील एक अकुशल कंत्राटी कर्मचारी हे कीर्तन सेवा देत आहेत. त्याच्या बदल्यात त्यांना कोणतेही विशेष मानधन अथवा खर्च देण्यात येत नाही. मंदिर विभागाकडे एकूण ०४ गवई पुजारीचे पद असून ते सर्व पदे रिक्त आहेत. त्यामुळे श्री.उल्हास अनंतराव वाळुंजकर यांना पुजारी पद असून देखील फक्त संगीताचे ज्ञान असल्यामुळे त्यांचेकडुन पुजारी गवई(आरत्या गाणे, साथसंगत करणे, कीर्तन करणे) अशी कामे करुन घेण्यात येतात. त्यांचा कीर्तन सेवेचा अथवा प्रवचनाचा कोणताही अभ्यास नाही. श्री.वाळुंजकर हे अनुभवाचे बळावर कीर्तन करत आहेत. त्यामुळे बाहेरील अनुभवी कीर्तनकार जर संस्थानकरिता एकादशीचे दिवशी विना मोबदला कीर्तन सेवा देण्यास तयार असतील तर त्यांना नेमल्यास संस्थानचे एकादशीच्या कीर्तनाचा दर्जा नक्कीच वाढेल, असे नम्र मत आहे.

तरी अर्जदार ह.भ.प.परशुराम अनर्थे, रा.भोजडे यांना महिन्यातील कोणतेही एक कीर्तन सेवेची संधी देण्यास मान्यता असावी, ही विनंती. तसेच त्यांना संस्थानचे वाहन विभागामार्फत संस्थानचे वाहनाने साथीदारांसह एकादशीचे कीर्तनाचे दिवशी ने-आण करता येईल. तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी, ही विनंती. तरी उपरोक्त प्रस्तावास मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळावी, ही विनंती. उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अर्जदार ह.भ.प.परशुराम अनर्थे, रा.भोजडे यांची पार्श्वभूमी तपासून त्यांना दर महिन्यातील एकादशीस किर्तन सेवा करण्याची संधी देण्यात यावी. तसेच ह.भ.प.परशुराम अनर्थे, रा.भोजडे यांना येणे-जाणे करीता संस्थान वाहन उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालयाने जनहित याचीका क्र. १८/२०११ मध्ये दि. १३/०३/२०१२ रोजी व सिव्हील अर्ज १२०५६/२०१२ मध्ये दि. १६/१०/२०१२ रोजी चे आदेशाने Shall not take any major financial decision of whatsoever nature; असे निर्देश दिलेले आहे. प्रस्तुतचे निर्देशासन अनुसरून व मा.व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार खर्चास/ कामास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी सिव्हील अर्ज संस्थान वकीलामार्फत दाखल करण्यता आले आहेत. मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले खालील तक्त्यातील सिव्हील अर्ज मा. उच्च न्यायालयात पेंडींग / न्यायप्रविष्ठ असून कालपरत्वे कालबाह्य / निरर्थक झाले आहेत.

| अ.क्र. | विषय | दाखल केल्याचा दिनांक व सिव्हील अर्ज नंबर |
|---|---|---|
| १ | दैनंदिन वापराचे निरुपयोगी भंगार/ डेडस्टॉक/ मिसलेनिअस तसेच सादील स्वरुपाचे साहित्य विक्री करणेस मान्यता मिळणेबाबत. | दि. ११/१०/२०१३<br>१३२७९/२०१३ |
| २ | सन २०१४-२०१५ करिता ब्लीचींग पावडर फेरिक ॲलम, व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस मान्यता घेणेबाबत. | दि. २७/०६/२०१४<br>५८१५/२०१४ |

अ.क्र. नं. १ मधील सिव्हील अर्ज सन २०१३-२०१४ चा दैनंदिन वापराचे निरुपयोगी भंगार/ डेडस्टॉक/ मिसलेनिअस तसेच सादील स्वरुपाचे साहित्य विक्री करणेस मान्यता मिळणेकामी दाखल करण्यात आला होता. परंतू सदर सिव्हील अर्जावर मा. कोर्टाचा निर्णय वेळेत न झाल्याने अभिलेख कक्षाने वेळोवेळी कार्यालयीन टिपणी सादर करुन दैनंदिन वापराचे निरुपयोगी भंगार/ डेडस्टॉक /मिसलेनिअस तसेच सादील स्वरुपाचे साहित्य विक्री करणेस मान्यता घेवून विक्री केला आहे. त्यामुळे सन २०१३-२०१४ चे निरुपयोगी भंगार/ डेडस्टॉक/ मिसलेनिअस तसेच सादील स्वरुपाचे साहित्य शिल्लक नाही.

अ.क्र. नं. २ मधील सिव्हील अर्ज सन २०१४-२०१५ करिता ब्लीचींग पावडर फेरिक ॲलम, व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी दाखल करण्यात आला होता. परंतू सदर सिव्हील अर्जावर मा. कोर्टाचा निर्णय वेळेत न झाल्याने पाणी पुरवठा विभागाने वेळोवेळी कार्यालयीन टिपणी सादर करुन ब्लीचींग पावडर फेरिक ॲलम, व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी केले आहे.

उपरोक्त तक्त्यातील दोन्ही सिव्हील अर्ज कालपरत्वे कालबाह्य/ निरर्थक झाले असल्याने मा. उच्च न्यायालयातून अर्ज मागे (withdraw) घेणेबाबत अहवाल पाठविणेकामी अभिलेख कक्ष व पाणी पुरवठा विभागास पत्र दिले होते. पाणी पुरवठा विभागाने संदर्भ क्र. २ चे पत्र व अभिलेख कक्ष विभागाने संदर्भ क्र. २ चे पत्राने सिव्हील अर्ज मा. उच्च नयायालयातून मागे (withdraw) घेणेबाबत कळविले आहे.

तरी उपरोक्त तक्त्यातील दोन्ही सिव्हील अर्ज कालपरत्वे कालबाह्य/ निरर्थक झाले असल्याने मा. उच्च न्यायालयातून अर्ज मागे (withdraw) घेणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेले दोन्ही सिव्हील अर्ज कालपरत्वे कालबाह्य/ निरर्थक झाले असल्याने मा.उच्च न्यायालयातून मागे (withdraw) घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.०७** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१५-२०१६ या कालावधीत संस्थानचे मा.अध्यक्ष, सदस्य व मा.कार्यकारी अधिकारी यांना व संस्थान अंतर्गत खात्यांचे संबंधीत संपर्कातील अधिकाऱ्यांना व वेगवेगळया क्षेत्रातील अतिमहत्वाच्या व्यक्तींना त्यांच्या शिर्डी भेटीत, जनसंपर्क कार्यालयामार्फत आयोजीत पत्रकार दिन, संतकवी दासगणू महाराज पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम, शेक्षणिक संकूलात होणारे कार्यक्रम व सेवानिवृत कर्मचारी निरोप समारंभ व देणगीदार साईभक्तमान्यवरांना भेट म्हणून खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/ फोटो व सी.डी. प्रकाशने विभागाकडून माहे ०१ एप्रिल २०१५ ते दि.३१ मार्च २०१६ या कालावधीत मोफत देण्यात आलेले साहित्य अंतर्गत लेखापरिक्षक यांच्याकडून तपासणी करण्यात आलेली यादी खालील तपशिला प्रमाणे आहे.

| अं.नं. | पीयुबी नं. | पुस्तकांचे नाव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पीयुबी नं.१ | श्री साई सच्चरीत्र | मराठी | ४८ | ८१.५० | ३९१२.०० |
| ०२ | पीयुबी नं.३ | श्री साई चरित्र | इंग्रजी | ०६ | ३३.२४ | १९९.४४ |
| ०३ | पीयुबी नं.४ | श्री साई चरित्र | गुजराती | ०२ | ३८.१७ | ७६.३४ |
| ०४ | पीयुबी नं.१९ | श्री साईनाथ स्ववनमंजीरी | मराठी | ३७५ | २.०० | ७५०.०० |
| ०५ | पीयुबी नं.४२ | श्री साईचरित्र पोथी | गुजराती | ०५ | ९०.०० | ४५०.०० |
| ०६ | पीयुबी नं.४३ | श्री साईचरित्र स्टोअरी | मराठी | ०१ | ९६.७७ | ९६.७७ |
| ०७ | पीयुबी नं.५४ | दैनंदिन साईबोध | मराठी | ०२ | ६८.४० | १३६.८० |
| ०८ | पीयुबी नं.६६ | मुलांचे साईबाबा ले. मेहता | इंग्रजी | ०१ | ६३.८६ | ६३.८६ |
| ०९ | पीयुबी नं.६७ | श्री साईचरित्र सार हिंदी दोहावली | हिंदी | ०५ | ६१.२० | ३०६.०० |
| १० | पीयुबी नं.७८ | श्री साई चरित्र | ओडिया | ०१ | ३७.५० | ३७.५० |
| | | | | **एकुण रुपये.** | | **६०२८.७१** |

| अं.नं. | पीयुबी नं. | कॅसेट /सी.डी.चे नाव | प्रकार | मोफत नग | निर्मिती दर | एकुण रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|
| ११ | पीयुबी नं.२०४ | गुरुपाठाचे अभंग | CD | ०२ | ३८.०५ | ७६.१० |
| १२ | पीयुबी नं.२०८ | मंदिर आरती व मंत्रोपच्चार | VCD | ०२ | ३८.३३ | ७६.६६ |
| १३ | पीयुबी नं.२१० | मंदिर आरती व मंत्रोपच्चार | DVD | ०१ | ४८.१० | ४८.१० |
| | | | | | **एकुण रुपये.** | **२००.८६** |

| अं.नं. | पीयुबी नं. | श्री साई डायरी | वर्ष | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | पीयुबी नं.३१२ | श्री साई डायरी | २०१६ | १८४ | ६६.१५ | **१२१७१.६०** |

| अं.नं. | पीयुबी नं. | श्री साई कॅलेंडर्स | वर्ष | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | पीयुबी नं.४५१ | श्री साईबाबा कॅलेंडर्स ०१ पाने | २०१६ | ९६ | १५.९० | १५२६.४० |
| १६ | पीयुबी नं.४५२ | श्री साईबाबा कॅलेंडर्स डिलक्स वाल | २०१६ | ५६ | २३४.०० | १३१०४.०० |
| १७ | पीयुबी नं.४५३ | श्री साईबाबा कॅलेंडर्स मेटपेट | २०१६ | १० | २९३.०० | २९३०.०० |
| १८ | पीयुबी नं.४५४ | श्री साईबाबा ३डि वॉल कॅलेंडर्स | २०१६ | ०३ | २७३.७० | ८२१.१० |
| १९ | पीयुबी नं.४५५ | श्री साईबाबा टेबल कॅलेंडर्स ३डि | २०१६ | २४ | २३८.०५ | ५७१३.२० |
| | | | | | **एकुण रुपये.** | २४०९४.७० |

| | |
|---|---|
| एकुण मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम रुपये. | ६०२८.७१ |
| एकुण मोफत दिलेल्या सीडी/कॅसेटची रक्कम रुपये. | २००.८६ |
| एकुण मोफत दिलेल्या डायरीची रक्कम रुपये. | १२१७१.६० |
| एकुण मोफत दिलेल्या कॅलेंडरची रक्कम रुपये. | २४०९४.७० |
| एकुण रक्कम रुपये. | ४२४९५.८७ |
| **पुर्णांकीत रक्कम रुपये.** | **४२,४९६.००** |

(अक्षरी रुपये.बेचाळीस हजार चारशे शहानव मात्र.)

उपरोक्त प्रमाणे दि.०१.०४.२१५ ते दि. ३१.०३.२०१६ पर्यंत पुस्तके, फोटो, सी.डी.डायरी व कॅलेंडर्स पोस्टेज स्टॉकमधून मोफत देण्यात आलेली आहेत. याकामी रु.४२,४९६/- झालेला खर्चास मान्यता मिळणेस व सदर खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाते नावे टाकणेस मंजूरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.४५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणेच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०८** **संस्थान प्रकाशीत कै.शिवराम ठाकूर लिखीत साईसतचरित्र हिंदीचा काश्मिरी भाषेत अनुवाद करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. १७ ठ. मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील व साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील"

माजी कार्यकारी अधिकारी श्री किशोर मोरे यांचे मार्फत Mr. Raj Vyasabhattu, New York यांनी दि.२९.०१.१६ चे ई मेलमध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

१) श्री साईबाबांची शताब्दी २१८ मध्ये येत असल्याने बाबांच्या जीवन व कार्याचा प्रचार व प्रसार १०० भाषेत व्हायला पाहिजे.

२) भारतात ब-याच प्रकारच्या भाषा आहेत, त्याभाषेत बाबांचे चरित्र उपलब्ध नाही, त्यामुळे लोकांना बाबांचे जीवन त्यांचे कार्य, लीला व शिकवण समजलेली नाही.

३) संस्थान प्रकाशित कै. शिवराम ठाकुर लिखीत हिंदी साईचरित्राचे काश्मिरी भाषेत भाषांतर करण्याची इच्छा व्यकत केली आहे.

४) सदर चरित्राचे काश्मिरी भाषेत भाषांतर केल्यानंतर प्रकाशनाचे सर्व हक्क संस्थानला देण्यात येतील.

५) सदर चरित्राची डिटिपीची सी.डी. संस्थानला पाठविण्यात येईल.

सध्या १६ भाषेत संस्थान प्रकाशित साईचरित्रे उपलब्ध आहेत. १) मराठी २) हिंदी ३) इंग्रजी ४) तेलगू ५) तामिळ ६) मल्याळम ७) उर्दू ८) कन्नड ९) ओडिआ १०) कोंकणी ११) पंजाबी १२) नेपाळी १३) आसामी १४) सिंधी १५) बंगाली १६) गुजराती काश्मिरी भाषेतील साईचरित्र संस्थानकडे उपलब्ध नाही. संस्थानच्या पुस्तक विक्री काऊंटरवर काश्मीरी भाषेतील साईचरित्रास मागणी आलेली नाही. श्री साईबाबांचे भक्त भारतात तसेच परदेशातही आहेत. जास्तीत जास्त भाषेत साईचरित्र उपलब्ध असणे हे संस्थानला भुषणावह आहे.

हिंदी साईचरित्राचे काश्मिरी भाषेत केलेले भाषांतर हे योग्य असलेबाबत काश्मिरी भाषा असलेल्या अधिकृत विद्यापिठाचे तज्ञ प्राध्यापकाकडून तपासून विद्यापीठाचे लेटरहेडवर योग्य असलेबाबत दाखला पाठविणेबाबत Raj Vyasabhattu, New York यांना सांगता येईल

काश्मिरी भाषेतील साईचरित्र संस्थानने प्रकाशित केल्यास काश्मिरी भार्षिक साई भक्तात साईबाबांचा प्रचार- प्रसार होईल संस्थान काऊंटरवर मागणी नसली तरी त्या राज्यातील साई मंदिराच्या काऊंटरवर विक्री होऊ शकेल. तसेच संस्थानचे वेबसाईटवर सदर चरित्राची माहिती प्रकाशित केल्यास काश्मिरी भक्तांना माहिती होईल व चरित्रासाठी मागणी होईल व चरित्रासाठी मागणी वाढू शकेल.

सबब Raj Vyasabhattu, New York यांना प्रकाशित कै. शिवराम ठाकूर लिखीत श्री साईसतचरित्र- हिंदी भाषेचा काश्मिरी भाषेत अनुवाद करणेस परवानगी देणेस मान्यतेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन,** Mr. Raj Vyasabhattu, New York **यांना कै.शिवराम ठाकूर लिखीत श्री साईसतचरित्र-हिंदी भाषेचा, काश्मिरी भाषेत अनुवाद करणेस परवानगी देण्यात यावी. मात्र काश्मिरी भाषा असलेल्या अधिकृत विद्यापिठामधील तज्ञ प्राध्यापकाकडून सदरहू अनुवाद तपासून घेतल्यानंतरच ते प्रकाशित करणेस मान्यता देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०९** **संस्थान प्रकाशित श्री साई सच्चरित-मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे रंगीत फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेकरीता स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयानुसार श्री. अतुल श्रीकांत राखे, बडोदा (गुजरात) यांनी संस्थान प्रकाशित कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर कृत मुळ मराठी श्री साई सच्चरित या ग्रंथातील प्रत्येक अध्यायातील वर्णनानुसार ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो ब्लॅक एण्ड व्हाईट मध्ये आहेत. सदरच्या फोटोवरुन त्यांना (ऑईल- ऑन केनवास) कलरमध्ये फोटो तयार करणेस संस्थानमार्फत जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/१७६/२०१६ दि. ११.०४.२०१५ नुसार परवानगी देण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी फोटो व सीडी संस्थानला जमा केल्या आहेत.

सदर चित्रांची रंगीत २.५'X३.५' आकारात पेन्टीग स्वरुपात फ्रेममध्ये त्यांनी फोटो तयार केले आहे. फोटो दर्शन लाईनमध्ये लावल्यास भक्तांना चित्राचे अवलोकन होईल व साईबाबांच्या जीवन व कार्याची माहिती मिळू

शकेल. ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये असलेले फोटो संस्थानने देणगी स्वरुपात स्वीकारणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

**प्रस्ताविक-** संस्थान प्रकाशित कै. गोविंद रघुनाथ दोभाळकर कृत मराठी श्री साईसच्चरित्र हा मुळ ग्रंथ आहे. या ग्रंथातील प्रत्येक अध्यायातील वर्णनानुसार ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो ब्लॅक एण्ड व्हाईट वरुन श्री. अतुल श्रीकांत राखे यांनी २.५'X३.५' आकारात पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये फोटो तयार केले आहे. सदरचे फोटो दर्शन लाईनमध्ये लावल्यास दर्शनलाईन मधील भक्तांना वर्णनानुसार रेखाटलेल्या चित्रांचे अवलोकन होईल व साईबाबांच्या जीवन व कार्याची माहिति मिळु शकेल. त्यामुळे ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये असलेले फोटो संस्थानने देणगी स्वरुपात स्वीकारणेस हरकत नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** श्री. अतुल श्रीकांत राखे, बडोदा (गुजरात) यांनी २.५'X३.५' आकारात पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये तयार केलेले फोटो स्वीकारणेस हरकत नाही त्यामुळे श्री साईभक्तांना दर्शन लाईनमध्ये रेखाटलेले चित्राचे अवलोकन होऊन श्री साईं नी केलेल्याकार्याची / चमत्काराची माहिती मिळून प्रचार व प्रसार होण्याच्या कार्यास उत्तम प्रतिसाद मिळेल.

सबब श्री.अतुल श्रीकांत राखे, बडोदा (गुजरात) यांनी २.५'X३.५' आकारातील पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये तयार केलेले फोटो त्यांचेकडून त्यांचेकडून स्वीकारणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अतुल श्रीकांत राखे, बडोदा (गुजरात) यांचे विनंतीनुसार त्यांनी२.५'X३.५' आकारातील पेन्टींग स्वरुपात फ्रेममध्ये तयार केलेले, श्री साई सच्चरित-मराठी पोथीमधील ५२ अध्यायातील ५२ प्रकारचे फोटो देणगी स्वरुपात स्विकारणेस मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू५२ फोटो दर्शन लाईनमध्ये लावणेपूर्वी श्री साई सच्चरित- मराठी पोथीमधील अध्यायाच्या आशयाचे आहेत का, याची खात्री करावी व तसा प्रस्ताव समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०** **जर्मन भाषेतील साईचरित्र संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. ठ. मध्ये खालील तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

**प्रस्तावः-** श्री शिर्डी साई बाबा टेंपल फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी यांचे दि.१७.०२.२०१६ च्या पत्रात खालील प्रमाणे नमूद केले आहे.

१) संस्थान प्रकाशित श्री साईचरित्र- इंग्रजी भाषेचा अनुवाद तयार केला आहे व तो श्री शिर्डी साई बाबा टेंपल फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी यांचे मार्फत प्रकाशित करण्यात आला आहे.त तो श्री श्री शिर्डी साई बाबा टेंपल फ्रॅन्कफुर्ट,जर्मनी यांचे मार्फत प्रकाशित करण्यात आला आहे.

२) संस्थानमार्फत सदर जर्मन भाषेत केलेलाअनुवाद प्रकाशित होणेबाबत विनंती केली आहे

३) सदर प्रकाशनाचे हक्क संस्थानला विनाअट प्रकाशित होणेबाबत विनंती केली आहे.

प्रस्ताविकः- सध्या संस्थान मार्फत जर्मन आरती व जर्मन स्तवनमंजीरी प्रकाशित करण्यात आलेली आहे. संस्थानमार्फत जर्मन भाषेत साईचरित्र प्रकाशित करण्यात आलेले नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे सभा दि. २७.०२.२०११ चे सभेतील निर्णय क्र. १९८ नुसार श्री. जे. व्ही.मुर्ती, हैद्राबाद संस्थानचे अधिकृत प्रकाशित इंग्रजी श्री साई चरित्राचे जर्मन भाषेत अनुवाद करणेकामी मानधन म्हणून रु.७००१/- मात्र देऊन काम करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे व जा.नं.एसएसएस/वशी/१५०७/२०११ दि.२४.०७.२०११ नुसार त्यांना पत्र देण्यात आले होते. त्यांनी आजपावेतो इंग्रजी श्री साईचरित्राचे जर्मन भाषेत अनुवाद करून डीटीपीची मास्टर सीडी संस्थानला पाठविलेली नाही. त्यामुळे सदर चरित्र संस्थानमार्फत प्रकाशित करण्यात आलेले नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** श्री.जे.व्ही. मुर्ती, हैद्राबाद यांचेकडून ५ वर्षात जर्मन साईचरित्राची डीटीपीची सीडी प्राप्त झालेली नसल्याने त्यांचे ऐवजी श्री शिर्डी साई बाबा टेंपल फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी यांनी इंग्रजी साईचरित्राचा जर्मन भाषेत केलेला अनुवाद हा संस्थान प्रकाशित साईचरित्र इंग्रजी प्रमाणे बरोबर असलेबाबत जर्मन भाषा विभाग असलेल्या कोणत्याही विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविता येईल व नंतर संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत विचार करता येईल.

सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री शिर्डी साई बाबा टेंपल फ्रॅन्कफुर्ट, जर्मनी यांनी इंग्रजी साईचरित्राचा जर्मन भाषेत केलेला अनुवाद जर्मन भाषा विभाग असलेल्या विद्यापीठाकडून तपासून घेणेबाबत त्यांना कळविणेत यावे व विद्यापीठाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ते प्रकाशित करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ सगुणोपासना आरती, कन्नड भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. ठ. मध्ये खालील तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताव:-** डॉ.सितामहालक्ष्मी, म्हैसुर यांनी दि ०५.०४.२०१६ च्या पत्रात खालील नमुद केले आहे.

१) संस्थान प्रकाशित श्री साईनाथ सगुणोपासना मराठी भाषेचा हिंदी भाषेत श्रीमती कल्पना भाकुनी, नवी दिल्ली यांनी केलेल्या अनुवादाचे कन्नड भाषेत अनुवाद केला आहे. सदरचा अनुवाद संस्थानमार्फत कन्नड भाषिक साईभक्तांसाठी प्रकाशित करावा अशी विनंती केली आहे.

२) प्रकाशनाचे सर्व हक्क संस्थानला विनाअट देण्याची तयारी दर्शविली आहे.

३) द्रविडीयन विद्यापीठ, आंध्रप्रदेश कन्नड विभाग, डॉ एम.एस.दुर्गाप्रविना, ॲसिस्टंट प्रोफेसर यांनी श्री साईनाथ सगुणोपासना आरती-हिंदी भाषेचा कन्नड भाषेत अनुवाद बरोबर असलेबाबत युनिव्हर्सिटीचे प्रमाणपत्र सादर केले आहे.

४) सदर अनुवादाची सीडी व डीटीपी संस्थानला दिली आहे.

**प्रस्ताविक:-** संस्थानमार्फत श्री साईनाथ सगुणोपासना आरती कन्नड भाषेत प्रकाशित झालेली नाही. काऊंटरवर साईभक्त कन्नड आरतीची मागणी करतात, परंतु संस्थानमार्फत प्रकाशित नसल्यामुळे साईभक्तांना काऊंटरवर उपलब्ध करुन देता आली नाही. ब-याच कन्नड भाषिक साईभक्तांची इच्छा आहे की मंदिरात गायली जाणारी आरती म्हणण्यासाठी काऊंटरवर विक्रीसाठी उपलब्ध असावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** संस्थानमार्फत श्री साईनाथ सगुणोपासना आरती कन्नड भाषेत प्रकाशित नसल्याने, साईभक्तांना पुस्तकांवरुन आरती म्हणता येईल, श्री साईबाबांच्या जीवन व कार्याचा प्रचार-प्रसार होण्यास मदत होईल, त्यामुळे संस्थानमार्फत कन्नड भाषेत आरती प्रकाशित करण्यास हरकत नाही. डॉ. सितामहालक्ष्मी, म्हैसुर यांनी संस्थान नियमानुसार सर्व कागदपत्राची पूर्तता केलेली आहे

सबब डॉ.सितामहालक्ष्मी, म्हैसुर यांनी संस्थान प्रकाशित श्री साईनाथ सगुणोपासना मराठी भाषेचा हिंदी भाषेत श्रीमती कल्पना भाकुनी, नवी दिल्ली यांनी केलेल्या अनुवादाचे कन्नड भाषेत केलेला अनुवाद संस्थानमार्फत प्रकाशित होणेकरीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती कल्पना भाकुनी, नवी दिल्ली यांनी हिंदी भाषेत श्री साईनाथ सगुणोपासना आरतीचे केलेल्या अनुवादाचे, डॉ.सितामहालक्ष्मी, म्हैसुर यांनी कन्नड भाषेत केलेला अनुवाद हा बरोबर असलेबाबत डॉ.एम. एस. दुर्गाप्रविना, ॲसिस्टंट प्रोफेसर द्रविडीयन विद्यापीठ, आंध्रप्रदेश कन्नड विभाग, यांनी युनिव्हर्सिटीचे प्रमाणपत्राने कळविले असल्यामुळे सदरहू कन्नड भाषेतील अनुवाद संस्थानमार्फत प्रकाशित करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१२** **श्री साईचरित्र मल्याळम ओवी टू ओवी संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. ठ. मध्ये खालील तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताव:-** डॉ.अनिता दिनेश, शारजा, संयुक्त अरब अमीरती (UAE) यांचे पत्र आवक क्र.२४५३६ दि. १४.०३.२०१६ अन्वये यांनी संस्थानला खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

१) संस्थानला प्रकाशित श्री साईसमर्थ चरित्र- इंग्रजी भाषांतरकार कै श्रीमती झरीन तारापुरवाला यांच्या ओवी टु ओवी ग्रंथाचा मल्याळम भाषेत अनुवाद केला आहे. संस्थानमार्फत सदर मल्याळम भाषेत केलेला अनुवाद प्रकाशित होणेबाबत विनंती केली आहे

२) सदर प्रकाशनाचे हक्क संस्थानला विनाअट देण्याची तयारी दर्शविली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** संस्थानमार्फत श्री साई समर्थचरित्र ओवी टु ओवी ग्रंथाचा मल्याळम भाषेत प्रकाशित झालेला नाही. त्यामुळे संस्थानमार्फत प्रकाशित करण्यास हरकत नाही.

सबब संस्थान प्रकाशित श्री साई समर्थचरित्र इंग्रजी भाषांतरकार कै.श्रीमती झरीन तारापुरवाला या ओवी टु ओवी ग्रंथाचा मल्याळम भाषेत अनुवाद तयार करणेकामी डॉ. अनिता दिनेश शारजा, संयुक्त अरब अमीरती (UAE) यांना सांगता येईल, व सदर अनुवाद संस्थान प्रकाशित श्री साई समर्थचरित्र इंग्रजी कै.श्रीमती झरीन तारापुरवाला या ग्रंथाप्रमाणे बरोबर असलेबाबत मल्याळम भाषेचा विभाग असलेल्या विद्यापीठातील तज्ञ प्राध्यापकाचे विद्यापीठाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र घेऊन सादर करणेबाबत कळविता येईल, व नंतर संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत विचार करता येईल

सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डॉ.अनिता दिनेश शारजा, संयुक्त अरब अमीरती (UAE) यांनी श्री साईचरित्र इंग्रजी या ग्रंथावरुन मल्याळम भाषेत ओवी टू ओवी केलेला अनुवाद बरोबर असलेबाबत, मल्याळम भाषेचा विभाग असलेल्या विद्यापीठातील तज्ञ प्राध्यापकाकडून विद्यापीठाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र घेणेबाबत डॉ.अनिता दिनेश शारजा, संयुक्तअरब अमीरती (UAE) यांना कळविणेत यावे व विद्यापीठाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर ते प्रकाशित करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१३** **श्री साई चरित्र दर्शन मराठी या पुस्तकाचे प्रकाशन संस्थानमार्फत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं. १७ ठ. मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावः-** दि. ०४.०३.२०१६ नुसार श्री. मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी संस्थान प्रकाशित कै. ले.कर्नल मु. बा. निंबाळकर लिखित श्री साई चे सत्चरित्र या ग्रंथाचा श्री साईचरित्र दर्शन हा संक्षिप्तभावानुवाद केला आहे. सदरचे पुस्तक सन २००९ मध्ये तत्कालीन अध्यक्ष व मा. विश्वस्त यांचे हास्ते प्रकाशित केले असलेबाबत कळविले आहे. सदरच्या पुस्तकास त्यांचेकडे साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याने हे पुस्तक सहज उपलब्ध व्हावे याकरीता सदरचे पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करुन संस्थानच्या प्रकाशने विक्री काऊंटरवर उपलब्ध व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. या करीता ते सदर पुस्तकाचे संस्थानला प्रकाशनाचे सर्व हक्क देण्यास तयार आहे.

**प्रस्ताविकः-** संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनांची वाढती संख्या विचारात घेऊन मा. व्यवस्थान समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्विकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र. ४१५ नुसार झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साई चे सत्चरित्र- मराठी अनुवादक कै. मु. बा. निंबाळकर यांचे पुस्तकावर सन २०१४ पासुन साईभक्त श्री.रमेश जोशी कांदीवली, मुंबई हे माहितीच्या अधिकार कायद्यान्वये संस्थानला रोज पत्र पाठवितात. त्यात साईबाबांच्या आईवडीलांचे नाव, जन्मगांव, गोत्र, वंशावळ, जातधर्म असे काही माहिती विचारणा करतात. हे संस्थानला ज्ञात आहे. श्री मोहन जगन्नाथ यादव यांनी संस्थान प्रकाशित श्री साई चे सत्य चरित्र – मराठी या पुस्तकातील काही मजकुर जसा आहे तसाच घेऊन ग्रंथाचा संक्षिप्तभावानुवाद केला आहे त्यामुळे सदर पुस्तक प्रकाशित झाल्यास श्री. रमेश जोशी, मुंबई हे माहितीच्या अधिकारात माहिती मागविण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संस्थानमार्फत एकदा ग्रंथ प्रकाशित केला असल्यास परत ग्रंथाची पुनरनिर्मिती करण्याची अवश्यकता नाही.

सबब कै.ले.कर्नल मुं.बा. निंबाळकर लिखित श्री साई चे सत्चरित्र या ग्रंथाचा श्री.मोहन जगन्नाथ यादव यांनी श्री साई चरित्र दर्शन हा संक्षिप्तभावानुवाद केलेला संस्थानमार्फत प्रकाशित करणेकरीता निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन तो अमान्य करणेत आला.**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१४** **श्री सद् गुरु साईनाथ स्तवनमंजिरी- मराठी या पुस्तीकेचा पंजाब अनुवाद संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं.ठ मध्ये खालील तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्तावः-** पंजाबी भाषिक भक्तांसाठी संस्थानमार्फत श्री साईसतचरित्र-पंजाबी व श्री साईनाथ सगुणोपासना आरती-पंजाबी प्रकाशित करण्यात आलेले आहे. सदरचे चरित्र व आरती डॉ.गुणजीतसिंग वालिया, अमृतसर यांनी संदर्भीय पत्रान्वये श्री साईनाथ स्तवनमंजिरी पुस्तीका मराठी भाषेचा पंजाबी अनुवाद तयार केला आहे सदर पुस्तीकेचे सर्वाधिकार ते संस्थानला विनामुल्य देणार आहेत. त्यांनी श्री साईनाथ स्तवनमंजिरी-पंजाबी पुस्तीकेची सी.डी. संस्थानला पाठविलेली आहे. तसेच त्यामध्ये संस्थान लेखकांनी लिहीलेल्या पंजाबी भाषेतील पुस्तकांशी संस्थान सहमत असेलच असे नाही. असा उल्लेख त्यामध्ये करता येईल.

सध्या खालील भाषांमध्ये श्री साईनाथ स्तवनमंजिरी प्रकाशित असून विक्रीस उपलब्धआहे.

१) मराठी २) हिंदी ३) इंग्रजी ४) तेलगू ५) जर्मन ६) गुजराती ७) बंगाली ८) कन्नड

उपरोक्त सन २००४ चे महाराष्ट अधिनियमातील तरतूदीनुसार जास्तीत जास्त भाषेत स्तवनमंजिरी पुस्तीकेचा अनुवाद झाल्यास सर्व भाषिकांना त्याचा लाभ होईल.

**विभागाची मागणीः-** संस्थानमार्फत श्री साईनाथ स्तवनमंजिरी- पंजाबी भाषेत प्रकाशित झालेली नाही. श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार-प्रसार सर्व भाषेत व्हावा म्हणून त्यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईनाथ स्तवनमंजिरी पुस्तीका पंजाबी भाषेत प्रकाशित करणेस मान्यता देणेस हरकत नाही असे नम्र मत आहे

संस्थानचे नियमाप्रमाणे पुस्तक प्रकाशनापूर्वी केलेला अनुवाद मुळ पुस्तकाबरहूकूम असलेबाबत व अनुवाद करतांना त्याचे अर्थात कोणताही बदल केला नसल्याबाबत पंजाबी भाषा असलेल्या विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत त्यांना सांगण्यात आले होते त्यानुसार त्यांनी पूर्तता केली आहे.

सबब डॉ.गुणजीतसिंग वालीया, अमृतसर यांनी श्री साईनाथ स्तवनमंजिरी पुस्तिका पंजाबी भाषेत केलेला अनुवाद संस्थान नियमाप्रमाणे गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, पंजाब प्रमाणपत्र सादर केलेले आहे. संस्थानद्वारा श्री साईनाथ स्तवनमंजिरी- मराठी भाषेचा पंजाबी अनुवाद पुस्तिका प्रकाशित करणेस मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.गुणजीतसिंग वालीया, अमृतसर यांनी श्री साईनाथ स्तवनमंजिरी पुस्तिका पंजाबी भाषेत केलेला अनुवाद हा बरोबर असलेबाबत गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर, पंजाब यांचे प्रमाणपत्र सादर केलेले असल्यामुळे सदरहू श्री साईनाथ स्तवनमंजिरी- मराठी भाषेचा पंजाबी अनुवाद पुस्तीका संस्थानमार्फत प्रकाशित करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१५** **टॅको व्हिजन्स प्रा.लि.मुंबई यांना ओरियंट प्रेस, मुंबई यांनी दिलेल्या मंजूर दराने श्री साईलीला नियतकालिकांची छपाई करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईलीला मासिके छपाईकामाचा सन २०१५-२०१६ चा कार्यादेश ओरियंट प्रेस लि., मुंबई यांना देण्यात आला होता व सदरची छपाईकामाची मुदत माहे ऑगस्ट २०१६ अखेर संपत आहे.

सहाय्यक संपादक श्री साईलीला, मुंबई कार्यालय यांचे दि १७.०६.२०१६ चे पत्रान्वये सदोष छपाई व विलंब होत असल्याने ओरियंट प्रेस लि., मुंबई यांनी दिलेल्यादरातच अंक छपाईचा अनुभव असलेल्या मुद्रकाकडून छपाई करुन घेण्याची विनंती केली आहे.

मे.टॅको व्हिजन मुंबई यांनी दि.२३.०६.२०१६ पत्रान्वये छपाई ओरियंट प्रेस लि.,मुंबई यांनी दिलेल्या दरात दसरा विशेषांक माहे सप्टेंबर-ऑक्टोबर व नोव्हेंबर-डिसेंबर२०१६ चे अंकांची छपाई करुन देण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

**प्रस्तावः-** मे.टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई यांनी यापूर्वीसंस्थानचे साईलीला अंक छपाई काम उत्कृष्ट केलेले असून त्यांची डिझाईन,आर्टवर्क,फोटोचे काम चांगले केलेले आहे. त्यांनी सलग ०३ वर्ष श्री साईलीला अंकांची छपाई केलेली आहे.

**माहे सप्टेंबर-ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१६ श्री साईलीला अंक छपाई तपशिल.**

| अ.नं. | तपशिल | ०३ अंकाकरिता छपाई संख्या | मंजूर दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | दसरा विशेषांक मराठी(०१ अंक) ६४+४ =६८ पाने सप्टेंबर-ऑक्टोबर २०१६ | ९००० नग (प्रती) | १६/- | १४४०००.०० |
| | दसरा विशेषांक हिंर्द- इंग्रजी (०१ अंक) ६४+४ =६८ पाने सप्टेंबर-ऑक्टोबर २०१६ | १६,५०० नग (प्रती) | १६/- | २६४०००.०० |
| ०३ | साईलीला मराठी (०२ अंक) ३२+०४ पाने=३६ पाने नोव्हेंबर-डिसेंबर २१६ व जानेवारी-फेब्रुवारी २०१७ | १८,००० नग (प्रती) (९००० अंकX ०२ अंक) | ११/- | १९८००.०० |
| ०४ | साईलीला हिंदी-इंग्रजी(०२ अंक) ३२+०४ पाने =३६ पाने नोव्हेंबर-डिसेंबर २१६ व जानेवारी-फेब्रुवारी २०१७ | ३३,००० नग (प्रती) (१६,५०० अंकX ०२ अंक) | ११/- | ३६,३००.०० |
| | | | **एकूण रुपये** | **९,६९,०००.००** |

( अक्षरी रुपये. नऊ लाख एकोणसत्तर हजार मात्र.)

**संस्थानचे अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५.०८.२०१४ निर्णय क्र. ५०६ व ई निविदा छाननी दि.१०.०८.२०१५

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** ओरियंट प्रेस लि., मुंबई यांचा श्री साईलीला नियतकालिक छपाई कामाचा कार्यादेश संपत आहे. पुढील श्री साईलीला नियतकालिक छपाईबाबत प्रस्ताव पाठविला आहे. सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत मंजूर होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची खर्चास मान्यता घेणे व वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, ई निविदा पारित करणे, कार्यादेश देणे यासाठी ४ ते ५ महिने कालावधी अपेक्षीत आहे. श्री साईलीला व्दैमासिक असल्याने ते ज्या त्या कालावधीत छपाई करुन सभासदांना वितरण होणे गरजेचे आहे. पुढील नियतकालिक हे दसरा विशेषांक आहे

मे.टॅको व्हिजन मुंबई प्रा.लि.मुंबई यांना मागील दराने, परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे यापुढील(माहे सप्टेंबर-ऑक्टोबर– नोव्हेंबर- डिसेंबर २०१६) श्री साईलीला छपाईकामाचा कार्यादेश देणेस व येणा-या रक्कम रु. ९,६९,०००/- खर्चास मान्यता मिळणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ओरियंट प्रेस, मुंबई यांचेकडून श्री साईलिला नियतकालीक छपाई करुन मिळणेस होणारा विलंब व सदोष छपाई या बाबींचा विचार करता, माहे सप्टेंबर-ऑक्टोबर व नोव्हेंबर- डिसेंबर २०१६ या साईलिला नियतकालीकांची ओरियंट प्रेस, मुंबई यांचे मंजुरदरात मे.टॅको व्हिजन मुंबई प्रा.लि.मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच ओरियंट प्रेस, मुंबई यांनी छपाई कार्यादेशातील अटी/शर्तीचा भंग केलेला असल्याने त्यांच्या प्रेसचे नाव संस्थान छपाई कामातून वगळणेत येऊन, त्यांना काळया यादीत टाकणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१६** **ओरिएंटप्रेस लि, मुंबई यांचे नाव संस्थान छपाई कामातून वगळणे बाबत.**

**प्रस्ताव-** ओरियंट प्रेस लि. मुंबई यांना सन २०१५-२०१६ श्री साईलीला मासिके छपाई कार्यादेश दर ई निविदा मान्य करुन देण्यात आलेला आहे. श्री साईलीला मासिके छपाई करतांना सदर मुद्रक निष्काळजीपणे, बेफिकीरवृत्तीमुळे वेळकाढू धोरणामुळे अंकाची छपाई सदोष होत असून ही बाब वेळोवेळी निदर्शनास आणून दिल्यानंतरही त्यात सुधारणा करण्यात आलेली नाही. तसेच जादा अंक मागणीनुसार छपाई करुन देत नाही अशीही तक्रार संबंधीत प्रेसच्या विरोधात सहाय्यक संपादक, श्री साईलीला विभाग यांनी केलेली आहे.

ओरियंट प्रेस लि. मुंबई यांचे साईलीला मासिकांतील फोटो०४ रंगात रंगीत छपाई करुन देत नाही. विशेषत: मान्यवरांची शिर्डी भेट प्रसंगी श्री साईसमाधि मंदिरातील साईदर्शन फोटो काळसर रंगात छपाई करुन दिल्याने संस्थान नावलौकीकास बाधा आणली आहे. याबाबत सुस्पष्ट छपाईकरुन घेणे बाबत प्रकाशने विभागास मा. कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश देणे, अशा ब-याच तक्रारी संबंधीत प्रेस बाबत आहे.

सहाय्यक संपादक, श्री साईलीला, मुंबई कार्यालय यांचे मे ओरियंट प्रेस लि., मुंबई यांच्या विरोधातील प्रस्तावाची दखल इकडील कार्यालयाने घेतली असून, सदर प्रेसधाकाचे नाव वगळणेबाबत टिपणी मंजूर करुन, त्यांना सदोष छपाईबाबत कारणे दाखवा नोटीस जा.नं. एसएसएस/वशी/ प्रकाशने/ १४९९/२०१६ दि.३०.०६.२०१६ अन्वये रजिस्टर पोस्टाने बजाविण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्रायः-** ओरियंट प्रेस लि., मुंबई यांनी छपाई कार्यादेशातील अटी/शर्तीचा भंग केला असल्याने त्यांच्या प्रेसचे नाव संस्थान छपाई कामातून वगळणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६१** **सदरहू विषयाबाबत उपरोक्त विषय नं.१५ मध्ये चर्चा होऊन, निर्णय क्र.४६० घेण्यात आलेला आहे.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१७** **श्री साईप्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतुद- सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2 घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रस्ताविक:- श्री साई प्रसादालयात दैनंदीन सरासरी 35,000 ते 40,000 साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. भक्तांना प्रसाद भोजन घेणेकामी स्टे.स्टील धातूची मजबुत अशी 25,000 नग ताटे तयार करुन घेण्यात आलेले आहेत. सततच्या वापरामुळे सदरचे ताटांना कप्यांचे बाजुने पिवळसर डाग आलेले आहेत. सदरचे डाग हे भांडी मशिनमधून अथवा मनुष्यबळाकरवी स्वच्छ केले तरीदेखील निघत नाहीत. त्यामुळे ताटे खराब असलेबाबत भक्तांच्या तक्रारी येत आहेत. करीता प्रसादभोजनकामी असलेली स्टे.स्टील ताटे बफींग करणे आवश्यक आहे. बफींग केलेनंतर ताटांना पुर्णपणे चकाकी येईल व भक्तांच्या तक्रारी देखील येणार नाहीत असे नम्र मत आहे.

यापुर्वी सन 2014 मध्ये पवन इंडस्ट्रिज, कोपरगाव यांचेकडून 5000 नग स्टे स्टील ताटे रु.25/- प्रमाणे बफींग करुन घेणेत आलेली होती व त्यास रक्कम रु.1,25,000/- इतका खर्च आलेला होता.

मागणी:- साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी सन 2014 मध्ये बफींग करणेत आलेली 5,000 नग ताटे ही गर्दीचे प्रमाणात कमी पडतात. त्यामुळे उर्वरीत 20,000 ताटे ही सततच्या वापरामुळे खराब झालेली आहे. सदरचे ताटांमधील 9,500 नग ताटे ही अत्यंत खराब आहे त्यांना मोठयाप्रमाणात पिवळसर डाग आहे. त्यामुळे सदरची 9,500 नग ताटे ही तातडीने बफींग करावी लागणार आहे. बफींगचे काम हे विहीत पध्दतीने दरपत्रक मागवून करता येईल.

याकामी प्रती ताट बफींग करणेसाठी अंदाजे रक्कम रु.30/- पर्यत खर्च अपेक्षित आहे. त्यानूसार 9,500 ताटांसाठी अंदाजे रक्कम रु.2,85,000/- (अक्षरी रक्कम रु दोन लाख पंच्याऐंशी हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे सादर करावा लागणार आहे. याकामी श्री साई प्रसादालयातील सन 2016-17 या अंदाजपत्रकात भांडी खरेदीकामी रक्कम रु.10,00,000/- तरतुद केलेली आहे. या रकमेतून सदचा खर्च करता येईल.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- प्रास्तविक व मागणी केलेनूसार, सदरचा प्रस्ताव साईभक्तांच्या व प्रसादालयातील ISO:22000:2005 मानांकन तसेच फुड ॲण्ड सेफ्टी ॲक्ट नूसार अत्यंत आवश्यक बाब आहे. करीता, श्री साई प्रसादालयात प्रसादभोजनकामी असलेली 9,500 नग स्टे.स्टील ताटे विहीत पध्दतीने दरपत्रक मागवून बफींग करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.2,85,000/- (अक्षरी रक्कम रु.दोन लाख पंच्याऐंशी हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील खराब झालेली ९,५०० नग स्टे.स्टील ताटे बफींग करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्री साईप्रसादालयामध्ये वापरासाठी आवश्यक असलेली, चांगल्या प्रतीची भांडी देणगी स्वरुपात मिळणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, साईभक्तांना आवाहन करणेत यावे. तसेच विशिष्ट कालावधीमध्ये भांडी देणगी स्वरुपात न मिळाल्यास सदरहू भांडी खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी हाऊसकिपींग ठेकेदार यांचेमार्फत आऊटसोर्स पध्दतीने कामगार लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद- सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र राज्य विधी मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 21 (1 घ) नूसार जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक:-** श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग,स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम हे उक्त आऊटसोर्सिंग पध्दतीने देणेत येते. त्याकामी ई-निविदा मागविणेत येत असून, निविदेतील अटी/ शर्ती नूसारहाऊसकिपींग ठेकेदारास (हाऊसकिपींग कामाचे व्यतिरिक्त) गर्दीचे काळात (श्रींचे रामनवमी, गुरुपौर्णिमा, दसरा उत्सव, नाताळ, दिपावली सुट्टया, सलग सरकारी सुट्टया तसेच मध्यम गर्दीमध्ये) संस्थानकडील वाढपी कायम/कंत्राटी कर्मचारी कमी पडल्यास निविदाधारकास गर्दीचे प्रमाणात जादा कंत्राटी कर्मचारी पुरविणे बंधनकारक राहील. या कामासाठी लावणेत आलेल्या जादा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बीलाची रक्कम निवीदाधारकास प्रचलीत किमान वेतन दरानूसार देण्यात येईल, यामध्ये कुठलेही इतर चार्जेस दिले जाणार नाही अथवा देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही. असे आहे.

श्री साई प्रसादालया अंतर्गत साईआश्रम भाग-1 येथे प्रायोगिक तत्वावर तत्कालीन अध्यक्ष साहेब यांचे सुचनेवरुन स्वयंसेवी प्रसादभोजन कक्ष सुरु केलेले असून आजपावतो सदरचे स्वयंसेवी कक्ष सुरु आहे. त्यास साईभक्तांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असून भक्तांची निवासस्थानाजवळच श्रींचे प्रसादाची व्यवस्था होत असल्यामुळे साईभक्तही समाधानी होत आहेत तसेच मुख्य प्रसादालयावर येणारा भक्तांचा अधिकचा भार (गर्दीचा ताण) विभागला जात आहे. येथे लागणारा कर्मचारी वर्ग कामगार विभागाकडून संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेकडून प्रशासकीय अडचणींमुळे (स्टापींग पॅटर्नमधील मर्यादा) मिळत नसल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.07/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.672 नूसार आवश्यकतेनूसार आऊटसोर्स पध्दतीने हाऊसकिपींग ठेकेदारामार्फत वाढपी कामासाठी आवश्यक असलेले 50 वाढपी अद्यापपावेतो घेण्यात येत आहेत.
दरम्यानचे काळात मा.व्यवस्थापन समितीचे दि.25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.880 नूसार "दि.07 ऑगस्ट-2014 मधील निर्णय क्रं.672 नूसार ठरलेप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, भविष्यात अडचण आल्यास त्याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा." असा झालेला आहे.

त्यानूसार वरील निर्णयान्वये, सन 2014-2015 करीता 50 वाढीव कंत्राटी कामगार पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि,पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. तद्नंतर टेंडर प्रक्रीयेनूसार प्रसादालयाकरीता हाऊसकिपींगचा कार्यादेश ज्या ठेकेदारांना मिळेल त्या ठेकेदारांकडून वाढपी कर्मचारी आऊटसोर्स पध्दतीने घेणेत येत असल्याने, इकडील दिनांक 21/03/2015 रोजीचे मंजूर टिपणीनूसार जा.नं.एसएसएस/वशि/प्रसादा/343/2015 दि.27/03/2015 अन्वये 50 वाढीव कंत्राटी कामगार पुरविणेकामी, मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस (इं), पुणे यांना माहे 01 मार्च-2015 पासून त्यांचे टेंडर कालावधीत पुरविणेबाबत आदेश देण्यात आलेला आहे.

आता, सन 2016-2017 करीता मागविणेत आलेल्या ई-निविदेची कार्यवाही पुर्ण झालेली आहे. प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी, स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना मा.व्य.समितीचे निर्णयानूसार दि. 16/06/2016 ते 15/06/2017 अखेर कामाचा कार्यादेश देण्यात येत आहे. त्यामुळे अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हीसेस (इं) प्रा.लि., पुणे यांचे उपरोक्त आदेशाची मुदत आपोआपच संपुष्टात येत आहे. आता, नव्याने मंजूर असलेले कंत्राटदार मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचेकडून साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी आवश्यक असणारे 50 वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने घेता येईल.

**मागणी:-** श्रींचे दर्शनासाठी व प्रसादभोजनासाठी मोठयाप्रमाणात गर्दी होत असते. संस्थानचे गत मा.अध्यक्ष साहेब यांचे आदेश वजा सुचनेनूसारसुरु करणेत आलेल्या साई आश्रम भाग-1 येथील स्वयंसेवी प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेत आलेली आहे. त्याकरीता दोन्ही शिफ्ट मिळून साधारणत: 40 ते 50 वाढीव कर्मचारी आवश्यक आहेत. तेही प्रसादालयाकडे देण्यात आलेले नाहीत. साई आश्रम भाग-1 येथील स्वयंसेवी प्रसादभोजनास मिळणारा प्रतिसाद विचारात घेता सदर स्वयंसेवी प्रसादभोजन योजना यापुढेही कार्यान्वीत राहणे अत्यंत आवश्यक आहे.

तथापी त्याकरीता आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग (कायम/कंत्राटी) प्रशासकीय अडचणीमुळे मिळणे शक्य होत नाही. तसेच बरेच संस्थान वर्ग-4 कर्मचारी सेवा निवृत्त होत आहेत. त्या बदल्यात आवश्यक असलेला कर्मचारी वर्गही अपुरा पडत आहे. करीता, मा.व्यवस्थापन समिती दि.07/08/2014 रोजीचे सभेतील निर्णयाचे अधिन राहून, हाऊसकिपींग कॉन्ट्रॅक्टर, मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबईयांचेकडून त्यांचे टेंडर कालावधीमध्ये प्रती दिन 50 वाढपी कामगार (आऊटसोर्स पध्दतीने) घेता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रास्तविक व मागणीनूसार साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी तसेच साईभक्तांची प्रसादभोजन अभावी गैरसोय होऊ नये याकरीता, मा.व्यवस्थापन समिती दि.07/08/2014 व 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णयाचे अधिन राहून, सन 2016-2017 करीता हाऊसकिपींगकामी मंजूर असलेले निविदाधारक मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचेकडून दि.16/06/2016 पासून एक वर्ष कालावधीकरीता अथवा पुढील टेंडर प्रक्रिया पुर्ण होवून नविन टेंडरधारकास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता यापुर्वी प्रमाणेच प्रती दिन 50 वाढपी कामगार (आऊटसोर्स पध्दतीने) घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस व पुढील काळात सदर वाढपी कर्मचाऱ्यांची वेगळी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसादभोजन सेवा पुरविणेकामी हाऊसकिपींग ठेकेदार यांचेमार्फत आऊटसोर्स पध्दतीने ५० कामगार लावणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावात मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरचे नावातील बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षामध्ये कन्या विद्या मंदिरामध्ये मुलींसाठी कनिष्ठ महाविद्यालय (इ.११ वी.) चे नवीन वर्ग सुरु करणेकामी मा.शिक्षण उपसंचालक यांनी त्यांचेकडील दि.०१.१०.२००१ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेमध्ये अ.क्र.१ मध्ये सबंधित संस्थामुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे आहे. तसेच ज्या माध्यमिक शाळेला जोडून उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वर्गांना परवानगी घ्यावयाची आहे. तसेच अ.क्र.७ मध्ये स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयास परवानगी देण्यात येणार नाही, असे नमुद केलेले आहे

**ब)** मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील दि०७.१०.२००६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावात बदल केलेला आहे. (संदर्भ-जा.क्र.एससएस/ कन्या/ कनिष्ठ/ १०५३८/ दि.०९. ०९.२००६ चे पत्र) मात्र सदर नाव बदलण्याबाबतचे पत्र, प्रशासकीय मान्यतेची टिपणी अथवा मा.व्यवस्थापन समितीची मान्यता, नाव बदलाबाबत कार्यालयीन आदेश, याबाबतचे कोणतेही कागदपत्रे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर अथवा कनिष्ठ महाविद्यालयाकडून सादर करण्यात आलेले नाहीत.

**क)** श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडील दि.१३.०५.२०१ रोजीचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या नवीन नावात बदल करणेबाबतचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी, नावांत बदल करण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण उपसंचालक यांना कोणी सादर केला? समितीची मान्यता घेतली काय ? नसल्यास मा.समितीसमोर सविस्तर टिपणी सादर करावी. असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार इकडील कार्यालयाकडील जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/७३६/२०१६ दि.२६.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांना तसेच जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ८७९/२०१६ दि.२६.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती निता बबनराव चव्हाणके यांना स्वतंत्रपणे पत्र देऊन १. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरचे नावांत बदल करणेबाबत प्रशासकीय टिपणी/ प्रस्ताव २. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरचे नावांत बदल करणेबाबत माव्यवस्थापन समितीचा ठराव ३. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरचे नावांत बदल करणेबाबतचा प्रस्ताव कोणी सादर केला होता ४. श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरचे नावांत बदल करणेबाबत माशिक्षण उपसंचालक यांना दिलेले जाक्र.एसएसएस/कनिष्ठ/१०५३८ दि.०९.०९.२००६ रोजीचे पत्र. इ. मुद्यांबाबत व कागदपत्रांबाबत माहिती मागविलेली होती

**ड)** त्यानुसार कन्या विद्या मंदिर यांनी त्यांचे दि.२७.०५.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाचे नावांत बदलाबाबतचे सर्व कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयाकडे असलेबाबत कळविलेले आहे. त्याबाबत त्यांनी त्यांचेकडील दि.२९.०३.२०१६ रोजीचे पत्राची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. सदर पत्रावर सौ.चव्हाणके, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यांनी उपरोक्त संदर्भातील फाईल कनिष्ठ महाविद्यालयाकडे असलेबाबत कळविलेले आहे.

तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील दि.०४.०६.२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री.शिवगजे, सहा.शिक्षक यांनी उपरोक्त कोणतेही कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयाकडे नसलेबाबत कळविलेले आहे.

**इ)** उपरोक्त परिच्छेद **"अ" "ब" "क"** व **"ड"** चे अवलोकन करता सन २००६ मध्ये मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचेशी कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी परस्पर (संदर्भ-जा.क्र.एससएस/ कन्या/ कनिष्ठ/ १०५३८/ दि.०९.०९.२००६) पत्रव्यवहार करुन, शाळेचे नांवात बदल केला असल्याचे सकृतीदर्शन दिसून येत आहे. तसेच सौ.चव्हाणके, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका यांनी सदरचे कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयकडे असलेबाबत कळविलेले आहे, मात्र कनिष्ठ महाविद्यालयामार्फत कागदपत्रांबाबत निरंक अहवाल देण्यात आलेला आहे.

संस्थानाचे प्रचलित पद्धतीनुसार विभागाचे नांवात बदल करावयाचा असल्यास त्याबाबत प्रथम मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, मा.व्य.समितीचे मान्यतेनंतर प्रशासनामार्फत कार्यालयीन आदेश पारित करुन, नावांत बदल केला जातो. मात्र शाळेच्या नावांत बदल करतेवेळी मा.व्यवस्थापन समितीची अथवा मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेतलेली दिसून येत नाही.

तरी साईबाबा कन्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावांत केलेला बदल रद्द करुन त्याऐवजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा नावांत बदल करणेकामी मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.४६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा कन्या मंदिर ऐवजी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय असा नावांत केलेला बदल रद्द करणेत येऊन, त्याऐवजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी असा बदल करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२०** **मालमत्ता विभाग व बांधकाम विभागाचे एकत्रिकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या साईभक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस होणारी वाढ विचारात घेऊन साईभक्तांना मुलभूत सेवासुविधा पुरविणेकामी मोठया प्रमाणात जागेची आवश्यकता लागते. याकरिता शिर्डी व परिसरातील जमिनी भूसंपादनाने तसेच खरेदी केल्या जातात. पुर्वीच्या व खरेदी केलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन व संरक्षण करणे, संस्थान जागेवर अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण व्यवस्था उभारणे, माहिती फलक लावणे तसेच भाडेपट्टयाने दिलेल्या मालमत्तेचे नुतनीकरण करणे अथवा गरजेनुसार उचित प्रयोजनासाठी विनियोग करणे इत्यादी कामाचे महत्व व व्याप्ती ही मोठया प्रमाणात असल्याने मा.त्रिसदस्य समिती दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८६ नुसार मालमत्ता विभाग स्वतंत्र कार्यान्वीत करणेचा निर्णय घेण्यात आलेला असून जा.नं.एसएसएस/वशी-०१/ ३८३८/ २०१४ दि.१९ नोव्हेंबर, २०१४ चे आदेशान्वये मालमत्ता विभाग स्वतंत्रपणे कार्यान्वीत केलेला आहे.

मालमत्ता विभागामार्फत चल-अचल मालमत्तेच्या नोंदी ठेवणे, विहीत पध्दतीने संरक्षण करणेकामी वेळोवेळी बांधकाम विभागाशी संपर्क करुन खरेदी केलेल्या तसेच पुर्वीच्या मालमत्तेला कंपाऊंड करणे, सुरक्षा भिंत उभारणे, माहिती फलक लावणे याप्रमाणे कार्यवाही करावी लागते. सदरची कार्यवाही ही मालमत्ता विभाग व बांधकाम विभाग या दोन्ही विभागांना एकत्रितपणे करावी लागते.

प्रशासकीय कामकाजाचे सोईसाठी मालमत्ता विभाग व बांधकाम विभागाचे एकत्रिकरण केल्यास दैनंदिन कामकाजात एकसुत्रीपणा येईल. याकामी सदरचे दोन्ही विभागाचे एकत्रिकरण करुन संबंधीत कामाचे विभाग प्रमुखांची जबाबदारी उप कार्यकारी अभियंता(बांधकाम विभाग) यांचेकडे देता येईल, तरी सदरचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या मालमत्तेचे रक्षण व्हावे याकरीता मालमत्ता विभाग स्वतंत्र आवश्यक असल्याने मालमत्ता विभाग व बांधकाम विभागाचे एकत्रिकरण न करता, मालमत्ता विभाग स्वतंत्रच ठेवण्यात यावा. तसेच संस्थानचे सर्व चल-अचल मालमत्तेची माहिती सर्व समिती सदस्यांना पुरविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.२१** **मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०५ व निर्णय क्र.३२४ चे कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांची मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५/०९/१९९८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१९७ (३) नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०४१/१९९८, दिनांक १२/०९/१९९८ अन्वये जून १९९८ चे जाहिरातीनुसार प्रथम कामगार अधिकारी या पदावर रु.१४००-४०-१८००-५०-२३०० या वेतनश्रेणीमध्ये मुळ वेतन रु.१४००/- व नियमानुसार इतर भत्ते देऊन एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली. सदर पदावर ते दिनांक २६/१०/१९९८ रोजी पासून हजर झाले. दरम्यानचे काळात त्यांना एकत्रित वेतन रुपये ६५००/- वेतनमिळणेकामी पाचवे वेतन आयोगाचे तरतुदीनुसार वेतन निश्चिती करताना सहा जादा वेतनवाढी, तसेच सुधारीत वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्यांची मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक १५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४२१६/ २०१४, दिनांक २०/०३/२०१४ रोजीचे आदेशान्वये खुल्या प्रवर्गातून प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यात्मक पदोन्नतीने नेमणूक करणेत आली आहे

श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, तत्कालिन कामगार अधिकारी यांना प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-०१/ ५४४/ १९९९ दि.०८/०४/१९९९ रोजीचे आदेशान्वये पाचवे वेतन आयोगाप्रमाणे रु.४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करताना एकाच वेळी सहा जादा वेतनवाढी देण्यात आलेल्या होत्या. सदर आदेशाला संस्थानच्या कामकाजाशी संबंधीत कोणत्याही प्रचलीत नियमांचा आधार नाही. हा आदेश कशाच्या आधारावर काढण्यात आला. सदर आदेशाला आजतागायत व्यवस्थापन मंडळ / व्यवस्थापन समितीची मान्यता नाही. सदरचा आदेश नियमबाह्य असल्याने तो तात्काळ प्रभावाने रद्द करुन संबंधीत आस्थापना विभाग व लेखा विभागाने या अनुषंगाने त्यांची तात्काळ फेर वेतननिश्चिती करावी. तसेच यापोटी त्यांना जादा प्रदान झालेल्या रक्कमेबाबतचा प्रस्ताव स्वतंत्रपणे सादर करणेबाबत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/९९४/२०१५, दिनांक ०१ जून, २०१५ अन्वये आदेशीत करणेत आले होते.

सदर दिनांक ०१ जून, २०१५ रोजीचा आदेश पारीत झाल्यानंतर श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं.६१०७/२०१५ दाखल केले. सदर

रिट अर्जावर मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.२३/०६/२०१५ रोजी वेतनातुन वसुली करु नये असा आदेश पारीत केलेला आहे. त्यानंतर श्री.गमे यांनी सादर केलेल्या रिट अर्जावर संस्थानने दिनांक ३१/०७/२०१५ रोजी रिप्लाय ॲफीडेव्हीट सादर केले.

तत्कालीन, मुख्यलेखाधिकारी यांनी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९९४/२०१५, दिनांक ०१ जून, २०१५ रोजीच्या आदेशातील तरतुदीनुसार श्रीसुर्यभान विठ्ठलराव गमे यांची फेर वेतन निश्चिती केली. सदर फेर वेतन निश्चितीबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१७७३/२०१५, दिनांक १२/०८/२०१५ अन्वये आदेश पारीत करुन श्री.गमे यांना दि.०१/०७/२०१५ पासून मुळवेतन रु.१६,२३०/- अधिक ग्रेड पे रु.५४००/- या दराने अदा करणेत यावे असे आदेशीत करणेत आले.

त्यानंतर श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे यांनी दि०५/०६/२०१५, दि.१५/०८/२०१५ व दि.०२/०९/२०१५ रोजीचे विनंती अर्ज करुन सदरची फेर वेतन निश्चिती बाबत काढलेले आदेश रद्द होणेबाबत विनंती केली सदर विनंती अर्ज मा.त्रिसदस्य समिती दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आले होते. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मा.त्रिसदस्य समितीने निर्णय क्र.३२४ नुसार "सदरहू बाब प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे या विषयावर नियमानुसार यथायोग्य निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. परंतु असे करत असतांना श्री.गमे यांना दिलेल्या ६ वेतनवाढी या नियमास अनुसरून दिल्या गेल्या आहेत काय, त्यावेळचे व्यवस्थापन मंडळाचा तसा स्पष्ट आदेश आहे काय, या सर्व गोष्टींचा कायदेशीर अभ्यास प्रशासनाने करावा. सर्व बाबींची निपक्षपातीपणे कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी व त्याचा कार्यवाही अहवाल सादर करावा," असा निर्णय घेतला आहे. सदर निर्णयास अनुसरून श्री.गमे यांचे वेतन वाढीसंदर्भात सर्व संबंधीत कागदपत्रांची व अभिलेख्यांची पाहणी केली असता व सदर प्रकरणाबाबत सर्व गोष्टींचा कायदेशीर अभ्यास करुन व चौकशी करुन आस्थापना विभागामार्फत दि.०१/०१/२०१६ (कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं.८६२८, दि.०८/०१/२०१६) रोजीचा तपशिलवार अहवाल सादर करणेत आला. (सोबत आस्थापना विभागाकडील दि.०१/०१/२०१६ रोजीचे टिपणीची / अहवालाची प्रत पान नं.१ ते २० जोडली आहे.)

श्री.गमे यांचे वेतनवाढी संदर्भात सर्व संबंधित कागदपत्रांची व अभिलेख्यांची पडताळणी केली असता, खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**निरीक्षणे:-** १) श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे यांना दि०८/०४/१९९९ रोजीचे आदेशान्वये दि.२६/१०/१९९८ पासून त्यांच्या मागणीनुसार एकत्रित वेतन रु.६५००/- वेतन मिळणेसाठी पाचव्या वेतन आयोगाच्या रु.४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीमध्ये एकत्रित वेतन रक्कम रु.६५००/- देणेसाठी रु.१२५/- च्या ६ जादा वेतनवाढी मंजूर केल्याचे दिसून येते.

२) दि.३१/०७/२००४ व दि.०१/०८/२००४ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.३८८ नुसार श्री.गमे यांना रु.४५००-१२५-७००० ऐवजी वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० मंजूर करण्यात आलेली आहे. त्यामुळे श्री.गमे यांचे वेतन रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे श्री.गमे यांना यापुर्वी रु४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीमध्ये दिलेल्या ६ जादा वेतनवाढी नविन वेतनश्रेणी लागू झाल्यानंतर त्या वेतनश्रेणीमध्येच समाविष्ट आहेत. त्यामुळे समितीची मंजूरी नाही असा निष्कर्ष योग्य नाही.

३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ हा संस्थानसाठी शासनाचा अधिनियम दि.१४ ऑगस्ट, २००४ पासून लागू करण्यात आलेला आहे. त्यातील कलम नं.१६ नुसार संस्थानमधील कायम कर्मचा-यांना नियत दिवसाच्या लगतपूर्वी जे वेतन लागू होते ते वेतन संरक्षीत(Protect) करणेत आलेले आहे.

४) तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाचे Civil Appeal No.11527/2014 मधील दि.१८/१२/२०१४ रोजीचे आदेशानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनातून पाच वर्षापूर्वी जास्तीच्या दिलेल्या वेतनाची वसुली करु नये, असे आदेशीत करणेत आलेले आहे.

५) वरील सर्व बाबी पाहता, श्री.गमे यांना दि.२६/१०/१९९८ रोजी मंजूर केलेल्या ६ जादा वेतनवाढी समितीच्या दि.३१/०७/२००४ व दि.०१/०८/२००४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३८८ नुसार रु.५५००-१७५-९००० वेतनश्रेणी मंजूर केलेली असल्याने त्यांच्या वेतनास समितीची मंजूरी नाही, असे म्हणता येणार नाही.

उपरोक्त प्रमाणे दिनांक ०१/०१/२०१६ रोजीचे चौकशी अहवालातील निष्कर्षास / निरीक्षणास अनुसरुन सामान्य प्रशासन विभाग जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/१२३२/२०१६, दिनांक ०४ जुलै, २०१६ अन्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत आला आहे. (सोबत जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१२३२/२०१६, दिनांक ०४ जुलै, २०१६ रोजीचे आदेशाची प्रत पान नं.२१ ते २२ जोडली आहे.)

**आदेश:-** उपरोक्त निरिक्षणे व वस्तुस्थिती यांचा विचार करता, श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे वेतन निश्चितीतील अनियमिततेबाबत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९९४/२०१५ दि.०१ जून, २०१५ रोजीचा आदेश व फेर वेतन निश्चितीबाबत जा.नं. एसएसएस/साप्रशा/आस्था/१७७३/२०१५ दि.१२ ऑगस्ट, २०१५ रोजीचा आदेश रद्द करणेत येत आहेत. श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.६१०७ /२०१५ ही कोर्ट केस मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथुन मागे घ्यावी. त्यानंतर सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करावा.

उपरोक्त आदेशास अनुसरुन श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.६१०७/२०१५ ही कोर्ट केस मागे घेणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दि.०७/०७/२०१६ रोजी विनंती अर्ज दाखल केला होता. सदर विनंती अर्जावर दि.११/०७/२०१६ रोजी सुनावणी होऊन मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्र.६१०७/२०१५ संदर्भात दि.११/०७/२०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश करुन सदर रिट पिटीशन निकाली काढले आहे. (सोबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट पिटीशन क्र.६१०७/२०१५ संदर्भात दि.११/०७/२०१६ रोजी केलेल्या आदेशाची प्रत पान नं.२३ ते २४ जोडली आहे.)

Oral Order:- "Learned Counsel appearing for the petitioner, on instructions, submits that in view of subsequent events after filling this petition, the petitioner's grievance has been redressed. In that view of the matter, learned counsel for the petitioner seeks liberty to withdraw the petition.

2. Liberty is granted as prayed for.

3. The writ petition is dismissed, as withdrawn. "

उपरोक्तप्रमाणे श्री.एस.व्ही.गमे यांनी रिट पिटीशन क्र.६१०७/२०१५ मागे घेतलेबाबत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दिनांक११/०७/२०१६ रोजीचे आदेशासंदर्भात दिनांक १८/०७/२०१६ रोजीचा अर्ज सादर केला आहे. (सोबत दिनांक १८/०७/२०१६ रोजीचे अर्जाची प्रत पान नं.२५ ते २६ जोडली आहे.)

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०५, निर्णय क्र.३२४ नुसार श्री.एस.व्ही.गमे यांचे ०६ जादा वेतनवाढी संदर्भातील सदर प्रकरणाबाबत चौकशी करुन दिनांक ०१/०१/२०१६ रोजीची तपशिलवार टिपणी / अहवाल सादर करणेत आला आहे. सदर अहवालातील निरीक्षणे व निष्कर्षास अनुसरुन श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे वेतन निश्चितीतील अनियमितता व फेर वेतन निश्चिती बाबत पारीत करणेत आलेले जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/९९४/२०१५, दिनांक ०१ जून, २०१५ व जा.क्र. एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ १७७३/ २०१५, दिनांक १२/०८/२०१५ रोजीचे आदेश सामान्य प्रशासन विभाग जा.नं. एसएसएस/ साप्रशा/आस्था/ १२३२/२०१६, दिनांक ०४ जुलै, २०१६ रोजीचे आदेशान्वये रद्द करणेत आलेले आहेत.

तसेच श्री.एस.व्ही.गमे यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेले रिट पिटीशन क्र.६१०७/२०१५ ही कोर्ट केस मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथून दिनांक ११/०७/२०१६ रोजी मागे घेतलेली आहे. सबब सदर प्रकरणाची कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे त्याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेणेकामी सविनय सादर.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील विषय नं.०५ व निर्णय क्र.३२४ चे कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२२** **श्री साई प्रसादालयातील उपभांडार विभागाचे भिंती बंदिस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तसेच भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे श्री साई प्रसादालयातील उपभांडार मध्ये लाडू निर्मिती विभागाचे माल साठविणेकरीता स्वतंत्र हॉल आहे. सदर हॉलमध्ये दाळ दळणे, निवडणेकामी मशिनरी बसविण्यात येणार आहे. सदरहू मशिनद्वारे उडणारे पीठ इतरत्र मालावर अथवा कार्यालयात पसरु शकते. याकरीता प्र. अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांनी सदर उपभांडार बंदिस्त करणेबाबत प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांनी दि.१४/०२/२०१६ रोजीचे पत्राने इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईप्रसादालयातील उपभांडार मध्ये सदर हॉल बंदीस्त करणेसाठी ॲल्यु. पार्टिशन करता येईल. त्यासाठी खालील तपशिलाप्रमाणे खर्च येईल.

| Sr. no. | Description | Size | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Providing and fixing in position powder coating extruded alluminium partition having frame made out of alluminium extruded tubular section of size 65mm *40mm with 12mm thk. Three layered flat pressed T.W. particle board bonded with BWP type exterior grade phenol formaldehyde synthetic resin confirming to IS 12823-1990. Laminated on both sides, novateak or equivalent or equivalent, as per approved detailed drawings etc. complete. | 616 | $ft^2$ | 180.00 Per $ft^2$ | 1,10,880/- |
| | | | | **Total Amount:-** | **1,10,880/-** |

उपरोक्त तपशिलानुसार सदरहूकामी रक्कम रु.१,१०,८८०/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणा-या खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागावून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलप्रमाणे श्री साई प्रसादालयातील उपभांडार विभागाच्या भिंती बंदिस्त करणेचे काम करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,१०,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यता आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **साईआश्रम धर्मशाळा येथील डॉरमिटरी हॉल्सकरीता लॉकर्स देणगी दाखल स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:**

अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, “मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे” अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:**

०१. दि.२८/०४/२०१२ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र.365 संमत करण्यात आलेला आहे.

*"......यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साई आश्रम भाग-०२ चे हॉलसाठी एकूण ५७६ नग लॉकर्स युनिट (३४५६ नग लॉकर्स) खरेदीकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,०३,६८,०००/-- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. "*

०२. दि.१७/०९/२०१३ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.६२५ अन्वये खालीलप्रमाणे *निर्णय संमत करण्यात आलेला आहे.*

*" ....यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरकामी Minimum Qualifying Criteria शिथिल करुन नव्याने ई-टेंडर पध्दतीने निविदा मागविणेचे प्रस्तावास मान्यता देण्यात आली."*

०३. दि.१२/०६/२०१४ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.४५४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत करण्यात आलेला आहे.

*"साई आश्रम प्रकल्पाचे भाग-०२ येथील डॉरमिटरी हॉल्समध्ये ठेवणेसाठी आवश्यक असलेले लॉकर्स देणगी स्वरुपात मिळणेसाठी देणगीदार साईभक्तांना विचारणा करणेत यावी सदरहू लॉकर्स देणगी स्वरुपात मिळाले नाही. तर याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सूचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी,असे ठरले".*

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा आदेश**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील PIL No.१८/२०११ मधिल सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२६९५/२०१२ व १४३७२/२०१२ वर दि.२०/०२/२०१३ रोजी झालेल्या आदेशातील कलम १२ अन्वये मे. कोर्टाने सदरहु कामासाठी येणारे रक्कम रु.१,०३,६८,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे.

**प्रस्तावना:** साई आश्रम भाग-०२ (साई धर्मशाळा) येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये ठेवणेसाठी लॉकर्स खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०९/२०१३ रोजीचे निर्णयान्वये वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन तसेच शासनाचे ई-टेंडर वेबसाईटवर निविदा प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर प्राप्त ई-निविदा दि.१२/०६/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आले असता त्यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे निर्णय क्र. ४५४ संमत करण्यात आलेला आहे.

त्यानुसार मुख्य लेखाधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांना इकडिलविभागामार्फत दि.१६/०८/२०१४ व दि.०९/०३/२०१५ रोजी पत्र पाठवून, लॉकर्स देणगीदाखल प्राप्त करणेसाठी इच्छुक देणगीदारांना विनंती करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापी जनसंपर्क विभाग विभागाने दि.१६/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, एवढी मोठी देणगी देणारा देणगीदार साईभक्त अद्यापर्यंत मिळालेला नाही व मिळेल असे वाटत नाही. तसेच लेखाशाखा विभागाने देखील दि.१६/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे कि, देणगी काऊंटर वर येणारे साईभक्त एक ते दोन लाखापर्यंत देणगी देत असतात. भविष्यात कोणी साईभक्त मोठया स्वरुपात देणगी देण्यास तयार असल्यास बांधकाम विभागास कळविण्यात येईल.

साईधर्मशाळा (साईआश्रम भाग-०२) परिसरातील सहा इमारतींपैकी एका इमारतीमध्ये सध्या ज्युनिअर कॉलेजचे वर्ग भरविण्यात येतात. त्यामुळे सध्या उर्वरित पाच इमारतींमध्ये ठेवण्यासाठी एकूण ४८० नग लॉकर्सची आवश्यकता आहे. परंतू भविष्यात ज्यु. कॉलेज सदर ठिकाणाहुन स्थलांतरीत झाल्यावर सदर इमारत भक्तांकरीता वापरात येईल व त्याठिकाणी देखील लॉकर्सची आवश्यकता भासेल. त्यामुळे मा.श्री.रमणी सो देणगीदाखल देत असलेले ६०० नग लॉकर्सची देणगी स्विकारता येईल व सध्या प्रत्येक हॉलमध्ये ०३ एवजी ०४ लॉकर्स ठेवता येतील.

**प्रस्ताव/ स्पष्ट मत:-** तरी देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी, मॅनेजींग ट्रस्टी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देणगीदाखल देऊ केलेल्या रु.५८,२०,०००/- मात्र किंमतीचे ६०० नग एम.एस. लॉकर युनिटस् स्विकारणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम धर्मशाळा येथील डॉरमिटरी हॉल्सकरीता देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी, मॅनेजींग ट्रस्टी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देणगीदाखल देऊ केलेल्या रु.५८,२०,०००/- मात्र किंमतीचे ६०० नग एम.एस. लॉकर युनिटस् देणगी दाखल स्विकारणेस मान्यता देण्यात आली.**

**श्री.के.व्ही. रमणी, मॅनेजींग ट्रस्टी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी यापुर्वीही संस्थानला मोठ-मोठया देणग्या देऊन सहकार्य केलेले आहे, याबद्दल सभेने श्री.के.व्ही. रमणी, मॅनेजींग ट्रस्टी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे अभिनंदन केलेव तसे त्यांना अभिनंदन पत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **श्री साईप्रसादालय येथील अन्नदान कक्षात (लाडू पॅकींगकक्ष) मध्ये अंतर्गत रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमाचे कलम– २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थच्या मालमत्तांची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साई प्रसादालय येथील अन्नदान कक्ष (लाडू पॅकींग कक्ष) मधील अंतर्गत रंगकाम खराब झाले आहे. रंगकाम खराब झालेले असल्यामुळे रंगाचे पोपड लाडू तयार करण्याचे बुंदी मध्ये पडली जातात. याकरीता प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग यांनी दि१९/०२/२०१६ रोजीचे मंजुर पत्रान्वये इकडील विभागास अंतर्गत रंगकाम करणेबाबत विनंती केली आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त विषयांकीत कामी खालील तपशिलाप्रमाणे रंगमटेरिअल व रंगकाम मजुरीची आवश्यकता आहे.

**अ) रंगमटेरीयल खर्च:-**

| अ.नं. | मटेरिअल तपशिल | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ऑईल बेस लस्टर ( ऑईल बेस) एशियन २० लिटर X १२ बकेट | २६० लिटर ( १२ बकेट) | ४२००/- प्र. किलो | ५०,४००/- |
| ०२ | वॉल पुट्टी सुपर फाईन(एशियन) ४० किलो X ६ बॅग | ६ बॅग | ९००/- प्र.बॅग | ५४००/- |
| ०३ | स्टेनर ५० मिली | ०४ नग | २५/- प्र.नग | १००/- |
| ०४ | टरपेन | २० लिटर | ९०/- प्र.लि. | १८००/- |
| | | | **एकूण रक्कम रु.** | **५७,८००/-** |

**ब) मजुरी खर्च:-**

| अ.नं. | रंगकामाचा तपशिल | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | जुना रंग घासुन टचअप पुटटी करुन डबलकोट लस्टर पेंट रोलरच्या साहायाने करणे. | ११६०० चौ. फुट | २.५० प्र. चौ. फुट | २९०००/- |
| | | | **एकुण रक्कम रु.** | **२९,०००/-** |
| | | | **एकुण खर्च (अ+ब)** | **८६,८००/-** |

उपरोक्त तपशिलानुसार सदरहू रंगकाम करणेकामी रक्कम रु. ८६,८००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी येणा-या खर्चास व सदरचे रंगकाम करणेकामी रंगमटेरियल खरेदीकरीता व रंगकाम मजुरीकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करणेस मान्यता मिळणेस विंनती.

**निर्णय क्र.४६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील अन्नदान कक्षा (लाडू पॅकींगकक्ष) मध्ये अंतर्गत रंगकाम करुन घेणेकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे रंगमटेरियल खरेदी व रंगकाम मजुरीकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू कक्षामध्ये शिसेविरहीत (Lead-free) रंग देण्यात यावा, अशा सुचना देण्यात आल्या.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **कनकुरी साठवण तलाव क्र.1 येथे पंप रुम तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१) दि.१२/०४/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २८५ खालील प्रमाणे समंत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफींग (Geomembrane Sheet) करणेकामीच्या प्रस्तावीत कामासाठी तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. १०.६५ कोटी मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यावाही करणेत यावी, असे ठरले.''

२) दि.१६/०४/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ११४ खालील प्रमाणे समंत झालेला आहे. ( निविदा प्रक्रियेबाबत व ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत)

"यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलावास कॅन्व्हास प्रुफींग (Geomembrane Sheet) करणेकामी उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च

न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपिठाची मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यावाही करणेत यावी, असे ठरले.''

**मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठ यांचा आदेश**

पी.आय.एल. नं.१८/२०११ वर सिव्हील अॅप्लीकेशन नं. ५८१८/२०१४ वर मा. उच्च न्यायालयाने या प्रकरणी खर्चास व सदरहू कामास मान्यता दिलेली आहे.

**प्रस्तावनाः–** श्री साईबाबा संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावात Geomembrane Sheet टाकणे कामी पाणी पुरवठा विभागामार्फत ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांची नियुक्तीकरणेत आली होती. सदरहू काम पूर्ण झाले आहे दि.३०/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये पाणी पुरवठा विभागाने साठवण तलाव क्र.०१ व ०३ येथे पंप रुमचे आर.सी.सी. बांधकाम करुन मिळणेबाबत कळविले आहे. सदर ठिकाणी यापूर्वी एम.एस. स्ट्रक्चरमध्ये पंप रुम तयार केलेले होते. साठवण तलाव क्र.०१ मधील सदर सुस्थितीत असलेले पंपरुम पाणी पुरवठा विभागामार्फत काढून टाकण्यात आले आहे. आता नविन पंप हाऊस तयार करणेसाठी डीझाईन व अंदाजपत्रक सल्लागार Infra Plan Engg. Services, Pune यांचेकडूनइकडील विभागामार्फत तयार करुन घेण्यात आले आहे. त्यासाठी एकूण रक्कम रु.२,८९,७४१/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्तावः-** सदर पंप हाऊसचे कामांच्याबाबी हया वरील प्रकल्पाचे निविदेत समाविष्ट नसल्याने याकामी नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी लागेल. तरी विषयांकीत कामासाठी येणारे रक्कम रु.२,८९,७४१/- मात्रचे खर्चास व सदर पंप रुमचे काम विहीत पध्दतीने वर्तमान पत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव क्र.1 येथे पंप रुम तयार करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,८९,७४१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावाशेजारी महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीने एक साठवण तलाव तयार करुन संस्थानला देणगी दिलेला आहे, यामुळे संस्थानची बरीचशी पाण्याची गरज भागणार आहे. तसेच महिंद्रा अॅण्ड महिंद्रा हे त्यांच्या कंपनीमध्ये तयार झालेले प्रत्येक नवीन वाहन संस्थानला देणगीदाखल देऊन नेहमीच सहकार्य करत असतात, याबद्दल समितीने त्यांचे अभिनंदन केले व तसे त्यांना अभिनंदनपत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **सफाई कर्मचाऱ्यांसाठी रेनकोट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आरोग्य विभागामार्फत संस्थान इमारती आणि परिसरातील साफसफाई केली जाते. साफसफाईचे कामासाठी सफाई कर्मचाऱ्यांना आरोग्य रक्षणासाठी हॅण्ड ग्लोज, मास्क, गमबुट देण्यात येत आहेत तसेच सन २०१२ साली देणगी स्वरुपात मिळालेले चांगल्या प्रतीचे रेनकोट (पॅन्ट शर्ट) या विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांना देण्यात आले होते. देणगी मिळालेल्या रेनकोटची किंमत प्रती नग रु. ५७५/- होती रेनकोट वाटप करुन बरेच दिवस झालेले आहेत त्यामुळे रेनकोट खराब झालेले असल्यामे नविन रेनकोट देणे गरजेचे वाटते.

सध्या आरोग्य विभागाकडे एकुण १५८ कायम कर्मचारी + २१५ कंत्राटी अकुशल + ०५ कुशल कर्मचारी असे एकुण ३७८ कर्मचारी आहेत. ३७८ कर्मचाऱ्यांना प्रति कर्मचारी एक रेनकोट प्रमाणे ३७८ रेनकोट चांगल्या प्रतीचे खरेदी करावे लागतील. त्यासाठी अंदाजे प्रतीनग रु. ६०० प्रमाणे ३७८X६०० = २,२६,८००/- (अक्षरी रुपये दोन लाख सव्वीस हजार आठशे मात्र) इतका खर्च येईल. त्यासाठी सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकात बजेट तरतूद करण्यात आलेली आहे. सदरचे रेनकोट जनसंपर्क कार्यालयामार्फत देणगी स्वरुपात स्वीकारता येतील व देणगी न मिळाल्यास विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करता येतील.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागातील एकूण ३७८ कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी एकूण ३७८ नग रेनकोट देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारण्यात यावे, असे ठरले.**

**विशिष्ट कालावधीमध्ये ३७८ नग रेनकोट देणगी स्वरुपात प्राप्त न झाल्यास ते खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,२६,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे सफाई कर्मचाऱ्यांना पावसाळयापुर्वी रेनकोट मिळतील अशा प्रकारे कार्यवाही करणेत यावी, अशा सुचना दिल्या.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

**विषय नं.२७** **लॉन्ड्रीतील जुने मशिन बायबॅक देऊन नविन अत्याधुनिक मशिनरी अशंतः देणगी स्वरुपात स्विकारणे व उर्वरीत रक्कम अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १) १४, (२), (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे,

२) २१, (१), (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

३) २१, (१), (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

४) १७-४– विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा आधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणुन ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्तावना:-** सन २००० मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनस्त भक्तनिवासांमधील भक्तोपयोगी कपडे धुलाईसाठी स्वतंत्र लॉण्ड्री युनिट कार्यान्वित करण्यात आले, वेळोवेळी सुधारणा करुन कार्यक्षमता वाढविली आहे. सध्या या विभागाकडे असणा-या मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि. बेंगलोर या कंपनीच्या मशिनरींद्वारे प्रती महिन्यास ४०,००० कपडे धुतली तथा इस्त्री केली जातात. कंपनीचे प्रोप्रायटर श्री सुंदर बेलाणी हे साईभक्त असल्याने सन -२००० पासुन मेंन्टंनन्सची कामे मोफत करत आहे, आपण फक्त स्पेअरपार्टचे बील त्यांना आदा करतो. यापुर्वी बेंगलोर येथील कंपनीतुन दोन वेळेस हायड्रोएक्स्ट्रॅक्टर मशिन मोफत दुरुस्त करुन दिले आहे, सदरचे मशिन काही महिने वापरात येऊन नादुरुस्त झाल्याने श्री बेलाणी यांनी मागील परिशिष्ट 'ब' मध्ये नमुदप्रमाणे अ.नं ०४ चे मशिन देणगी दिले आहे.

साईभक्तांची वाढती संख्या, दैनंदिन येणा-या कपडयांची वाढती संख्या विचारात घेता व स्वच्छ धुलाई होणेसाठी सतत निरनिराळे प्रयोग या विभागामार्फत केले जातात. या क्षेत्रातील तंज्ञाचे मार्गदर्शन घेतले जाते. शेगाव संस्थान, मुंबई आदी ठिकाणी अभ्यास दौ-याचे आयोजन करुन सदर कामामध्ये योग्य तो बदल केला आहे. रुग्णालये, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा वगळता इतर विभागाचे कपडे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्री युनिटमध्ये धुतले जातात. सध्याची मशिनरी सुमारे १५ वर्षापासुन असल्याने व सततच्या वापराने वारंवार नादुरुस्त होत असते. त्यामुळे कामामध्ये व्यत्यय येऊन साईभक्तांना वेळेवर स्वच्छ धुतलेले कपडे पुरविणे अडचणीचे होते. त्यासाठी खालीलप्रमाणे नमुद नवीन अदयावत, स्वयंचलित मशिनरी मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि. बेंगलोर यांचे संदर्भ क्र.०२ चे विनंती पत्रानुसार अंशतः वस्तुरुप देणगी स्विकारल्यास दर्जा व संख्येमध्ये निश्चितच भर पडुन काम चांगले पध्दतीने चालेल व साईभक्तांना स्वच्छ बेडशिट, उशिकव्हर, चादर इ.पुरविणे सोयीचे होईल.

**मागणी:-** दि.०७/०१/२०१६ रोजीचे मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि.बेंगलोर यांनी दिलेल्या पत्र क्र.१९९५७ मध्ये आपणाकडील खालीलप्रमाणे मशिनरी बायबॅक देवून नविन स्वयंचलित अदयावत मशिन पुरविणे बाबत तथा काही रक्कम किंमतीचे देणगी देण्याचे प्रस्तावीत केले आहे.

**परिशिष्ट "अ"**

**नविन घ्यावयाच्या अदयावत मशिनरींची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे.**

| अ.नं | मशिनचे नाव | क्षमता | कर्मचारी संख्या | कार्यपध्दती | किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | रामसन्स वॉशर एक्सट्रॅक्टर मशिन Model-RVWE | 60 kg. | ०१ | या मशिमध्ये ६० किलो क्षमतेचे कपडे धुवून पिळली जातात. तसेच केमिकल/ डिटर्जंट टाकणे व पाणी घेणे/सोडणे हया प्रकिया स्वयंचलीत होत असतात. त्यामुळे ओले कपडे काढावे लागत नाही. या मशिनकरीता एकच कर्मचारी लागेल. | ११,६६,०००/- |
| २ | रामसन्स वॉशर एक्सट्रॅक्टर मशिन Model-RVWE | 45 kg. | ०१ | या मशिमध्ये ४५ किलो क्षमतेचे कपडे धुवून पिळली जातात. तसेच केमिकल/ डिटर्जंट टाकणे व पाणी घेणे/ सोडणे हया प्रकिया स्वयंचलीत होत असतात. त्यामुळे ओले कपडे काढावे लागत नाही. या मशिनकरीता एकच कर्मचारी लागेल. | ९,६८,०००/- |
| ३ | कॅलेंडर मशिन Ramsons Flat Work Ironer-roll Heated Model-RFWI-0630S | (3000X 600 MM) | ०४ | या मशिनमध्ये डबलचे बेडशिट प्रेस होतात मशिनची लांबी जादा असल्याने डबलचे बेडशिटला व्यवस्थीत इस्त्री होईल, तसेच कपडे इस्त्री होण्याच्या संख्येत वाढ होईल. | १०,६७,०००/- |
| | | | | **एकूण किंमत -** | **३२,०१,०००/-** |
| | | | | **विशेष सुट २० % -** | **६,४०,२००/-** |
| | | | | **एकुण पायाभुत किंमत -** | **२५,६०,८००/-** |

संस्थानचे अंतर्गत लेखा परीक्षण विभागाने काढलेली घसारा वजा किंमत व मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि. बेंगलोर या कंपनीने देवू केलेली बायबॅक किंमतीचा तपशिल खालीलप्रमाणे

**परिशिष्ट "ब"**

**जुने बायबॅक करावयाच्या मशिनरींचा तपशिल-**

| अ.नं | तपशिल | संगणक कोड | खरेदी/देणगी दिनांक | खरेदी किंमत | घसारा वजा किंमत | कंपनीने दिलेली किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रामसन्स इंडस्ट्रीयल वॉशिंग मशिन (५० किलो क्षमतेचे) **(खरेदी)** | MCN/6019 | ०७/०४/२००० (संस्थान खरेदी ) | ८६,५२१/- | १,७५८.७४/- | ७५,०००/- |
| २ | इंडस्ट्रीयल टाईप हायड्रो-एक्सट्रॅक्टर रामसन्स (३० किलो क्षमतेचे) **(खरेदी)** | MCN /6021 | ०७/०४/२००० (संस्थान खरेदी) | ४७,४३८/- | ९६४.२८/- | ३०,०००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | रामसन्स कॅलेंडर मशिन (Flat Work Ironer) **(देणगी)** | MCN /6033 | ३१/१२/२००९ (वरुण इंडस्ट्रीज) | ३,४६,५१४/- | ७१,९५०.७२/- | २,००,०००/- |
| ४ | रामसन्स हायड्रोएक्स्ट्रॅक्टर स्मॉल वीत ॲसेस (३० किलो क्षमतेचे) **(देणगी)** | MCN /6034 | ०२/०५/२०१३ (श्री सुंदर बेलाणी) | ४५,०२८/- | २५,३२८.२५/- | ४०,०००/- |
| | | | **एकूण बेरीज -** | **५,२५,५०१/-** | **१,००,००२/-** | **३,४५,०००/-** |

मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि.बेंगलोर या कंपनीने नवीन मशिनच्या किंमतीमध्ये स्पेशल डिस्काऊंड, देणगी स्वरुपात तथा बायबॅकची रक्कम वजा करता खालीलप्रमाणे रक्कमेची मागणी केलेली आहे.

**परिशिष्ट "क"**

| **तपशिल** | **एकूण किंमत** |
|---|---|
| परिशिष्ट 'अ' नुसार होणारी किंमत | २५,६०,८००/- |
| परिशिष्ट 'ब' नुसार जुन्या मशिनची बायबॅक किंमत | -३,४५,०००/- |
| बायबॅक किंमत वजा जाता एकूण रुपये | २२,१५,८००/- |
| कंपनी तर्फे देणगी रुपये | १४,४०,८००/- |
| एकूण रुपये | ७,७५,०००/- |
| अबकारी कर १२.५% | ९६,८७५/- |
| करपात्र रक्कम | ८,७१,८७५/- |
| CST १४.५% | १,२६,४२१/- |
| एकूण देय रक्कम | ९,९८,२९६/- |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** मे.रामसन्स गारमेंन्ट फिनिशिंग इक्वीपमेंन्ट प्रा.लि बेंगलोर यांचेकडील दि.०७/०१/२०१६ चे पत्रात नमुद केल्याप्रमाणे अदयावत स्वयंचलित, मॅन पॉवर सेव्हर, एनर्जी सेव्हर, एकुण ०३ मशिन अंशत: देणगी दाखल स्विकारुन त्यांना लेखाशाखा विभागामार्फत देणगी पावती देता येईल तसेच अंतर्गत लेखा परीक्षण विभागाने ०४ मशिनची घसारा वजा किंमत रुपये १,००,००२/- (अक्षरी रुपये एक लाख दोन रुपये मात्र) इतकी निश्चित केली आहे. सदर कंपनीला आपणाकडील जुने मशिन बाय बॅक करुन उर्वरीत रक्कम सर्व करांसह रु.०९,९८,२९६/- (अक्षरी रु. नऊ लाख, अठ्यान्नव हजार, दोनशे शहान्नव मात्र) अदा करावे लागतील.

आपणाकडील वापरात असलेली ०४ मशिनची घसारा वजा जाता किंमत रु.५०,०००/- (अक्षरी रु. पन्नास हजार) पेक्षा जास्त असल्याने अधिनियम २००४ मधील १७-४ चे तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता मिळालेनंतर ०४ मशिन मे. रामसन्स गारमेंट फिनिशिंग इक्वीपमेंट प्रा.लि. बंगलोर यांना परत देता येईल तसेच आपणांस अदा करावयाची रक्कम रु. दहा लाखाचे आंत असल्याने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

सदरच्या खर्चाची तरतुद सन २०१६/२०१७ चे मशिनरी दुरुस्ती व देखभाल या शिर्षात करता येईल. मशिनची स्विकृती संस्थानचे मॅकेनिकल विभागाचे मार्गदर्शनाखाली व निर्देशानुसार तथा तांत्रिक बाबींची शहानिशा, खातरजमा करुन करता येईल.

तरी मे.रामसन्स गारमेंट फिनिशिंग इक्वीपमेंट प्रा.लि. बंगलोर यांना रु०९,९८,२९६/- (अक्षरी रु. नऊ लाख, अठ्यान्नव हजार, दोनशे शहान्नव मात्र) अदा करणेकामी मान्यता मिळणेस सदरचा विषय मा.त्रिसदस्यिय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासकडील लॉन्ड्रीतील जुने ०४ मशिन मे.रामसन्स गारमेंट फिनिशिंग इक्वीपमेंट प्रा.लि. बंगलोर यांना परत देऊन नविन अत्याधुनिक ०३ नग लॉण्ड्री मशिनरी अशंत: देणगी स्वरुपात स्विकारणेस व उर्वरीत रु.०९,९८,२९६/- मात्र रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**परंतु शासन अधिनियम- २००४ अन्वये जुन्या ०४ नग लॉण्ड्री मशिन्स परत (बायबॅक) करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.२८** **जुने अंथरुण-पांघरुन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) १७ चा (३)- विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही मालमत्ता राज्यशासनाच्या पुर्व परवानगीने असेल त्या खेरीज समितीकडुन एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य सक्रांमित करण्यात येणार नाही.

२) १७ चा (४)- विश्वस्त व्यवस्थेमध्ये निहित केलेले पन्नास हजार रुपयेपेक्षा अधिक किमंतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्यशासनाच्या लेखीपुर्व मंजुरीने असेल त्या खेरीज समितीकडुन विकण्यात येणार नाही, तारण म्हणुन ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही.

३) २१ चा २ (१)– ग मध्ये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने कोणतीही शैक्षणिक संस्था क्रिडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक ग्रंथालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी, आधारगृह किंवा इतर धर्मदाय संस्था किंवा सोसायटी नोंदणी नियम १८६० अन्वये नोंदणी केलेली कला साहित्य या क्षेत्राशी संबंधित असलेली कोणतीही अन्य बीगर वाणिजीक सांस्कृतीक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्यांची देखभाल करणे किंवा नागरी सेवा व सुविधा यांचेमध्येसुधारणा, वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्थानला अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतीस अर्थसहाय देणे असे नमुद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव-** दि.२७/०४/२०१३ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील समंत विषय नंबर-५८ निर्णय क्रं-४०१.

**प्रस्ताविक-** संस्थान अधिनस्त साईभक्त निवासस्थानामध्ये साईभक्तांना वापरणेकामी बेडशीट,चादर, ब्लॅकेट व टॉवेल आदी कापडी वस्तु देत असतो. सदर कापडी वस्तुचे आयुष्यमान मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेमधील समंत विषय नंबर-५८ निर्णय क्रं-४०१ नुसार १८ महिन्याचे निश्चित केले आहे. मुदती पश्चात सदरच्या वस्तु वार्षीक निश्चित केलेल्या दराने अथवा लिलावाने विकण्यात येतात त्याव्दारे जमा रक्कम संस्थान कोषात जमा केली जाते.

दि.१३/०६/२०१६ चे पत्राने मुख्याध्यापक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक/ माध्यमिक व उच्च-माध्यमिक आश्रमशाळा, खरशेत ता- त्रिंबक, जि- नासिक यांनी जुने ५०० नग आंथरुण पांघरुन आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना वापरणेकामी संस्थानमार्फत देणगीरुपाने मिळणेबाबत विंनती केली आहे.

**विभागाची मागणी-** विभागाकडील सर्व स्थावर, जगंम तथा किरकोळ वस्तुच्या नोंदी डेडस्टॉक रजिस्टरला घेऊन प्रत्येक वस्तुस ठराविक संगणकीय कोड नंबर देऊन वस्तुनिहीत करण्यात आलेली आहे. प्रस्तुतच्या वस्तुच्या प्रमाणीत यादया प्रतीवर्षी संस्थानचे लेखाशाखेमार्फत महाराष्ट्र शासनास सादर करण्यात येतात. महाराष्ट्र शासनाचे वर उल्लेख केलेल्या अधिनियमामध्ये निहीत केलेल्या कोणत्याही वस्तु अन्य सक्रांमीत करता येणार नाही अशी तरतुद आहे. संबंधित आश्रमशाळेने मागणी केलेल्या कापडी वस्तु किरकोळ स्वरुपाच्या असुन त्या Consumable Item या सदरात मोडत असल्याने त्यासाठी शासनाची पुर्वमंजुरीघेणे आवश्यक नाही. विभागाकडे खालीलप्रमाणे कापडी वस्तु विहीत वापरमर्यादा संपल्याने साईभक्तांच्या सेवेतुन काढून घेतलेल्याआहेत.

| अ.नं. | तपशिल | संगणक कोड | नग | रक्कम | वस्तु वापर दिनांक | ॲसेट टाईप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रग (ब्लॅकेट) | CLT- ६०२१ | १०८१ | १,१८,९१०/- | २२/०७/१९९५ | MISC |
| २ | रग (ब्लॅकेट) | CLT- ६०३९ | ९८ | ७,८४०/- | २३/०१/२००३ | MISC |
| ३ | ब्लॅकेट | CLT- ६०६७ | १०० | १०,०००/- | १३/०१/२००६ | MISC |

साईभक्तोपयोगी कापडी वस्तु प्रती १८ महिन्यानी बदलण्यास व बदलेल्या वस्तु लिलाव अथवा वार्षीक उच्चतम दराने विकण्यास मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. वरीलप्रमाणे विभागाकडे साईभक्तांनी वापरलेल्या परंतु चांगल्यास्थितीतील पुर्नवापरण्यास योग्य अशा कापडी वस्तु उपलब्ध आहेत.

**संस्थान अधिनियम व ठराव यानुसार छाननी करुन अनुमान-** महाराष्ट्र शासनाने समंत केलेल्या अधिनियम-२००४ नुसार तथा मा. व्यवस्थापन मंडळाने मान्य केलेल्या ठरावानुसार व अशा कापडी वस्तु विभागाकडे शिल्लक असल्याने देता येतील.

**विभागाचा अभिप्राय-** संबंधित आश्रमशाळेचे कार्य निश्चितच उदार व समाजउपयोगी आहे. मागणी केलेल्या कापडी वस्तुपैकी ब्लॅकेट आपणाकडे उपलब्ध असुन त्याचा साईभक्तांसाठीचा वापर बंद केलेला आहे. सदर संस्थेस त्यांचे मागणी प्रमाणे ५०० नग ब्लॅकेट पुरविता येतील परंतु त्यासाठी पुढीलप्रमाणे काही तांत्रिक बाबींची पुर्तता करावी लागणार आहे.

१) मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सदर प्रस्तावास मान्यता घ्यावी लागणार आहे. (या पुर्वीही मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेमधील विषय नं.५८ व निर्णय क्र.४०१ नुसार मान्यता घेण्यात आलेली होती)
२) प्रस्तुत आश्रमशाळेचे नोंदणी प्रमाण पत्राची तपासणी करुन सदर आश्रमशाळा शासन अनुदानीत आहे किंवा कसे याबाबत माहिती घेवून कार्यवाही करणेस,
३) प्रस्तुत आश्रमशाळेच्या पदाधिका-यांना सदरचे वापरलेले परंतु चांगल्यास्थितीतील ५०० नग ब्लॅकेट समक्ष दाखवून ना हरकत प्रमाणपत्र संस्थेच्या लेटरहेड वर घेणेस,
४) जेवढया कापडी वस्तु मागीतलेल्या आहेत (वापरलेल्या परंतु पुर्नवापरासाठी योग्य असल्यास) देणेस व पोहोच पावती घेणेकामी, सदरचा विषय मा.त्रिसदस्यिय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वापरलेल्या, टाकाऊ वस्तु आश्रमशाळेस भेट देणे योग्य नाही व त्यामुळे संस्थानची बदनामी होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही, या बाबींचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.२९** **गाद्या खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मागे घेणेबाबत व प्रकरण निरस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साई धर्मशाळा हा विभाग दिनांक १३/०७/२०१३ पासुन नविन सुरु करण्यात आलेला आहे. या ठिकाणी एकुण ६ इमारती असून त्यापैकी एक इमारत श्री साईबाबा संस्थान संचलीत कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास दिलेली आहे. उर्वरीत प्रत्येक इमारतीमध्ये ३२ हॉल असे एकुण ५ इमारतीमध्ये १६० हॉल असुन त्यामध्ये साईभक्तांची तसेच पालखीधारक व पदयात्रीचीं निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

दि.०५/०६/२०१४ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.४२४ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन. फोम गाद्या खरेदी करणेबाबत व त्याकामी येणारे खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

मा.व्यवस्थापन समिती दि.०५/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.४२४ नुसार खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

| अ.नं | तपशिल |
|---|---|
| १ | दि.०५/०६/२०१४ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४२४ नुसार रु.४१,७८,१६०/- या रकमेस गाद्या खरेदीस मान्यता. |
| २ | सिव्हील ॲप्लीकेशन नं.१०४२४/२०१४, PIL/18/2011 चे दि.२२/१२/२०१४ च्या मा.उच्च न्यायालयाचे खंडपिठ औरंगाबाद यांची रु. ४१,७८,१६०/- खरेदीची मान्यता. |
| ३ | दि.२०/०१/२०१५ रोजीचे टिपणी वरील मा. मुख्यलेखाधिकारी यांचा शेरा (पुनर्प्रत्ययी आदेशाबाबत शासनाचे निर्णया नुसार कार्यवाही) |
| ४ | दि.१७/०२/२०१५ चे टिपणी नुसार पुन्हा गाद्या खरेदी कामी नव्याने रु.७५,६०,०००/- खर्चाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर सादर. |
| ५ | दि.१२/०३/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.८५ नुसार रु.७५,६०,०००/- खर्चास संस्थान वकीला मार्फत मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ अर्ज दाखल करणेस मान्यता. |
| ६ | दि.२३/०४/२०१५ रोजीचे मंजुर टिपणी नुसार सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणे बाबत विधी विभागास कार्यवाहीसाठी देण्यात आले. |
| ७ | विधी विभागाचे पॅनलवरील वकील यांचे फोन नुसार सदर ठेकेदार आहे त्याच दराने गाद्या देण्यास तयार आहे का ? असे त्यांचे पत्र घेणे बाबत सुचविले. |
| ८ | त्यानुसार गाद्या खरेदीचे मागील दरामध्ये गाद्या देणेस तयार असल्या बाबत ठेकेदाराचे दि.२९/०८/२०१५ रोजी चे पत्र. |
| ९ | नविन भक्तनिवास स्थान कडुन टु फोल्ड ८०० गाद्या प्राप्त झाल्याने फोम गाद्या खरेदी करण्याची आवश्यकता नाही असे विधी विभागास दि.१८/११/२०१५ रोजी पत्र दिले. |
| १० | दि. २३/११/२०१५ रोजी विधी विभागाचे पत्रानुसार मा. उच्च न्यायालयात दाखल केलेला सिव्हील अर्ज क्र.६८४९/२०१५ मागे घेण्यात यावा किंवा कसे याबाबत मा. कार्यकारी अधिकारी सो. यांची मान्यता घेवून इकडील कार्यालयास कळविण्यात यावे. असे सांगीतले. |
| ११ | दि.०१/०१/२०१६ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे स्वाक्षरीने गाद्या खरेदी करणे कामी मा.उच्च न्यायालायात सिव्हील अर्ज क्र.६८४९/२०१५ दाखल करण्यात यावा असे सांगीतले. |
| १२ | दि.२३/०२/२०१६ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात झालेल्या चर्चा नुसार नविन भक्तनिवास विभागाकडे गाद्या शिल्लक असल्यामुळे नविन फोम गाद्या खरेदी करु नये असे निर्देश देण्यात आले. |

यापुर्वी व्दारावती भक्त निवासामार्फत साईनगर येथे उत्सव व गर्दिच्या काळात मंडपामध्ये साई भक्तांची तात्पुरती निवासव्यवस्था कापुस गादी टाकुन करण्यात येत होती. त्यावेळी नविन कापुस गाद्या खरेदी करण्यात आलेल्या आहेत. आता साईआश्रम भाग- ०१ मध्ये व साई नगर परिसर येथे मंडप टाकण्यात येत नाही, त्यामुळे उपरोक्त गाद्या वापरा अभावी व्दारावती विभागात पडुन आहेत. सदर गाद्यांचा वापर साई धर्मशाळा विभागाकडील हॉलमध्ये कॉटवर टाकुन किंवा मंडपात टाकुन वापर करता येईल. तसेच ५०० रुम (नविन भक्तनिवास) याठिकाणाहून ८०० टु-फोल्ड फोम गाद्या साई धर्मशाळा विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत, त्याचाही वापर करता येईल, त्यामुळे नविन फोम गाद्या घेणे आवश्यक नाही, असे नम्र मत आहे.

यापुर्वी गाद्या खरेदी बाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतलेली असल्याने सध्या इकडील विभागासाठी गाद्या खरेदी करावयाचे नसल्याने मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्रकरण निरस्त करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी साई धर्मशाळा विभागाकडील मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार नविन फोमच्या गाद्या खरेदीबाबतची प्रक्रीया करणेबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल केलेला सिव्हील अर्ज क्र.६८४९/२०१५ मागे घेणेबाबत निर्णय मा.व्यवस्थापन समितीत घेवून प्रकरण निरस्त करणेचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळा विभागाकडे सध्या नवीन गाद्या घेण्याची आवश्यकता नसल्याने दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेमध्ये गाद्या खरेदीबाबत झालेला निर्णय क्र.४२४ रद्द करणेत येऊन, त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता घेण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मागे घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

**विषय नं.३०** **हॉल मधील लॉकर्स् व कॉटला नंबरींग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** निरंक

**प्रस्ताविक:-** साई धर्मशाळा विभाग दि.१८/०७/२०१३ रोजी पासुन साई हॉल भक्तांचे निवासव्यसस्थेसाठी सुरु करण्यात आलेला असून सदर विभागात A,B,C,D,E,F असे ६ इमारती असुन एकुण १९२ हॉल आहेत, पैकी डि' इमारत हि कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली असुन उर्वरीत५ इमारतीत पदयात्री. पालखीधारक व सहलीमध्ये सहभागी होणा-या साईभक्तांची उपलब्ध हॉलमध्ये निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

सदर विभागात साधारणपणे एका हॉलमध्ये २५ ते ३० साई भक्तांची निवासाची क्षमता आहे. असे एकुण निवासस्थानात १६० हॉल मध्ये ४,००० ते ५,००० निवासव्यवस्था करण्यात येते.

देणगीदार साईभक्त श्री. के व्ही रमणी, शिरडी साई ट्रस्ट, तामिळनाडु यांनी ६०० कपाट ( प्रति कपाट ६ लॉकर याप्रमाणे X ६०० कपाटात एकुण लॉकर संख्या ३६०० ) रुपये ५८,२०,०००/- किमंतीचे देणगी स्वरुपात देण्याबाबत विनंती अर्ज सादर करण्यात आलेला आहे.

साईभक्तांना आपले जवळील सामान सेवाआकार पावतीवरील असलेल्या त्याच नंबरचे लॉकरमध्ये ठेवता येईल. तसेच त्याच नंबरचा आरामासाठी पलंग( कॉट ) आरक्षित करता येईल यासाठी लॉकर्स व कॉटला रेडीयम व्दारे नंबरींग करणे आवश्यक आहे.

**अ) रेडीयम व्दारे लॉकरसाठी नंबरींग करणेकामी संख्याव तपशिल (लॉकरवरील नंबर)**

| तपशिल | एकुण इमारतीसाठी | एकुण इमारती | एकुण हॉल | एका इमारती मध्ये एकुण लॉकर संख्या | ५ इमारतीसाठी एकुण लॉकर संख्या | नंबरींग तपशिल | अंदाजे प्रती नग दर रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| साई धर्मशाळा | A-०१ ते A-३२ याप्रमाणे B,C,E,F, | ०५ इमारती | १६० हॉल | ५७६ लॉकर | २८८० लॉकर | रेडीयम व्दारे कलर नंबरींग (२ इंच) | १५/- | ४३,२००/- |
| | | | | | | | **एकूण रुपये** | **४३,२००/-** |

सदर २८८० नग लॉकरसाठी रेडीयम व्दा्रे कलर नंबरींग कामी प्रति नगास दर अंदाजे रुपये १५/- प्रमाणे २८८० नगा साठी रु. ४३,२००/- (अक्षरी रुपये – त्रेचाळीस हजार दोनशे मात्र) खर्च अपेक्षित आहे.

**ब) रेडीयम व्दावरे पलंग ( कॉट ) ला नंबर देणेबाबत संख्यातपशिल ( कॉटवरील नंबर)**

| तपशिल | एकुण इमारतीसाठी | एकुण इमारती | एकुण हॉल | एका इमारती मध्ये एकुण कॉट संख्या | ५ इमारतीसाठी एकुण कॉट संख्या | नंबरींग तपशिल | अंदाजे प्रती नग दर रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| साई धर्मशाळा | A-०१ ते A-३२ याप्रमाणे B,C,E,F, | ०५ इमारती | १६० हॉल | ५७६ कॉट | २८८० कॉट | रेडीयम व्दारे कलर नंबरींग (२ इंच) | १५/- | ४३,२००/- |
| | | | | | | | **एकूण रुपये** | **४३,२००/-** |

सदर २८८० नग कॉटसाठी रेडीयम नंबरींग कामी प्रति नगास दर अंदाजे रुपये १५/- प्रमाणे २८८० नगा साठी रु. ४३,२००/- (अक्षरी रुपये – त्रेचाळीस हजार दोनशे मात्र) खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** साईभक्तांना कांऊटरवरील पावती नंबर वरुन**,** आपले जवळील सामान त्याच नंबरचे लॉकरमध्ये ठेवता येईल. तसेच त्याच नंबरचा आरामासाठी पलंग (कॉट) आरक्षित करता येईल यासाठी स्थानिक पेंटर कडुन नंबरींग करुन घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-**

अ) मान्यतेनंतर विहीत पध्दतीने स्थानिक पेटरधारकांकडुन दरपत्रक मागविणे बाबतची कार्यवाही करता येईल त्यास मान्यता असावी ही विनंती.

ब) रेडीयम व्दारे नंबरींग केल्यास दिसण्यास अक्षरे चमकदार व योग्य राहतील, तसेच अचुकता राहील ववेळेची बचत होईल.

क) भक्तांसाठी लॉकरची सुविधा सुरु करणेसाठी लॉकर तसेच कॉट वर रेडीयम व्दारे नंबरींगचे कामासाठी अंदाजे एकत्रित खर्च रु.८६,४००/- (अक्षरी रुपये – शेहांशी हजार चारशे मात्र) अपेक्षित खर्चास मान्यता घेणे.

उपरोक्त अ,ब,क प्रमाणे कार्यवाही करण्यास व त्यासाठी येणा-या रु. ८६,४००/- (अक्षरी रु.शेहांशी हजार चारशे मात्र) खर्चास मा.व्यवस्थापन समितीपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम धर्मशाळा विभागाकडील हॉल मधील लॉकर्स् व कॉटला जेट प्रिंटींगद्वारे नंबरींग करणेत यावे, असे ठरले. त्यासाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

**विषय नं.३१** **कुलूपे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** निरंक

**प्रस्ताविक:-** साई धर्मशाळा विभाग दि.१८/०७/२०१३ रोजी पासुन साई हॉल भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सुरु करण्यात आलेला असून सदर विभागात A,B,C,D,E,F असे ६ इमारती असुन एकुण १९२ हॉल आहेत, पैकी डि' इमारत हि कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली असुन उर्वरीत ५ इमारतीत पदयात्री. पालखीधारक व सहलीमध्ये सहभागी होणा-या साईभक्तांची उपलब्ध हॉलमध्ये निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

सदर विभागात साधारणपणे एका हॉलमध्ये २५ ते ३० साई भक्तांची निवासाची क्षमता आहे. असे एकुण निवासस्थानात १६० हॉल मध्ये ४,००० ते ५,००० साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते.

देणगीदार साईभक्त श्री. के व्ही रमणी, सो. शिरडी साई ट्रस्ट, तामिळनाडु यांनी ६०० नग कपाट (प्रति कपाट ६ लॉकर याप्रमाणे X ६०० कपाटात एकुण लॉकर संख्या ३६००) रुपये ५८,२०,०००/- किमंतीचे देणगी स्वरुपात देण्याबाबत सहमती दर्शविलेली आहे.

**साई धर्मशाळामध्ये ५ इमारतीसाठी आवश्यक इमारतीनिहाय लॉकर संख्येबाबत तपशिल खालीलप्रमाणे-**

| **तपशिल** | **एकुण इमारतीसाठी** | **एकुण इमारती** | **एकुण हॉल** | **एका हॉलमध्ये १८ कॉट नुसार ३ कपाट (३२ हॉल मध्ये कपाट संख्या)** | **एका कपाटामध्ये ६ लॉकर नुसार एका इमारतीस लॉकर संख्या** | **पाच इमारती मिळुन एकुण लॉकर संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|
| साई धर्मशाळा | A-०१ ते A-३२<br>B-०१ ते B-३२<br>C-०१ ते C-३२<br>E-०१ ते E-३२<br>F-०१ ते F-३२ | ०५ इमारत | १६० हॉल | १ कपाट – ६ लॉकर्स<br>१ हॉल – ३ कपाट<br>१ मजला – ८ हॉल<br>८ हॉल X ३ कपाट= २४ कपाट<br>४ मजले X २४ कपाट = ९६ कपाट | ९६ कपाट X ०६ लॉकर = ५७६ एकुण लॉकर | ५७६ लॉकर X ५ इमारत =<br>**२८८० लॉकर** |
| ❖ **देणगी ३६०० लॉकर पैकी २८८० लॉकरसाठी एकूण ३,००० नग कूलूप(भक्तांकडुन चावी/कुलूपे तसेच कुलूप खराब झालेस) वापरात देणे आवश्यक आहे.** | | | | | | |

संस्थानचे इतर निवासस्थानमध्ये भक्तांसाठी लॉकर सुविधेकरिता लिंक कंपनीचे(अतुट सिरीज) मधील कुलूपे वापरत असल्याचे दिसुन येत आहे

| **कुलूपाचा तपशिल** | **एकुण कुलूप मागणी** | **अंदाजे प्रती नग दर रुपये पैसे** | **एकूण रक्कम रुपये पैसे** |
|---|---|---|---|
| गोदरेज - नवताल/लिंक - अतुट (पॅड लॉक ५०) (Square) पॅड लॉक नं. ५० एमएम,६ ब्रास लिव्हर डबल लॉक, तिन चाव्यांसह | ३००० नग | २७१/- | ८,१३,०००/- |
| | | **एकूण रुपये** | ८,१३,०००/- |
| **(अक्षरी रुपये- आठ लाख तेरा हजार मात्र)** | | | |

सदर लॉकरसाठी पॅड लॉक नं. ५० एमएम ६ ब्रास लिव्हर प्रति नगास दर अंदाजे रुपये २७१/- प्रमाणे ३००० नग साठी रु. ८,१३,०००/- (अक्षरी रुपये- आठ लाख तेरा हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च हा रु. १० लाखचे आत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यतेसाठी जाण्याची आवश्यकता नाही. तसेच येणार खर्च हा भक्तोपयोगी सेवा सुविधा प्रदान करण्यासाठीचा असल्याने त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नाही.

**मागणी:-** साईभक्तांना आपले जवळील सामान लॉकर मध्ये ठेवणेकामी**,** सदर लॉकर साठी पॅड लॉक नं. ५० एमएम ६ ब्रास लिव्हर (तिन चाव्यांसह) - ३००० नग कुलूपे खरेदी करण्यास व जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया खरेदी विभागामार्फत राबविता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** विहीत पध्दतीने खरेदी करणे बाबतची कार्यवाही संस्थानचे खरेदी विभागामार्फत ई-टेंडर पध्दतीने करण्यास.

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस व ३००० नग पॅडलॉक खरेदी करणेस व त्याकामी येणारे रु. ८,१३,०००/- (अक्षरी रुपये- आठ लाख तेरा हजार मात्र) खर्चाचे मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम धर्मशाळा विभागास देणगी स्वरुपात मिळणाऱ्या लॉकर्ससाठी ३००० नग पॅड लॉक खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,१३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

विषय नं.३२ **सन 2017-18 आर्थिक वर्षाकरीता आऊटसोर्सिंग कामाचे खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**प्रस्ताविक:-** साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाउाकिपींग, विद्युत,प्लंबीग मेटेनन्स/ स्वच्छतेचे आऊटसोर्सिगं पध्दतीने कामासाठी मा. उच्च न्यायालय मुंबई औरगांबाद खंडपिठाने सिव्हील ॲप्लिकेशन २८९/२०१५ अन्वये रु. ३,०८,०८,५००/-(अक्षरी रुपये तीन कोटी आठ लाख आठ हजार पाचशे) मात्रचे वार्षिक खर्चास मान्यता दिलेली आहे. तसेच १६५ मनुष्यबळ संख्या तसेच १०८ मशिनरी व उपकरणे यांची मान्यता घेवून त्यानुसार याकामी ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात येवून ई-निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात आली आहे.

दि.२८/१२/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६१९ नुसार साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत्प्लंबीग मेटेनन्स/स्वच्छता ही कामे आऊटसोर्सिगंचे पध्दतीने करुन घेणेसाठी मे. सुमित फॅसिलीटीज् प्राली. चिचंवड, पुणे यांचे रु २,२९,०६,७७७.५६ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुढील एक वर्ष कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा अशी मान्यता मिळाली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/६०१७/२०१६,दि.०१/०२/२०१६ रोजीचे आदेशाने मे.सुमित फॅसिलिटीज् प्रा.ली. चिचंवड, पुणे. यांना साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह, विद्युत, प्लंबीग, मेटेनन्स/स्वच्छता इत्यादी हाऊसकींपीगचे कामासाठीचे एक वर्षाचे कालावधीसाठी (दि.१६/०२/२०१६ ते १५/०२/२०१७ अखेर) कंत्राट देण्यात आलेले आहे.

मे.सुमित फॅसिलीटीज् प्राली. पुणे यांची मुदत दि १५/०२/२०१७ अखेर संपुष्ठात येत आहे. त्यानंतर पुढील नवीन ठेकेदारास काम देण्यासाठीची ई-टेडरींग प्रक्रीया सुरु करावी लागणार आहे. त्यासाठी मनुष्यबळ संख्या व येणा-या अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

साई धर्मशाळा विभागाकडील यांत्रिकीकरणासह, विद्युत, प्लंबीग, मेटेनन्स/स्वच्छता इत्यादी हाऊसकींपीगकामी वार्षिक मंजुर रक्कम व झालेला खर्च याबाबत सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

**हाऊसकिपींगकामी वार्षिक मंजुर रक्कम व झालेला खर्च याबाबत सविस्तर तपशिल.**

| अ.क्र. | कालवधी | वार्षिक मंजुर रक्कम | हाऊसकिपींग कामी झालेला खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | सन २०१३ – १४ (Aug-13 to Mar-14) | रु. २,६७,९०,०००/- (अक्षरी रुपये- दोन कोटी सदुशष्ट लाख नव्वाद हजार मात्र ) | रु.१,७३,१२,६०३/- |
| २ | सन २०१४– १५ (Apr-14 to Mar-15) | रु. ३,०८,०८,५००/- (अक्षरी रुपये- तिन कोटी आठ लाख आठ हजार पाचशे मात्र ) | रु.२,३७,२९,५३६/- |
| ३ | सन २०१५– १६ (Apr-15 to Jan-16) | रु. ३,०८,०८,५००/- (अक्षरी रुपये- तिन कोटी आठ लाख आठ हजार पाचशे मात्र ) | रु.२,०२,११,८७४/- |
| ४ | सन २०१६-१७ May-16 to June16 | रु.२,२९,०६७७.५६ (अक्षरी रु. दोन कोटी एकोनतीस लाख सहाशे सत्यातर मात्र) | (जुन-२०१६ अखेर) रु.६९,४१,१२२/- |

सन २०१७-१८ सालामध्ये "श्रींचा समाधी शताब्दी महोत्सव" असल्याकारणामुळे वर्षभर साईभक्तांची गर्दी निवासस्थानमध्ये असेल, त्याअनुषंगाने साई धर्मशाळा विभागामध्ये गर्दीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.तसेच साईधर्मशाळा मध्ये ऑनलाईन कॉट बेसेस सुविधा सुरु करावयाची आहे त्यानुसार मनुष्यबळ संख्येबाबत व मशिनरी बाबतचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदनाम | सध्याची मंजुर मनुष्य बळ संख्या | सन २०१७-१८ सालासाठी प्रस्तावीत मनुष्यबळ संख्या | आवश्यक मशिनरी / उपकरणे नावे व संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मॅनेजर | ०१ | १ | हायप्रेशर जेट ०२, |
| २ | मुकादम | ०७ | ०७ | स्लज पंप ०२, |
| ३ | लिपीक टंकलेखक | ०९ | ११ | फिलपर १०, |
| ४ | स्टोअर किपर | ०१ | ०१ | डी वॉटरींग पंप ०२, |
| ५ | मदतनिस | २५ | ५६ | राईउ व्हॅन ०१ |
| ६ | स्वच्छता कर्मचारी | ८२ | ११७ | ग्लास क्लिनिंग किट ०१ |
| ७ | जनरेटर पॅनल ऑपरेटर | ०३ | ०३ | टेलि स्कोपी पोल ०२ |
| ८ | तारतंत्री | ०३ | ०३ | सेफ्टी लेडरच ०२ |
| ९ | तारतंत्री मदतनिस | ०३ | ०३ | गारबेज ट्रॉली ०६ |
| १० | सोलर ऑपरेटर | ०१ | ०१ | स्क्रॅप बिन्स मोठे १४ |
| ११ | प्लंबर | ०३ | ०३ | स्मॉल ऑटो स्क्रबर ०१ |
| १२ | प्लंबर मदतनिस | ०३ | ०३ | वेट ॲण्ड ड्राय डिस्क स्क्रबर ०२ |
| १३ | पंपमन | ०३ | ०३ | सिंगल डिस्क स्क्रबर ०१ |
| १४ | एसटीपी प्लॅन्ट मदतनिस | ०३ | ०३ | रिगल ट्रॉल ०२ |
| १५ | सुतार | ०१ | ०३ | स्क्रब बिन्स ट्रॉली ०१ |
| १६ | गंवडी | ०० | ०३ | मॅट्रेस सिप्टींग ट्रॉली ०१ |
| १७ | सुतार,गंवडी,पेंटर मदतनिस | ०१ | १० | १ इमारतीसाठी एकुण ११<br>६ इमारतीसाठी ६६ |
| | एकुण | **१६५** | **२३१** | **एकुण- १०८ मशिनरी** |

**हाऊसकिपींगकामी येणा-या वार्षिक खर्चाची अंदाजे रक्कम बाबतचा सविस्तर तपशिल.**

| अ.नं | तपशिल | रुपये | एकुण |
|---|---|---|---|
| | **१०० दिवसासाठी** | | |
| १ | ३६ कुशल कर्मचारी **X** रु. ३१४ किमान वेतन **X** १०० दिवस | ११,३०,४००/- | |
| २ | १९५ अकुशल कर्मचारी **X** रु. २८३ किमान वेतन **X** १०० दिवस | ५५,१८,,५००/- | **६६,४८,९००/-** |
| | **२६५ दिवसासाठी** | | |
| १ | ३६ अकुशल कर्मचारी **X** रु. ३१४ किमान वेतन **X** २६५ दिवस | २९,९५,५६०/- | |
| २ | १४७ अकुशल कर्मचारी **X** रु. २८३ किमान वेतन **X** २६५ दिवस | १,१०,२४,२६५/- | **१,४०,१९,८२५/-** |
| | **एकुण -** | | **२,०६,६८,७२५/-** |
| | **१५ % सर्व कर + १० % स्पेशल अलौन्स -** | | **५१,६७,१८२/-** |
| | **एकुण अंदाजे वार्षिक खर्च रुपये -** | | **२,५८,३५,९०७/-** |

वरील प्रमाणे साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. मेन्टेनन्स/ स्वच्छता कामासाठी अंदाजे रु. २,५८,३५,९०७/- नुसार पुर्णांकीत रक्कम रु. २,६०,००,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी साठ लाख मात्र) अंदाजे वार्षिक खर्च येणार आहे.

**मागणी:-** साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबीग, इ. मेन्टेनन्स/ स्वच्छता कामासाठी मनुष्यबळ संख्या – २३१, मशिनरी व उपकरणे – १०८ तसेच याकामासाठी येणारा अंदाजे वार्षिक खर्च – रुपये २,६०,००,०००/- ( अक्षरी रुपये –दोन कोटी साठ लाख मात्र) खर्चाचे मंजूरी मिळणेस.

तसेच सन २०१७-१८ याकालावधीसाठी नविन कंत्राटदाराची नेमणुक करणेकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमान पत्रात जाहीरात देऊन, सदर ऑनलाईन टेंडर प्रक्रीया राबविणेस परवानगी मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-**

अ) मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळाले नंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक वर्तमान पत्रात जाहीरात देऊन, ई- टेंडर प्रक्रीया राबविणेचे प्रस्तावास मान्यता घेणे.

आ) साई धर्मशाळा विभागाकडील सन २०१७-१८ या कालावधीसाठी हाऊसकिपींगचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेस व येणा-या रु. २,६०,००,०००/- (अक्षरी रुपये – दोन कोटी साठ लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानच्या सर्व निवासस्थानांच्या हाऊसकिंपीग/ स्वच्छता कामांच्या निविदा एकत्रित काढण्यात याव्यात, जेणेकरुन चांगली सेवा मिळेल व त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे होईल. याकरीता साईधर्मशाळा विभागाकडे सध्या यांत्रिकीकरणासह हाऊसकिंपींग, विद्युत, प्लंबींग, मेंटनन्स/ स्वच्छतेचे काम सध्या करत असलेल्या ठेकेदारास इतर निवासस्थानांची मुदत संपेपर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी.** (कार्यवाही- सर्व निवासस्थाने)

---

**विषय नं.३३** **संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाकरीता आवश्यक टु सीटर बँचेस खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक टु सीटर बेंचेस खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.८,७५,०००/- (अक्षरी रु.आठ लाख पंचाहत्तर हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३२० (०६) नुसार मान्यता मिळालेली होती.

बेंचेस खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२१.०३.२०१६ ते दि.३१.०३.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया **तिस-यांदा** राबविणेत आलेली होती. याकामी दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. तिस-यांदा ई-निविदा प्रक्रिया असल्यामुळे खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त होऊनही सदरच्या तांत्रिक निविदा दिनांक ०७.०४.२०१६ रोजी Online उघडण्यात आल्या होत्या.

अ) मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर

ब) मे. हायकॉन, औरंगाबाद

वरील तांत्रीक निविदा उघडून दोन्हीही निविदाधारकांचे कागदपत्रांची तपासणी केली असता (अ) मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर व (ब) मे. हायकॉन, औरंगाबाद यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे तसेच निविदा फी व बयाणा रकमेचे डिमांड ड्राफटसही सादर केलेले आहेत. त्यामुळे वरील दोन्हीही ई-निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्या आहेत.

उपरोक्त Technical Bid मध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचे Financial Bid दि.१३.०५.२०१६ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उघडण्यात आलेले आहेत. त्यातील मुळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील मुळ दर प्रती नग** |
|---|---|---|
| ०१ | मे. हायकॉन, औरंगाबाद | रु. १२,३६०/- |
| ०२ | मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर | **रु. ११,९८६/-** |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर धारक मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक टु सीटर १०० नग बेंचेस खरेदी केल्यास रु.११,९८,६००/- मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च हा मंजुर रकमेपेक्षा जास्त असल्यामुळे, दि.१९.०५.२०१६ मा. व्यवस्थापन समितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक असणा-या टु सीटर बेंचेस खरेदीकामी मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचे प्रती नग रु. ११,९८६/- मात्र निम्नतम दर मिळालेले आहेत. परंतु या दराने १०० नग बेंचेस खरेदीकामी रु. ११,९८,६००/- मात्र खर्च येणार असून सदरचा खर्च मंजुर रकमेपेक्षा जास्त असल्यामुळे याबाबत मार्गदर्शन घेणेसाठी मा. त्रिसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

संस्थानचे श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी बेंचेसची त्वरित गरज आहे. असे त्यांनी दि.१०.०७.२०१६ रोजीचे पत्राव्दारे इकडील कार्यालयास कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.०८.११.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६२ अन्वये रु.१० लाखाचे पुढील खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी असे ठरले आहे. सदर ठरावाची प्रत सोबत सादर केलेली आहे.

सदर १०० नग बेंचेस खरेदीकामी प्रती नग रु.११,९८६/- प्रमाणे रु.११,९८,६००/- खर्च येणार असल्यामुळे वरील निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाची परवानगी घ्यावी लागेल. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाची तातडीची गरज, ऑक्टोबर-२०१५ पासून ते मार्च २०१६ याकामी दोन वेळेस केलेली निविदा प्रक्रिया तसेच ३ वेळेस केलेली ई-निविदा प्रक्रिया याकामी झालेला अंदाजे रक्कम रु.३९,०३४/- मात्रचाजाहिरात खर्च वगैरे बाबी लक्षात घेता, वरील १०० नग बेंचेस ऐवजी १० लाखाचे आत बसतील एवढया रकमेचे ८० नग बेंचेस खरेदी करावेत म्हणजे ज्यु.कॉलेजची तातडीची गरज भागेल, असे मत आहे.

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी टु सीटर बेंचेस १०० नगाऐवजी तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर धारक मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून ८० नग बेंचेस रु ११,९८६/- या दराने खरेदी केल्यास रुपये ९,५८,८८०/- (अक्षरी रु. नऊ लाख अठ्ठावन हजार आठशे ऐंशी मात्र) खर्च येईल. सदर खर्च हा मंजूर रक्कम रु.८,७५,०००/- (अक्षरी रु.आठ लाख पंचाहत्तर हजार) मात्रचे खर्चापेक्षा जास्त आहे.

तरी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी ८० नग टु सीटर बेंचेस मे. रोहन एंटरप्रायजेस, अहमदनगर यांचेकडून रु ११,९८६/- या दराने खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.९,५८,८८०/- (रु.नऊ लाख अठ्ठावन्न हजार आठशे ऐंशी) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी १०० नग टु सीटर बेंचेस खरेदीकामी तिसऱ्यांदा राबविणेत आलेल्या ई-निविदेप्रक्रियेमध्ये एकच ई-निविदा प्राप्त झालेली आहे व त्यांचे दरही मंजुर रकमेपेक्षा जादा आहेत. यामुळे सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी १०० नग टु सीटर बेंचेस खरेदी करणेसाठी नव्याने ई-निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा)

---

**विषय नं.३४** **स्टेट बँक आफ इंडिया, शाखा शिर्डी यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम.चे जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** स्टेट बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी यांना ए.टी.एम.साठी सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मीटर जागा वापरास देण्यात आलेली असून सदरची मुदत दि२७/७/२०१६ अखेर संपुष्टात येत आहे.

शाखाधिकारी, स्टेट बॅंक ऑफइंडीया, शाखा शिर्डी यांनी सिटी सर्व्हे नं.३२ मधील संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील ए.टी.एम.केंद्रासाठी देण्यात आलेल्या जागेस दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/७/२०१७ या कालावधीकरीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे

स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीच्या साईनाथ छाया या इमारतीतील जागा भाडे तत्वावर देणेबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.०४/११/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८८४ या निर्णयास अनसुरुन मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं.३३८६/२०१४ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे खालीलप्रमाणे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

उपरोक्त आदेशास अनुसरुन तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१७ नुसार तसेच स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना इकडील कार्यादेश जा.क्र.एसएसएस/ मालमत्ता/ २९६७/२०१५ दि.२६/०८/२०१५ अन्वये मासिक भाडे रु.४७९२/- आकारुन दि.२८/०७/२०१५ ते दि.२७/०७/२०१६ या कालावधीकरीता करारानुसार मासिक भाडे तत्वावर ए.टी.एम.साठी जागा वापरास देण्यात आलेली असुन त्याची मुदत दिनांक२७/०७/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४–** कलम १७/(३) नुसार विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशा आशयाचा आहे.

**मा.उच्च न्यायालयाचे दि.१६/१०/२०१२ रोजीचे निर्देश–** ६ **(अ)** मध्ये shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2 trust; असा असून त्यात संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीच्या हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये व **(ब)** मध्ये shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust; असा असून त्यात संस्थान मार्फत कोणत्याही प्रकारचे अचल मालमत्तेच्या खरेदीचे कॉन्ट्रक्ट किंवा करारनामे करु नये, असा आदेश झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय –** उपरोक्त संस्थान अधिनियम व मा.उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशाचा विचार करता, स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील ९ स्क्वे.मी. जागा ए.टी.एम. साठी दि.२८/०७/२०१६ ते दि.२७/०७/२०१७ अखेर एक वर्ष कालावधीसाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन म्हणेजच रु.४७९२/- + रु.४७९/- (१०%) = रु.५२७१/- (अक्षरी रु.पाच हजार दोनशे एकाहत्तर मात्र) भाडे आकारण्यात येऊन व मीटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देता येईल

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बॅंक ऑफ इंडीयाशाखा शिर्डी यांना ए.टी.एम. साठी दिलेली संस्थानचे सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावर दिलेल्या ९ स्क्वे.मी. जागा मध्यवर्ती ठिकाणी असून त्या जागेचे भाडे खुपच कमी आहे. याकरीता व्यवस्थापक, स्टेट बॅंक ऑफ इंडीयाशाखा शिर्डी यांचेशी भाडेवाढ करणेबाबत चर्चा करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.३५** **दोन प्रवासी (नगरसुलरेल्वेस्टेशन) बसेसचा वार्षिक टॅक्स भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र. एमएच-१७-टी-७१०९ व एमएच-१७-टी-७११० या दोन बसेसचा वापर साईभक्तांना नगरसुल रेल्वेस्टेशन येथे घेवुन जाणे व घेवुन येणे कामी होत आहे दोन्ही बसेसच्या वार्षिक टॅक्सची मुदत दि.३१/०८/२०१६ रोजी संपुष्टात येत असलेने उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांनी दि.२५/०७/२०१६ रोजीचे एटी फॉर्मवर पुढील एक वर्षाचा म्हणजे दि.०१/०९/२०१६ ते दि.३१/०८/२०१७ अखेर या कालावधी करीता खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरणेचे कळविले आहे.

| **अ.नं.** | **बस क्रमांक** | **वाहन प्रकार** | **आसन क्षमता** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-टी-७१०९ | प्रवासी बस | ५४ सिटर | १,०२,६००.०० |
| ०२ | एमएच-१७-टी-७११० | प्रवासी बस | ५४ सिटर | १,०२,६००.०० |
| | **एकुण रक्कम (रु.)** | | | **२,०५,२००.००** |

उपरोक्त प्रमाणे दोन प्रवासी बसेस वाहनांचा आरटी.ओ. कार्यालयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.२,०५,२००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख पाच हजार दोनशे) मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात मा. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे ॲडव्हान्स डी.डी. द्वारे आदा करावी लागणार आहे.

तरी प्रवासी बस क्र. एमएच-१७-टी-७१०९ व एमएच-१७-टी-७११० या दोन बसेसचा वार्षिक (दि.०१/०९/२०१६ ते दि.३१/०८/२०१७ अखेर) टॅक्सची रक्कम भरणे कामी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे एकुण रक्कम रु.२,०५,२००/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख पाच हजार दोनशे) मात्र रक्कमेचा ॲडव्हान्स डी.डी. लेखाशाखेमार्फत मिळणेस तसेच या कामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बस क्र. एमएच-१७-टी-७१०९ व एमएच-१७-टी-७११० या दोन प्रवासी बसेसचा वार्षिक (दि.०१/०९/२०१६ ते दि.३१/०८/२०१७ अखेर) टॅक्स उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचेकडे भरणेस व त्याकामी येणाऱ्या एकुण रु.२,०५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.३६** **देणगी चार वाहनाचा विमा पॉलीसी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानला वेगवेगळ्या साईभक्तांमार्फत मागील आर्थिक वर्षात वेगवेगळी वाहने देणगी मिळालेली आहे. त्यामधील ०३ वाहनांची माहे ऑक्टोबर-२०१६ मध्ये व ०१ वाहनाची माहे जानेवारी-२०१७ मध्ये विमा पॉलीसीची मुदत संपुष्टात येत आहे. संस्थानचे ८८ वाहनांचा विमा दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०१७ अखेर युनायटेड इंडीया एन्शुरन्स कंपनी लि., शाखा- शिर्डी यांचे मार्फत घेण्यात आलेला आहे. संस्थानचे सर्व वाहनांचा विमा दि.३१/०३/२०१७ अखेर करणे करीता सदर ०४ वाहनांची विमा पॉलिसीची मुदत दि३१/०३/२०१७ पर्यंत करुन घेणे आवश्यक आहे.

| **अ.नं.** | **वाहन क्र.** | **वाहन कंपनी व प्रकार** | **देणगी पावती नं./ दिनांक** | **सध्याचे विमा पॉलिसीची दि.** |
|---|---|---|---|---|
| 01 | MH-17-BD-2442 | Tavera Neo-III Ambulance | 28457-21.11.2015 | 02/10/2016 |
| 02 | MH-17-BD-2718 | Eicher Fire Fighter | 43380-24.03.2016 | 18/10/2016 |
| 03 | MH-17-BD-2552 | SML Isuzu Truck, Samrat, HD, BS-III | 29098-28.11.2015 | 19/10/2016 |
| 04 | MH-17-BD-3240 | Eicher School Bus, 10.90 L Bus BS-III | 43387, 43389 -24.03.2016 | 05/01/2017 |

उपरोक्त ०४ वाहनांचा दि.३१/०३/२०१७ पर्यंत विमा पॉलिसी करुन घेणे कामी अंदाजे रु.७५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याहत्तर हजार) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. याकामी राष्ट्रीयकृत ०४ विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागवुन विमा पॉलीसी करता येईल. सदरचा खर्च मोटारकार विमा खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल

तरी वरील प्रमाणे ०४ वाहनांचा राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके घेवुन दि३१/०३/२०१७ पर्यंत विमा पॉलिसी नुतनीकरण करुन घेणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७५,०००/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याहत्तर हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ०४ वाहनांच्या विमा पॉलिसीचे दि.३१/०३/२०१७ पर्यंत नुतनीकरण करणेसाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.३७** **बॅकेट इलेव्हेटर खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.** 14 (भाग 4) मध्ये 14 (2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रस्ताविक–** श्री साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत बुंदी प्रसाद तसेच कांऊटरवर सशुल्कलाडू प्रसाद देणेकरीता बुंदी व लाडू लाडू प्रसाद निर्मिती विभागामार्फत तयार करणेत येते याकरीता दररोज सरासरी 2500 किलो डाळीचे बेसनाची आवश्यकता भासते. लाडू तयार करण्यासाठी लागणारी डाळ निवडणेसाठी तासी 1000 किलो क्षमतेचे डिस्टोनर मशिन देणगी स्वरुपात घेणेत आलेले असून लाडू प्रसाद निर्मिती विभागाचे उपभांडारमध्येबसविणेत आले आहे. तथापि सदरच्या मशिनची उंची जास्त असलेमुळे डाळ टाकणेसाठी अडचण येत आहे. त्यामुळे डाळ मशिनमध्ये टाकणेकरीता बकेट इलेव्हेटर सिस्टीम बसविणे आवश्यक आहे. बकेट इलेव्हेटर्स द्वारे डाळ ग्रांऊड लेव्हला टाकून बकेटद्वारे थेट मशिन मध्ये टाकता येईल व कर्मचा-यांना काम करणे साईचे होईल वेळेची व कर्मचाऱ्यांची बचत होईल. बकेट इलेव्हेटर खरेदी कामी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपिशल | नग | अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| १ | 4" Bucket Elevator (Single)<br>Height – 13 ft.<br>Power – 1 HP /3 Phase<br>With laxmi make electric motor, V belt, V Pulley and LT/LK Starter | 1 | 60,000.00 |
| | एकुण रक्कम रु. | | 60,000.00 |

उपरोक्त प्रमाणे बकेट इलेव्हेटर यंत्रणा बसविणेकामी अंदाजे रक्कम रु. 60,000/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम विहीत पद्धतीने दरपत्रक मागावून करता येईल. याकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ मत:-** लाडू निर्मिती विभागाकरीता डाळ निवडणेसाठी डिस्टोनर मशिन असूनही उंची जास्तअसलेमुळे मशिनचा वापर होत नाही. त्याकरीता डाळ मशिन मध्ये टाकणेसाठी बकेट इलेव्हेटर सिस्टीम बसविणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे डाळ डिस्टोनर मशिनकरीता बकेट इलेव्हेटर सिस्टीम विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. 60,000/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डाळ डिस्टोनर मशिनकरीता एसएसचे बकेट इलेव्हेटर सिस्टीम विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **शांतीनिवास दर्शन हॉलमध्ये हवा खेळती राहणेसाठी उत्तर बाजुची लोखंडी जाळी काढणे तसेच नवीन वाढीव एअर कुलर बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद कलम 14(2)(घ)– भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे

**प्रस्तावना**:- दिनांक 07/10/2015 व दिनांक 04/03/2016 रोजी घेण्यात आलेल्या सुरक्षा आढाव्यातील त्रुतीची पुर्तता संदर्भात मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 12/05/2016 रोजी '0' नंबर मिटींग हॉलमध्ये मिटींग आयोजित करणे आली होती, सदर मिटींगमध्ये, शांतीनिवास इमारत दर्शन रांग हॉलमध्ये हवा खेळती राहणेकामी सदरचे इमारतीचे शेजारील कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतील बाजूने लावणेत आलेली लोखंडी बारीक जाळी काढणेबाबत तसेच दर्शन रांग हॉलमधील कुलरची संख्यावाढविणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी सूचना दिल्याआहेत.

समाधी मंदिर परिसराचे सुरक्षा संदर्भात माहे जुलै2006 मध्ये तत्कालीन मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांनी मंदिर परिसराची पाहणी केली होती. सदर पाहणीत त्यांनी समाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेच्यादृष्टीने लोखंडी बारीक जाळी बसविणेबाबत सूचना दिल्याहोत्या. त्यानुसार दिनांक 19/08/2006 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 587 अन्वये सदर कंपाऊंडला बारीक लोखंडी जाळी बसवून घेण्यात आलेली आहे. मात्र ही लोखंडी जाळी बसविली त्यावेळी शांतीनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉलचे, उत्तर बाजूकडील पिंपळवाडी रोडवर दर्शन रांग नव्हती. आता, श्री समाधी मंदिर परिसर उत्तर बाजूकडील कंपाऊंडचे बाहेरील बाजूने पिंपळवाडी रस्त्यावरही दर्शन रांग झालेली आहे. त्यामुळे कंपाऊंडला असलेली लोखंडी जाळी काढून घेतल्यास, शांतीनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉलमध्येहवा खेळती राहणेस मदत होईल, असे मत आहे.

तसेच शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉलमध्ये तापमान नियंत्रणात राहून साईभक्तांचे उष्णतेपासून संरक्षण व्हावे यासाठी सद्यपरिस्थितीत एकूण 28 एअर कुलर लावणेत आलेले आहेत. तरीही गर्दीचे काळात दर्शन रांगेतील तापमान वाढते. त्यामुळे शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉलमध्ये आणखी वाढीव कुलरची व्यवस्था करुन तेथील तापमान नियंत्रित करता येईल. यासाठी दर्शन रांग हॉलमधील उपलब्ध जागेचा विचार करता वाढीव 20 एअर कुलरची आवश्यकता आहे.

**मागणी:-** दिनांक 12/05/2016 रोजीचे मिटींगमधील मा. कार्यकारी अधिकारी यांचे सूचनेनुसार शांतीनिवास इमारत दर्शन रांग हॉलचे शेजारील उत्तर बाजुचे कास्टींग आयर्न कंपाऊंडची बारीक लोखंडी जाळी काढून घेता येईल. तथापि दर्शन रांगेत साईभक्तांचे उष्णतेपासून संरक्षण व्हावे यासाठी वाढीव कुलर व्यवस्था करणेकामी कुलर मेकॅनिकल विभागाकडे शिल्लक नसल्याने नविन 20 नग एअर कुलर खरेदी करावे लागतील. सदरचे एअर कुलर खरेदीकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | कंपनी | मागणी नग | अंदाजे दर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | एअर कुलर<br>कुलींग एरीया – 2000 ते 2500 Sq. Ft. | कॅपसन (Kapsun)<br>अॅटार्टिका मॉडेल | 20 | 48,500/- | 9,70,000/- |

उपरोक्तप्रमाणे 20 नग एअर कुलर खरेदीकामी अंदाजे रुपये 9,70,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**मान्यता :-** प्रशासकीय/ आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** शांतीनिवास इमारत दर्शन हॉलमध्ये हवा खेळती राहणेसाठी उत्तर बाजुकडील कास्टींग आयर्न कंपाऊंडचे आतील बाजुने लावलेली लोखंडी जाळी काढून घेता येईल तसेच शांतीनिवास व भकतनिवास इमारतीमधील दर्शन रांग हॉलमध्ये वाढीव नवीन 20 नग एअर कुलर खरेदी करुन बसविता येईल. नविन कुलर खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 9,70,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदरचे दोन्ही कामाकरीता मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर ई-निविदा प्रक्रियेव्दारे आवश्यक एअर कुलर खरेदी करता येतील.

तरी **(1)** शांतीनिवास इमारत दर्शन हॉलमध्ये हवा खेळती राहणेसाठी उत्तर बाजुकडील कास्टींग आयर्न कंपाऊंडचे आतील बाजुने लावलेली लोखंडी जाळी काढून घेणेस

तसेच **(2)** शांतीनिवास व भक्तनिवास इमारतमधील दर्शन रांग हॉलमध्ये वाढीव नवीन 20 नग एअर कुलर विहीत पध्दतीने ई-निविदेव्दारे खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 9,70,000/- (अक्षरी रुपये नऊ लाख, सत्तर हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास इमारत दर्शन हॉलमध्ये हवा खेळती राहणेसाठी उत्तर बाजुकडील कास्टींग आयर्न कंपाऊंडचे आतील बाजुने लावलेली लोखंडी जाळी काढून घेणेसमान्यता देण्यात आली. तसेच शांतीनिवास व भक्तनिवास इमारतमधील दर्शन रांग हॉलमध्ये वाढीव नवीन कुलर खरेदीकरुन बसविणेसाठी तांत्रिक तज्ञांचा सल्ला घेण्यात येऊन, प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९** **श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ, बनविणेचे पातेलेवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टीलच्या जाळीचे झाकणे बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक 20 जानेवारी, 2016 रोजीचे पत्रान्वये श्री साई प्रसादालय विभागाने, साईभक्तांना प्रसाद भोजन पुरविणेकामी 20 ते 25 अॅल्युमिनिअम, स्टेनलेस स्टीलच्या पातेल्यांचा किचनमध्ये नियमित वापर होतो. या पातेल्यामध्ये दैनंदिन पालेभाजी, दाळ, कडधान्य बनविणेत येत असून, भाज्या बनवितांना सदरील पातेले गॅस भट्टीवर उघडे ठेवावे लागतात. गॅस भट्टीचे वर उष्णता जाणेकरीता वायुवीजन यंत्रणा बसविणेत आलेली असल्याने, भट्टीवर भाज्या बनविण्यासाठी ठेवण्यात आलेल्या पातेल्यावर वायुवीजन यंत्रणेची घान व किटक पडू नयेयाकरीता तसेच रात्रीचे वेळी कडधान्य (भिज भाजी) टाकावी लागते त्यात घान व किटक पडू नये याकरीता योग्य आकाराचे जाळीचे 10 झाकणे तयार करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

उपरोक्त मागणीप्रमाणे इकडील विभागामार्फत किचनमध्ये प्रत्यक्ष पहाणी केली असता, सदर ठिकाणी स्टेनलेस स्टीलचे मटेरिअलची आवश्यकता आहे. सदरची कामे बाहेरील पुरवठादार/ फॅब्रिकेटर्स यांचेकडून करावे लागणार आहे. यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | तपशील | मागणी | दर रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | SS 304 – Perforated Sheet<br>Size – 8' x 4', 16 Guage, 6 mm hole | 5 Nos. | 8,800/- | 44,000/- |
| 2. | SS 304 – Bar<br>Size – 6 mm | 250 Feet | 115/- | 28,750/- |
| 3. | SS 304 – Flat<br>Size – 40 x 3 mm | 170 Feet | 115/- | 19,550/- |
| | | | **एकूण:** | **92,300/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयातील किचनमधील पातेलेवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टीलची जाळीचे झाकणे बनविणेकामी अंदाजे रुपये 92,300/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**आवश्यक मान्यता** : प्रशासकीय व आर्थिक

**शासनाची/ मा. उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता**: नाही

**विभागाचा स्पष्ट मत**: श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ बनविणेचे पातेलेवर स्टेनलेस स्टीलची जाळीचे झाकणे बनविणेकामी बाहेरील पुरवठादार/ फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन बोलाविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 92,300/- (अक्षरी ब्यानों हजार, तीनशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे किचनमधील भाजी, दाळ बनविण्याच्या पातेल्यांमध्ये वायुवीजन यंत्रणेची घान व किटक पडू नये याकरीता सदरहू पातेल्यांवर ठेवणेकरीता स्टेनलेस स्टील जाळीची झाकणे बनवून घेणेकामी बाहेरील पुरवठादार/ फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.४० **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांच्या रिलींगची उंची वाढविणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतूद** : (1) कलम 14(2) (घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) कलम 17(2)(झ)– सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे.

**प्रस्तावना:** मा.न्या.श्री.श्रीकांत कुलकर्णी, अध्यक्ष मा.त्रिसदस्यीय समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तथा प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी दिनांक 13/03/2013 रोजी शिर्डी येथील संस्थानचे मालमत्तांची स्थळपाहणी केली असून, सदर पाहणीचे वेळेस मा. अध्यक्ष साहेब यांनी दिलेल्या सूचना-वजा- निर्देशाबाबत जा. क्र. एसएसएस/काअ/4744/2016 दिनांक 15/03/2016 रोजीचे परिपत्रकामध्ये नमूद केलेले अ.नं. 20 मध्ये "श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांचे रिलींगची साधारणपणे 3 फुटांनी वाढविण्यात यावी " असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार दिनांक 15/04/2016 चे उप-कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी त्यांचे पत्रात विषयाकिंत काम मेकॅनिकल विभागामार्फत करुन घेणेबाबत उचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

**मागणी**: बांधकाम विभागाचे पत्रानुसार इकडील विभागामार्फत प्रत्यक्ष पहाणी केली असून, सदरील काम बाहेरील फॅब्रिकेटर्स यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करवून घ्यावे लागणार आहे. याकामी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | मागणी | अंदाजे दर रुपये | खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | M.S. Square Pipe<br>Size – 25 x 25 x 3 mm | 1728 Ft. | 28/- | 48,384/- |
| 2. | M.S. Square Pipe<br>Size – 20 x 20 x 3 mm | 1080 Ft. | 28/- | 30,240/- |
| 3. | M.S. Patti<br>Size – 25 x 5 mm | 60 Kgs. | 47/- | 2,820/- |
| | | | **एकूण:** | **81,444/-** |

उपरोक्तप्रमाणे विषयांकितकामी अंदाजे रुपये 81,444/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे.

**आवश्यक मान्यता**: प्रशासकीय

**शासनाची/ मा.उच्च न्यायालयाची मान्यतेची आवश्यकता**: नाही

**विभागाचा स्पष्ट मत**: श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पॅसेजमधील मजल्यांचे रिलींगची उंची वाढविणेसाठी नविन रेलींग तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागविणेसव याकामी येणा-या अंदाजे रुपये 81,444/- (अक्षरी एक्याऐंशी हजार, चारशे चव्वेचाळीस) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये निवास करणाऱ्या भक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरहू इमारतीच्या पॅसेजमधील मजल्यांच्या रिलींगची उंची वाढविणेसाठी नविन रेलींग तयार करुन बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स यांचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८१,४४४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१ श्री साई प्रसादालयाकरीता वॉटर कुलर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना दररोज प्रसाद भोजन देण्यात येते. प्रसाद भोजन घेतल्यानंतर साईभक्तांना पिण्याचे पाणी आर.ओ. व्दारे शुध्द करणेची व्यवस्था केलेले आहे. मात्र सदर पाणी थंड असावेत, अशी साईभक्तांव्दारे वारंवार मागणी केली जात असल्याने सदर गैरसोय दुर व्हावी याकरीता प्रसादालयाचे उत्तर बाजूचे गेटजवळ 2 नग व साईआश्रम इमारतीमधील स्वयंसेवी भोजन कक्षामध्ये 1 नग असे एकूण 3 नग वॉटर कुलर बसविणेबाबत संदर्भीय टिपणीन्वये मान्यता मिळालेली आहे.

श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांनी प्रसाद भोजन घेतलेनंतर थंड पिण्याचे पाण्याची सुविधाकरीता सध्या इकडील विभागाकडे आवश्यक असलेले वॉटर कुलर शिल्लक नाहीत. त्यामुळे खालील तपशीलाप्रमाणे वॉटर कुलर खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशील | ठिकाण | मागणी | अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वॉटर कुलर<br>क्षमता– 150 लिटर,<br>कंपनी– व्होल्टास/ ब्लु स्टार | श्री साई प्रसादालय हॉल, उत्तर बाजू गेट | 2 नग | 52,000/- | 1,04,000/- |
| 2. | वॉटर कुलर<br>क्षमता– 150 लिटर,<br>कंपनी– व्होल्टास/ ब्लु स्टार | साईआश्रम स्वयंसेवी प्रसाद भोजन कक्ष | 1 नग | 52,000/- | 52,000/- |
| 3. | वॉटर कुलर<br>क्षमता– 150 लिटर,<br>कंपनी– व्होल्टास/ ब्लु स्टार | स्टॅन्ड बाय<br>(संस्थान परिसराकरीता) | 2 नग | 52,000/- | 1,04,000/- |
| | | | | **एकूण रक्कम रुपये-** | **2,60,000/-** |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे साईभक्तांनी प्रसाद भोजन घेतलेनंतर थंड पिण्याचे पाण्याची सुविधेकरीता वॉटर कुलर खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये 2,60,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. श्री साई प्रसादालयामध्ये वॉटर कुलर बसविणेकामी खरेदीकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये भक्तांच्या सोयीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ०५ नग वॉटर कुलर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) चे एक महिन्याच्या बिलाची रक्कम मे.यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस,पुणे यांना अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:** अधिनियम कलम 21(1) अन्वये समितिकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमात्तंची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**: बांधकाम विभागाने श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 200 Cum/Day) परिसरामध्ये डेक्कन एन्व्हायरोमेंट कन्सल्टंटस् प्रा. लि., पुणे यांचेमार्फत रुग्णालयाचे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेत आलेले आहे सदर प्रकल्पाचा वारंटी कालावधी संपलेनंतर मा व्यवस्थापन समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 3(3) अन्वये दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 या कालावधीसाठी वार्षिक देखभाल दुरुस्ती (Operation & Maintenance) करणेकामी मे.यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना रुपये 7,80,000/- (प्रती महिना रुपये 65,000/-) मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला होता. सदरचा कालावधी हा 31/03/2016 रोजी संपुष्टात आला होता.

बांधकाम विभागाचे दिनांक 10/01/2016 रोजीचे मंजूर टिपणी अन्वये सदरचे दोन्ही सयंत्र मेकॅनिकल विभागाकडे हस्तांतरीत करणेस तसेच दिनांक 31/3/2016 चे पुढील कालावधीकरीता AMC देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही मेकॅनिकल विभागामार्फत करणेकामी फाईल्स दिनांक 11/01/2016 रोजी मेकॅनिकल विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या होत्या. पुढील कालावधीकरीता AMC देणेकामी इकडील विभागामार्फत मा. व्यवस्थापन समितीचे समितीचे दिनांक 16/02/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 137 अन्वये रुपये 9,00,000/- मात्रचे रकमेस मान्यता घेण्यात आली होती. दिनांक 31/03/2016 पूर्वी AMC देणेकामी करावयाच्या ई-निविदा प्रक्रिया घेणेसाठी वेळ कमी असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 06/05/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 283 अन्वये पूर्वीच्याच कार्यादेशातील (दिनांक 01/04/2015 ते दिनांक 31/03/2016 या कालावधीतील) दरानुसार प्रती महिना रुपये 65,000/- प्रमाणे दिनांक 01/04/2016 ते दिनांक 31/05/2016 या दोन महिन्याचे कालावधीसाठी काम मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तत्पुर्वी दिनांक 21/03/2016 रोजी याकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेली होती. सदर कालावधीमध्ये फक्त एकच ई निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक 20/04/2016 रोजी ई निविदा फेर (दुसरी वेळेस) अपलोड करण्यात आलेली होती. त्यानुसार प्राप्त व पात्र 3 ई-निविदाचे कर्मशिअल बीड दिनांक 13/05/2016 रोजीचे उप-समितीचे सभेपुढे उघडणेत आले. त्यातील निम्नतम दरधारक मे. पानसे कन्सल्टंट, पुणे यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उप-समितीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 19/05/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 307(6) अन्वये मान्य करण्यात आली. सदर ठरावाची प्रत जा. नं. एसएसएस/वशी-04/1063/2016 दिनांक 20 जुन, 2016 रोजी मेकॅनिकल विभागास प्राप्त झाल्याने, मे. पानसे कन्सल्टंटस, पुणे यांना जानं. एसएसएसटीमेकॅनिकल/1550/2016 दिनांक 1 जूलै, 2016 अन्वये माहे दिनांक 01/07/2016 ते दिनांक 30/06/2017 या कालावधीकरीता रक्कम रूपये 70000/- प्रती महीना या नुसार वार्षीक रूक्कम रूपये 840000/- मात्र रक्कमेस Operating & Maintenance करीता कार्यादेश देणेत आला आहे. तथापि सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) प्लांट कार्यरत राहणे आवश्यक असलेअने दिनांक 01/06/2016 ते दिनांक 30/06/2016 या एक महिन्याचे कालावधीकरीता Operation & Maintenance चे काम मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांचेकडून करुन घेणेत आलेले आहे त्यांचे पुर्वीचेच दरानुसार एक महिन्याकरीता रुपये 65,000/- मात्रची रक्कम अदा करावी लागणार आहे. सदर खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) प्लांट कार्यरत राहणे आवश्यक असलेने दिनांक 01/06/2016 ते दिनांक 30/06/2016 या एक महिन्याचे कालावधीत Operation & Maintenance ची कामे केलेल्या मे. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांना रुपये 65,000/- (अक्षरी रुपये पासष्ट हजार) मात्रची रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या रु.६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३** **स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच टाईप पोल यांना रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ४.१ – खरेदी किंमत रु.३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईनाथ रुग्णालय, व्दारावती भक्तनिवास इमारत, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) साईआश्रम भक्तनिवास, श्री साई प्रसादालय, साई धर्मशाळा, नविन स्टाफ क्वॉर्टर व पाणीपुरवठा साठवण तलाव याठिकाणी रात्रीचे प्रकाश व्यवस्थेकरीता स्ट्रीट लाईटचे पोल उभे करुन त्यावर स्ट्रीट लाईट फिटींग बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडुन विद्युतपुरवठा जोडणी करीता सबस्टेशनमध्ये H Type Pole उभे करण्यात आलेले आहेत. सदरील दोन्ही प्रकारचे पोल हे लोखंडी (Mild Steel) आहेत.

स्ट्रीट लाईट व सबस्टेशनचे एकुण पोलची संख्या साधारण ५४२ इतकी आहे. काही पोल साधारण २३ वर्षापुर्वी उभे करण्यात आलेले आहेत. ऊन, वारा व पाऊस यामुळे पोलचा रंग कालांतराने खराब होऊन पोल गंजु लागतात व पोलचे आयुष्यमान कमी होते. परिणामी पोल कमकुवत होऊन वारेवादळात पडुन प्राणहानी होण्याची शक्यता असते. याकरीता संस्थानचे उपरोक्त सर्व ठिकाणचे स्ट्रीट लाईट पोल व सबस्टेशनमधील एम.एस.पोलला सिल्व्हर कलर करुन घेणे गरजेचे आहे.

पोलला कलर करुन घ्यावयाच्या कामाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | संस्थानचे सर्व ठिकाणांचे स्टील टयुबलर पोल व H Type स्टील पोल त्यांना कलर करणेकामी पोल पॉलिश पेपरने घासुन स्वच्छ करुन दोन कोटमध्ये सिल्व्हर कलर करणे. | ५४२ नग. | रु. ८५०/- | रु. ४,६०,७००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ४,६०,७००/-** |

उपरोक्तप्रमाणे संस्थानचे सर्व ठिकाणचे पोलला सिल्व्हर कलर करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४,६०,७००/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. शासन निर्णयानुसार सदरचे कामासाठी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ५४२ नग स्ट्रिट लाईट पोल व सबस्टेशनचे एच टाईप पोल यांना रंगकाम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४४** **स्टॅण्ड फॅन, सिलींग फॅन, टेबल फॅन व इंडस्ट्रियल फॅन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

शासन निर्णय परिच्छेद क्र. ४.१– खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मंदिर परीसरामधील दर्शन लाईन तसेच जुने प्रसादालय हॉल दर्शनलाईन मध्ये स्टॅन्ड फॅन व सिलींग फॅन बसविलेले आहेत. यामधील बरेचसे फॅन सततच्या वापरामुळे खराब झालेले आहेत. तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय, व्दारावती भक्तनिवास, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास, साई धर्मशाळा, याठिकाणी विद्युत विभागाकडे उपलब्ध असलेल्या स्टॅण्ड फॅनची व सिलींग फॅनची वेळोवेळी मागणी होत असते. तसेच श्री साईबाबा संस्थानमार्फत साजरे केले जाणाऱ्या उत्सवांमध्येही स्टेज कार्यक्रमासाठी स्टॅण्ड फॅन तसेच टेबल फॅनची आवश्यकता भासते. याठिकाणी लागणारे स्टॅण्ड फॅन, टेबल फॅन व सिलींग फॅन संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाकडील सबस्टोअरला शिल्लक नाही त्याकरीता स्टॅण्ड फॅन, टेबल फॅन, इंडस्ट्रीयल फॅन व सिलींग फॅनची खरेदी करणे गरजेचे आहे. सदरचे स्टॅण्ड फॅन, टेबल फॅन, इंडस्ट्रीयल फॅन व सिलींग फॅन खरेदी करणेकामी येणारा खर्च महाराष्ट्र शासनमान्य CSR (सन २०१३-२०१४) प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr.No | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 2-13-3 | Supplying regular/standard model **Ceiling fan** of **1200 mm. sweep** complete erected in position as per specifcation no. **FG-** | 150 Nos. | 1821.75 | 2,73,262.50 |
| 02) | 2-13-9 | Supplying **pedestal type air circulator 450 mm. sweep** oscillating type suitable to work on 230 Volts 50 cycles 1440 RPM with speed regulator, overhead protection unit, totally enclosed, flame proof motor with additional 3 core wire, 5 metre length and Hand Shield type 3 pin 5A. plug top complete with moisture proof treatment and 'E' class insulation and marking Sr. No. and date of erection. | 20 Nos. | 5111.40 | 1,02,228.00 |
| 03) | 2-13-10 | Supplying **pedestal type air circulator 600 mm. sweep** oscillating type suitable to work on 230 Volts 50 cycles 1440 RPM with speed regulator, overhead protection unit, totally enclosed, flame proof motor with additional 3 core wire, 5 metre length and Hand Shield type 3 pin 6A. plug top complete with moisture proof treatment and 'E' class insulation and marking Sr. No. and date of erection. | 30 Nos | 7616.70 | 2,28,501.00 |
| 04) | 2-13-11 | Supplying Table fan of A.C.230 V.50 cycles 400 mm. oscillating type complete with 2 mtrs. Of 3 core flexible wire and Hand shield type 3 pin plug top and marking Sr.No.and date of erection. | 10 Nos | 1876.35 | 0,18,763.50 |
| 05) | 2-13-12 | Supplying and erecting cabin fan of A.C. 230 V 50 cycles 250 mm./ 300 mm sweep complete with necessary brackets for fixing cabin fans, wire etc and marking Sr.No. and date of erection. | 05 Nos | 1655.85 | 0,08,279.25 |
| 06) | 2-13-13 | Supplying and erecting cabin fan of A.C. 230 V 50 cycles 400 mm. sweep complete with necessary brackets for fixing cabin fans, wire etc and marking Sr.No. and date of erection. | 05 Nos | 1876.35 | 0,09,376.75 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 07) | Non C.S.R. | Supplying **Tubular type Man Coolers (Industrial Fan) Fan 450 mm. sweep,** suitable to work on 450 Volts 50 cycles 1440 RPM with speed regulator, overhead protection unit, totally enclosed, **0.75 H.P. Three Phase motor** with moisture proof treatment and 'E' class insulation and marking Sr. No. and date of erection. **Type:-WMC-45,** | 04 Nos. | 10000.00 | 0,40,000.00 |
| 08) | Non C.S.R. | Supplying **Tubular type Man Coolers (Industrial Fan) Fan 450 mm. sweep,** suitable to work on 450 Volts 50 cycles 1440 RPM with speed regulator, overhead protection unit, totally enclosed, **2.0 H.P. Three Phase motor** with moisture proof treatment and 'E' class insulation and marking Sr. No. and date of erection. **Type:-WMC-45,** | 02 Nos | 14000.00 | 0,28,000.00 |
| 09) | Non C.S.R. | Supplying **Tubular type Man Coolers (Industrial Fan) Fan 6000 mm. sweep,** suitable to work on 450 Volts 50 cycles 1440 RPM with speed regulator, overhead protection unit, totally enclosed, **0.75 H.P. Three Phase motor** with moisture proof treatment and 'E' class insulation and marking Sr. No. and date of erection. **Type:-WMC-60,** | 02 Nos | 18000.00 | 0,36,000.00 |
| 10) | Non C.S.R. | Supplying **Tubular type Man Coolers (Industrial Fan) Fan 600 mm. sweep,** suitable to work on 450 Volts 50 cycles 1440 RPM with speed regulator, overhead protection unit, totally enclosed, **2.0 H.P. Three Phase motor** with moisture proof treatment and 'E' class insulation and marking Sr. No. and date of erection. **Type:-WMC-75,** | 02 Nos. | 25000.00 | 0,50,000.00 |
| | | | | **Total Rs.:-** | **7,94,416.00** |

उपरोक्तप्रमाणे स्टॅण्ड फॅन, टेबल फॅन, इंडस्ट्रीयल फॅन व सिलींग फॅनची खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रु. ७,९४,४१६/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचे काम करणेकरीता शासन निर्णयानुसार सदरचे कामासाठी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे स्टॅण्ड फॅन, टेबल फॅन, इंडस्ट्रीयल फॅन व सिलींग फॅन खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,९४,४१६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५** **श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील डिस्प्ले बोर्ड बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३– रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

दि.०८-०२-२०१६ रोजी मा.वैद्यकिय संचालक यांचे समवेत वैद्यकिय प्रशासक, सोशल वर्कर, सहा.अधिसेविका, एमसीओ, ओपीडी इन्चार्ज, स्वच्छता सुपरवायझर, सिक्युरिटी सुपरवायझर, बांधकाम विभाग कर्मचारी, मॅकेनिकल विभाग कर्मचारी इत्यादि श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये राऊंड घेतला असता डॉ.विजय पाटील, वैद्यकिय संचालक यांनी सुचना केलेल्या आहे त्याची अंमलबजावणी तात्काळ करावी असे दि.१२-०२-२०१६ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा हॉस्पिटलमार्फत विद्युत विभागाकडे कळविलेले आहे.

दि.१२-०२-२०१६ चे पत्रातील मुद्दा क्र.१४ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटल नावाचा (पुर्वबाजू) मेनगेटवरील दोन बोर्ड पैकी एक फ्लेक्स बोर्ड तयार करुन समोरुन लाईट लावावी व त्यावरील असलेला एक बोर्ड हा एल.ई.डी.करणेत यावा अशा सुचना डॉ.विजय पाटील, वैद्यकिय संचालक यांनी केलेल्या आहेत परंतु सदरच्या पत्रामध्ये बोर्डची साईज, अक्षरांची साईज, त्यांचा कलर, बोर्ड कोणत्या भाषेत पाहिजे, याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती नसल्याने तसेच दोन बोर्ड पैकी कोणत्या ठिकाणचा बोर्ड एल.ई.डी.पाहिजे ते कळविलेले नसल्याने विद्युत विभागामार्फत मा.वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना जा.नं.एसएसएसटी/ विद्युत/ २३४/ २०१६ दि.२३-०२-२०१६अन्वये माहिती मागविणेत आली होती. त्यानुसार सदर बोर्डची त्यांनी जा.नं.एसएसएसबीएच/ वै.प्र./ ३९ / २०१६ दि.०३-०३-२०१६अन्वये खालीलप्रमाणे विद्युत विभागास माहिती कळविलेली आहे

| अ.क्र. | बोर्डचा तपशिल | साईज |
|---|---|---|
| ०१) | श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी. या नावाचा | लांबी-३० फूट व रुंदी-४ फूट |
| ०२) | बोर्डची भाषा | बोर्डचा अर्धा भाग मराठी व अर्धा भाग इंग्रजी व मध्यभागी साईबाबांचा फोटो टाकावा. |
| ०३) | कलर | लाल कलर |

सध्या बाजारामध्ये नविन तंत्रज्ञानावर आधारित LED (Light Emmiting Diode) चे अत्यंत आकर्षक Display Board आलेले आहेत. सदर बोर्डामध्ये वापरण्यात येत असलेल्या LED मुळे अक्षरे बंद पडत नाहीत आणि शिवाय LED ना वीज अत्यंत कमी प्रमाणात लागते. अशा प्रकाराचा बोर्ड मंदिर परीसरातील नगर-मनमाड महामार्गाच्या बाजूने मुख्य प्रवेशव्दाराजवळ लोखंडी ग्रील्सच्या वरील बाजूस बसविण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल नगर-मनमाड महामार्गाच्या बाजूने मुख्य प्रवेशव्दाराचे वरील बाजूसLED डिस्प्ले बोर्ड बसविले तर साईभक्तांकरीता/ रुग्णांकरिता ते मार्गदर्शन व सोईचे ठरतील. सदर डिस्प्ले बोर्डामध्ये श्री साईबाबांच्या फोटो लावावयाचा असल्यामुळे महामार्गावरुन येणा-या जाणा-या भक्तांना / रुग्णांना साई चे दर्शन रुपाने समाधान लाभेल.

श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीवर रात्रीचे वेळेस लांब अंतरावरुन भक्तांना दिसतील व वाचता येतील असे LED मध्ये असलेले डिस्प्ले बोर्ड श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे मागणीनुसार बसविण्याची आवश्यकता आहे. असे बोर्ड बसविल्यामुळे रुग्णांना मार्गदर्शक ठरुन इमारतींच्या सौंदर्यातही भर पडेल

श्री साईबाबा हॉस्पिटल याठिकाणी लावावयाचे डिस्प्ले बोर्ड बनविणेकामी कोटेशनधारकांना कोटेशन पत्र पाठवून कोटेशन मागवावे लागणार आहे. याकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | बोर्ड साईज | नग | दर (अंदाजे) | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ ) | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३.५ फूट X ३६.५ फूट | ०१ नग | रु. २,५०,०००/- | रु. २,५०,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम :-** | **रु. २,५०,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील डिस्प्ले बोर्ड बसविणेकामी शासन निर्णयानुसार संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करणेस व कोटेशनधारकांना पोस्टाव्दारे कोटेशन पत्र पाठवून कोटेशन मागविणेस व येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये २,५०,०००/- इतक्या खर्चास व कामास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील भगव्या रंगाचा डिस्प्ले बोर्ड तयार करुन बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६** **आय.एस.ओ. ऑडीटर यांनी साईआश्रम भक्तनिवासस्थान मध्ये प्रत्येक रुमला बेल व बेलस्वीच बसविणेबाबत दिलेल्या सुचना.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ४.१– खरेदी किंमत रु.३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

साईआश्रम भक्तनिवासस्थानचे अधिक्षक यांनी विद्युत विभागाकडे दि.२७-०१-२०१६ रोजी पत्र पाठवून देणगीदार साईभक्त मा.श्री.केशु मुर्ती व आयएस.ओ.ऑडिटर श्री.एस.मदन रेड्डी व श्री.श्रीनिवास यांनी साईआश्रम येथे दि.१२-१२-२०१५ व दि.१३-१२-२०१५ या दोन्ही दिवशी,आय.एस.ओ.मानांकन नुतनीकरण कामी केलेल्या ऑडिटमध्ये साईआश्रम भक्तनिवास इमारतींमधील कोणत्याही खोलीला डोअर बेल बसविलेली नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे आय.एस.ओ.ऑडिटर यांनी सुचना दिल्याप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास इमारतींच्या सर्व खोल्यांना डोअर बेल व बेलस्विच बसविणेकामी साईआश्रम भक्तनिवासस्थान विभागाने मागणी केलेली आहे.

साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे एकुण १२ इमारती असून एका इमारतीमध्ये १२८ रुमस् याप्रमाणे १२ इमारतींमध्ये एकुण १५३६ रुमस् आहेत. या एकुण १५३६ रुम करीता डोअर बेल व बेलस्वीच बसवून वायरींग करणे संदर्भात दि.०२-०२-२०१६ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन साईआश्रम भक्तनिवासस्थानच्या प्रत्येक रुमला बेल बसवून वायरींग करणे कामाचा खर्च शासनमान्य सी.एस.आर.सन २०१३-२०१४ प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-2-12 | Supplying and erecting PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32 mm with accessories on wall/ceiling as per specification No: | 2304 Mtr. | 45.15 | 1,04,025.60 |
| 02) | 1-3-4 | Supplying & erecting mains with 2x1.5 sq.mm F.R.L.S copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 3400 Mtr. | 56.70 | 1,92,780.00 |
| 03) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A / 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete | 1536 Nos | 90.30 | 1,38,700.80 |
| 04) | 1-8-3 | Supplying and erecting modular type bell-push 6A / 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 1536 Nos. | 114.45 | 1,75,795.20 |
| 05) | 1-8-27 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 1 module complete duly erected in an approved manner | 1536 Nos | 131.25 | 2,01,600.00 |
| 06) | 2-2-13 | Supplying and erecting Ding Dong / electronic musical type call bell with heavy duty coil suitable to operate on 230V A.C. supply with 6"x 8" sunmica board and connection terminal. | 1536 Nos | 100.80 | 1,54,828.80 |
| 07) | 2-2-13 | Supplying Ding Dong / electronic musical type call bell with heavy duty coil suitable to operate on 230V A.C. supply with 6"x 8" sunmica board and connection terminal. (Spare for maintenance) | 200 Nos. | 86.10 | 0,17,220.00 |
| | | | | **Total Rs.:-** | **9,84,950.40** |
| | | | | **Round Up :-** | **9,84,950.00** |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवासस्थान इमारतींमधील एकुण १५३६ रुमकरीता डोअर बेल व बेलस्वीच बसवून वायरींगचे काम करणेकामी रक्कम रुपये ९,८४,९५०/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचे काम करणेकरीता शासन निर्णयानुसार वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आय.एस.ओ. ऑडीटर यांनी केलेल्या सुचनेनुसार साईआश्रम भक्तनिवास ईमारतीमधील प्रत्येक रुमला बेल तसेच बेलस्वीच बसवून वायरींगचे काम करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,८४,९५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७** **मंदिर परिसरातील ५०० के.व्ही.ए.जनरेटर सेट इंजिन नंबर २५२६०००३ मॉडेल व्हीटीए-२८ जी या जनरेटरसेटच्या अल्टरनेटरचे ओव्हरहॉलींग व रिवायरींग करणे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसरातील श्री समाधी मंदिर, गुरुस्थान, व्दारकामाई, चावडी, दर्शनलाईन, शांतिनिवास तसेच भक्तनिवास इमारत, साईउद्यान, साईप्रसाद नं.०१, साईप्रसाद नं.०२, साईनिवास अतिथीगृह तसेच मंदिर परीसर इत्यादि ठिकाणच्या वीजपुरवठयासाठी ११ के.व्ही.सबस्टेशन उभारुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युत पुरवठा जोडून घेण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी ५०० के.व्ही.ए. क्षमतेचे ०२ जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. या दोन जनरेटर सेटपैकी जनसेट क्र.०१ हा जनरेटर दिनांक ११-०९-१९९० रोजी बसविण्यात आलेला असून जनसेट क्र.०२ हा जनरेटर दिनांक २२-१०-२००० रोजी बसविण्यात आलेला आहे. आतापर्यंत या जनसेटच्या मेन्टेनन्ससाठी कोणताही खर्च झालेला नाही.

दिनांक ०९-०६-२०१६ रोजी दुपारी साधारण १२.३० मिनिटांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर अखंडीत वीज पुरवठयाकरीता सन२००० साली बसविण्यात आलेला जनसेट क्र.०२ हा सुरु करण्यात आलेला होता. परंतू सदरचा जनरेटर सेट चालू करण्यात आल्यानंतर त्यामध्ये बिघाड निर्माण झालेला असल्याने पुर्ण क्षमतेने वीजेची निर्मिती होत नव्हती. त्यामुळे जनसेट क्र.०१ चालू करण्यात येऊन त्यावर वीजेचा लोड शिफ्ट करण्यात आलेला आहे. परंतू सध्या उन्हाळयाचे दिवस असल्याने वीजेचा वापर जास्त होत असल्याने जनरेटर क्र.०१ ची क्षमता कमी पडत असल्याने काही ठिकाणचा वीजेचा पुरवठा बंद ठेवावा लागत आहे.

कमिन्स या जनसेट उत्पादक कंपनीचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता तसेच संपूर्ण गोवा राज्याकरीता असलेले एकमेव मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हीस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना संस्थानच्या सर्व जनसेटच्या इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. त्यामुळे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांचेशी संपर्क साधुन त्यांना सदरच्या जनरेटर सेटमध्ये बिघाड निर्माण झालेला असून त्याबाबतची पाहणी करणेकरीता दिनांक ०९-०६-२०१६ रोजी सांगण्यात आलेले होते. त्यानुसार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांचे प्रतिनिधी यांनी सदरच्या जनरेटर सेटची दिनांक १०-०६-२०१६ रोजी पाहणी करुन अल्टरनेटरची वाईडींग जुनी झालेली असल्याने या वाईंडींगचे इन्सुलेशन कमकुवत होऊन त्याचे रेझिस्टन्स कमी होऊन पुर्ण क्षमतेने वीज निर्मिती होत नसल्याचे कळविलेले आहे. शिवाय सदरच्या अल्टरनेटरचे इन्सुलेशन कमकुवत झालेले असल्याने वाईंडींग गरम होत असल्याने सदरचा अल्टरनेटर खोलून तो रिवायंडींग करीता त्यांचे वर्कशॉपमध्ये नेणे गरजेचे असल्याचे त्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे. तसेच सदरच्या अल्टरनेटरचे रिवायरींग करणेकरीता सदरचा अल्टरनेटर खोलून तो मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद येथील वर्कशॉपमध्ये नेण्यास तसेच ओव्हरहॉलींग, रिवायरींग व अनुषंगिक कामे (बेअरींग बदलणे, रोटर अलायमेंट करणे, वार्निशिंग करणे, कार्बन साफ करणे, सेटींग करणे इत्यादि कामे) करुन पुन्हा शिर्डी येथे आणून बसविणेचे कामाकरीता अंदाजे रक्कम रु ३,००,०००/- ( अक्षरी रक्कम रु. तीन लाख मात्र ) इतका अपेक्षित खर्च कळविलेला आहे. तसेच प्रत्यक्षात सदरचा जनरेटर सेट खोलल्यानंतर त्यातील इतर पार्टच्या स्थितीनुसार सदरचा खर्च कमी किंवा जास्तीही होऊ शकतो असेही मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांनी कळविलेले आहे.

मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गासेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना संस्थानमार्फत देण्यात आलेल्या वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये जनरेटर अल्टरनेटरबाबतचा बिघाड हा क्वचित निर्माण होत असल्याने या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये जनरेटरच्या अल्टरनेटरच्या रिवायरींगचा अथवा दुरुस्तीच्या कामाचा समावेश केलेला नाही. मंदिर परीसर हा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग असल्याने याठिकाणचा वीजेचा पुरवठा अखंडीत राहावा याकरीता मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस् औरंगाबाद यांनी अहवाल सादर केलेल्या अहवालाप्रमाणे सदरच्या जनरेटरचा अल्टरनेटर खोलुन रिवायरींगकरीता औरंगाबाद येथील वर्कशॉपमध्ये नेणे गरजेचे आहे.

त्यानुसार कमिन्स या जनसेट उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलरमे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांनी कळविल्याप्रमाणे सदरच्या जनरेटर सेटच्या अल्टरनेटरची ओव्हरहॉलींग व रिवायरींग करणेस तसेच रक्कम रु.३,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास (प्रत्यक्षात सदरचा जनरेटर सेट खोलल्यानंतर त्यातील इतर पार्टच्या स्थितीनुसार सदरचा खर्च हा कमी किंवा जादा होऊ शकतो) मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील ५०० के.व्ही.ए.जनरेटर सेट इंजिन नंबर २५२६०००३ मॉडेल व्हीटीए-२८ जी या जनरेटरसेटच्या अल्टरनेटरचे ओव्हरहॉलींग व रिवायरींग करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात येऊन, कार्यवाही सुरु केलेली आहे, याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९३** व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेमध्ये हॉस्पिटल उपसमिती गठीत करणेत येऊन, त्या समितीसमोर सदरहू विषय सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४९** **श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरीता fuji कंपनीच्या C.R.System Cassettes screen हे fuji कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s.Nirmal Agencies,Ahmednagar यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४९४** व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेमध्ये हॉस्पिटल उपसमिती गठीत करणेत येऊन, त्या समितीसमोर सदरहू विषय सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५०** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता Manman कंपनीचे Burr व Craniotome Cutter/ Handpiece हे मे.मनमन,पुणे यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाने दि.२१/०४/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये (औषध भांडार प्राप्त दि.२७/०४/२०१६) मनमन कंपनीच्या Burrs व Craniotome Cutter / Handpiece ची मागणी केलेली आहे. यापुर्वी Manman Craniotome Set सन २०१० साली एकुण रक्कम रु.८९,२१०/- इतक्या किंमतीत खरेदी

करण्यात आला होता. त्यांचेकडे सध्या मनमन कंपनीचे ड्रिल मशिन असून सदरहू मशिनला मनमन कंपनीच्याच Burrs व Craniotome Cutter / Handpiece ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे असलेल्या Burrs चा Sharpness कमी झाल्यामुळे त्यांनी Burrs ची मागणी केलेली आहे, तसेच सध्या ऑपरेशन थिएटर विभागामध्ये एकच Craniotome Cutter / Handpiece उपलब्ध असून मेंदूचे तातडीचे शस्त्रक्रियेचे वेळेस त्याची आवश्यकता असते, म्हणून त्यांनी आणखी एक नग Standby Handpiece ची मागणी केलेली आहे.

न्युरो शस्त्रक्रिया विभागाकरीता मनमन कंपनीच्याच Burrs व Craniotome Cutter / Handpiece ची आवश्यकता असल्यामुळे बायोमेडीकल विभागामार्फत मे.मनमन, पुणे यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यानुसार त्यांनी पत्र क्र.MAN/Apr/NUT-029/JD दि.२३/०४/२०१६ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहेत-

| Sr.No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. In Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Manman Cranitome Handpiece (with 5 no. cutters) | 1 | 36125.00 | 36125.00 |
| 2. | Manman Perforator Cutter 8mm | 2 | 6500.00 | 13000.00 |
| 3. | Manman Perforator Cutter 10mm | 2 | 6500.00 | 13000.00 |
| 4. | Manman Perforator Cutter 12mm | 2 | 6500.00 | 13000.00 |
| | | | **Total Amt.in Rs.** | **75125.00** |

उपरोक्तप्रमाणे Craniotome Cutter / Handpiece व Burrs खरेदीकामी रक्कम रु.७५,१२५/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार एकशे पंचवीस मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाने दि.२१/०४/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे. (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.२७/०४/२०१६)

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** न्युरो ओ.टी. शस्त्रक्रिया विभागात मेंदुच्या दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी सदर Handpiece व Burrs ची आवश्यकता आहे, तसेच त्यांना Manman कंपनीचेच Handpiece व Burrs पाहीजे असल्यामुळे M/s.Manman, Pune यांचेकडुन सदरहू खरेदीकामी रक्कम रु७५,१२५/- (अक्षरी रु.पंच्याहत्तर हजार एकशे पंचवीस मात्र) इतका खर्च येणार आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील न्युरो ओ.टी. करीता वरीलप्रमाणे Craniotome Cutter / Handpiece व Burrs हे M/s.Manman, Pune यांचेकडुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.७५,१२५/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार एकशे पंचवीस मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर या विभागाकरीता Burr व Craniotome Cutter/ Handpiece हे मे.मनमन, पुणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.७५,१२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५१** **सन २०१५-१६ मधील (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरीक्त खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.३०/०१/२०१५ निर्णय क्रमांक २६ Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य खरेदीकामी सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजुर दराने दि२८/०७/२०१५ रोजी एकुण रक्कम रु.१६,७५,७२,९४७.४४ इतक्या रक्कमेचे आणि दि.१३/११/२०१५ रोजी रु.१६,३६,५५,५०८.२७ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा चालु आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादींचा औषधांचा भांडारात साठा शिल्लक नाही, सदर साठयाची वार्षिक मागणी पुर्ण झालेली आहे. तथापि सदरहू औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य हे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असल्यामुळे तेंव्हा गरज पाहता काही औषधे / सर्जिकल साहित्य मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहेत, तसेच काही औषधे खरेदी करण्यात आलेली आहेत, तर काही औषधे खरेदीचा प्रस्ताव आहे. सदर औषधे / सर्जिकल साहित्य हे आपण जर मंजुर दराव्यतिरीक्त खरेदी केले तर त्यासाठी जास्त खर्च येऊन त्यात संस्थानचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर मटेरीयल हे मंजुर दरानेच खरेदीचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच ब-याच ठिकाणी मागील खप पाहता तसेच पुढील वार्षिक खरेदीचा कालावधी बघता वार्षिक मंजुर नग संख्या व्यतिरीक्त जास्त नग संख्याची मागणी करण्यात आलेली आहे.

सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४८,४१,००,१८३/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव दि.१०/०५/२०१६ रोजी मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला असून सदर प्रस्तावास मा.त्रिसदस्य समिती सभा व मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळून औषधे प्राप्त होण्यास बराच कालावधी लागणार आहे, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये म्हणून सोबतच्या यादीतील औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील व याकामी मंजुर दराने रक्कम रु.७१,८५,३०२/- इतका खर्च येणार आहे.

दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२६ अन्वये वार्षिक औषधे खरेदीमधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्यास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील अप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८/०७/२०१५ व दि.१३/११/२०१५ अन्वये एकुण रक्कम रु.३३,१२,२८,४५५.७१ इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून त्यान्वये आजपर्यंत रु.१७,८८,३७,८६६/- इतक्या रक्कमेचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात आलेले आहेत, म्हणजेच मंजुर रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- पैकी रु.३७,८४,९८,५२६/- इतकी रक्कम शिल्लक आहे, त्यामुळे आपणास अतिरीक्त खरेदी ही शिल्लक रक्कमेतुन करता येणार आहे.

वार्षिक खरेदीमधील काही औषधे ही वार्षिक मागणीपेक्षा कमी लागतात तर काही औषधे ही मुळ मागणीपेक्षा जास्त लागतात, अशी औषधे मंजुर दराने(Annual Rate Contract) खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. सन २०१५-१६ या वार्षिक खरेदीमध्ये रक्कम रु.३३,१२,२८,४५५.७१ इतक्या मंजुर रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले असून वार्षिक मंजुर दराने आतापर्यंत अतिरीक्त औषधे खरेदी करण्यात आलेली नाही.

**मागणी –** सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्ण दाखल होत असतात. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात, त्यामुळे औषधांचा खप हा कधी कधी अचानक वाढतो. राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळत असतो. त्यामुळे जशी जशी लागतील तशी तशी औषधे वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात येतील. कारण एकाच वेळेस खरेदी करुन ठेवल्यास ती मुदतबाहय होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे संस्थानचे मोठे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते.

तसेच सन २०१६-१७ या वर्षाच्या पुढील वार्षिक औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब केमीकल्स, कन्झुमेबल्स व किरकोळ साहित्य इत्यादी खरेदीकामी बराच कालावधी लागणार आहे, त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी लागणा-या औषधांची गैरसोय होऊ नये म्हणून सोबतच्या यादीतील औषधे सन २०१५-१६ या वर्षातील मंजुर दराने खरेदी करुन देता येतील. त्यामुळे सदरहू मंजुर दराने सोबतच्या तक्त्यातील औषधे तातडीने खरेदी करणेचे गरजेचे आहे.

तरी वार्षिक मंजुर दराने व मागील वर्षाच्या वार्षिक औषधे खरेदीकामी मंजुर रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- पैकी शिल्लक रक्कम रु.३७,८४,९८,५२६/- मधून सोबतच्या तक्त्यातील औषधे तातडीने खरेदी करणेत आलेले असून याकामी येणाऱ्या रक्कम रु.७१,८५,३०२/- चे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सदरचा प्रस्ताव नोंद घेणेकामी सादर.

**निर्णय क्र.४९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ (Annual Rate Contract) वार्षिक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य यांच्या अतिरिक्त खरेदीबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड/ओ.टी.मधील जुन्या गाद्या दुरुस्त करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झालेले होते.

सदर लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक २७/१०/२०१५ नि.क्र.४०० अन्वये रु.३,८४,५२१/-(तीन लाख चौ-याऐंशी हजार पाचशे एकवीस मात्र) इतक्या रकमेचे लिनन जाळुन नष्ट केलेले असुन सदर लिननमध्ये वॉर्ड/ओ.टी च्या फाटलेल्या ८३ नग गादया जमा झालेल्या होत्या, सदर गादया २००५-२००६ मध्ये रु.४८३७/-प्रती नगाप्रमाणे खरेदी केलेल्या होत्या. वॉर्डमध्ये रोजच्या वापराने व पेशंटचे रक्ताने सदर गादयांचे फोम खराब झालेले आहे त्यामुळे २० गादयांचा दुर्गंध येत असल्याने त्या जाळुन नष्ट केल्या असुन उर्वरीत ६३ नग गादया जमा आहेत त्यापैकी काही गादया कमी प्रमाणात फाटलेल्या आहेत तर काही जास्त प्रमाणात फाटलेल्या आहेत त्यामुळे ६३ नगांपैकी ज्या गादयांचे फोम जास्त खराब झालेले असेल तर त्याचे फोम बदलुन किंवा ६३ पैकी ज्या गादयांचे मटेरीयल वापरता येण्यासारखे असेल ते वापरुन गादयांचे फोम व रेक्झीन बदलुन सदर गादया दुरुस्तकरून वॉर्डमध्ये वापरता येतील व उर्वरीत गादया जाळुन नष्ट करण्यात येतील.

यापुर्वी श्री साईबाबा हॉस्पिटलचे सोफा दुरुस्तीचे काम मे.कृष्णा फर्निशींग,राहाता यांनी केलेले असल्याने गादया दुरुस्तीकरीता अंदाजे खर्च किती अपेक्षीत आहे याकरीता त्यांना गादया दाखविण्यात आलेल्या आहेत त्यांनी गादया दुरुस्तीकरीता लागणारे मटेरीयल व येणारा अंदाजे खर्च खालीलप्रमाणे सांगितलेला आहे. सदर गादया पाहता ५० नग गादया दुरुस्तहोण्यासारख्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**एक नग गादी दुरुस्तीकरीता लागणारे मटेरीयल खालीलप्रमाणे.**

| अ.नं. | तपशील | प्र.नगास लागणारे मटेरीयल रु./पै | एकुण मी./ली. रु./पै. | एकुण खर्च रु./पै. |
|---|---|---|---|---|
| १ | रेक्झीन | ४ मीटर | २६०.०० | १०४०.०० |
| २ | फोम | ३X६चे १ सीट | ६००.०० | ६००.०० |
| ३ | बोस्टी | अर्धा लिटर | ११५.०० | ११५.०० |
| ४ | लेबर मजुरी | रु.४००/- | ४००.०० | ४००.०० |
| | | | एकुण खर्च | २१५५.०० |

**५० नग गादी दुरुस्तीकरीता लागणारे मटेरीयल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.नं. | तपशील | प्र.नगास लागणारे मटेरीयल रु./पै. | ५० नगास लागणारे मटेरीयल रु./पै. | एकुण मी./ली. रु./पै. | एकुण खर्च रु./पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | रेक्झीन | २६०.०० | २०० मीटर X ५० नग | ५२,०००.०० | ५२,०००.०० |
| २ | फोम | ६००.०० | ३X६चे ५० सीट X५० नग | ३०,०००.०० | ३०,०००.०० |
| ३ | बोस्टी | ११५.०० | अर्धा लिटर X ५०नग | ५,७५०.०० | ५,७५०.०० |
| ४ | लेबर मजुरी | ४००.०० | मजुरी X ५० नगाकरीता | २०,०००.०० | २०,०००.०० |
| | | | | **एकुण खर्च** | **१,०७,७५०.००** |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक,कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान-**

**१)** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे,त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**२)** **शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४,दि.३०ऑक्टोबर २०१५ अन्वये- परिच्छेद ३.२.३-** खरेदी रु.५००० ते ३ लाखापर्यंत असेल तेव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मुल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS &D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधीत खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** लिनन विभागात सध्या स्टॉकला १३ नग कापसाच्या गादया आहेत परंतु कापसाच्या गादया पेशंटचे रक्ताने लवकर खराब होत असल्याने त्याची मागणी नसते व फोमच्या गादया शिल्लक नाही तसेच वॉर्ड/ओ.टीची कायम फोमच्या गादया मिळणेकामी मागणी असते सदर गादया दुरुस्त करुन

घेतल्यास त्या दोन्ही रुग्णालयाला वापरता येतील. पन्नास नग फोमच्या गादया खरेदीकरीता २००५-२००६ साली प्रती नग रु.४८३७/- प्रमाणे रु.२,४१,८५०/-(अक्षरी रु.दोन लाख एकेचाळीस हजार आठशे पन्नास मात्र) इतका खर्च आला होता.

तरी वरीलप्रमाणे ५० नग गादया दुरुस्त करुन घेण्याकरीता विहीत पध्दतीने पुरवठाधारकांकडुन दुरुस्तीचे कोटेशन मागविणेस व अंदाजे खर्च रु.१,०७,७५०/-(अक्षरी रु.एक लाख सात हजार सातशे पन्नास मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा रुग्णालयातील वॉर्ड मधील जुन्या खराब झालेल्या गाद्या दुरुस्त करुन वापरण्यात याव्यात. तसेच ओ.टी.मधील जुन्या खराब झालेल्या गाद्या दुरुस्त करुन इतरत्र वापराव्यात व ओ.टी. साठी नवीन गाद्या खरेदी करणेत याव्या.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५३** **ब्लड बँकेतील फ्रीझर दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढीकरीता पुरवठा आदेश क्र. 14179, दि. 12/10/2006 अन्वये M/s. Vijay Trading Corporation, Shrirampur, यांचेकडुन मे. रेमी सेल्स ॲन्ड इंजिनीअरींग लि.,मुंबई या कंपनीचे एक Deep Freezer (Model-UDF-165, Sr. No. BDI-4466) एकुण रु.2,46,649/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर फ्रीजर दि. 06/02/2007 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन त्याकरीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 05/02/2008 रोजी संपला आहे. फ्रीजरचे दुरुस्ती व देखभालीकरीता कंपनीकडे दि. 01/04/2016 ते 31/03/2017 या कालावधीसाठी सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (AMC) करणेत आलेले आहे. सदर AMC कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व स्पेअर पार्टची व कन्झ्युमेबलची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या उपरोक्त फ्रीजर व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने कळविले आहे. त्यानुसार कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी फ्रीजरची तपासणी केली असता काही पार्ट व कॉम्प्रेसरचा गॅस रिफींलींग करणे आवश्यक असल्याचे त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट क्र. 20698, दि. 04/02/2016 अन्वये कळविले आहे. त्यासाठी कंपनीने पत्र क्र. QBBD-024/16-17, दि. 27/04/2016 अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. 35,250/- (अक्षरी रु. पत्तीस हजार दोनशे पन्नास मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन कंपनीने सदर रकमेची आगाउ मागणी केली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीसोबत झालेल्या चर्चेनंतर सदर रक्कम उपरोक्त फ्रीजर दुरुस्त झालेनंतर अदा होणेस स्वीकृती दर्शविली आहे.

उपरोक्त फ्रीजरचे स्पेअर पार्ट हे फक्त मे. रेमी सेल्स ॲन्ड इंजिनीअरींग ली. मुंबई यांचेकडेच मिळतात.

सदर दुरूस्तीचा खर्च नियमीत दुरूस्ती व देखभालीचा खर्च असल्यामूळे त्यास शासनाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही तसेच सदर खर्च रू. दहा लाखापेक्षा कमी असुन त्यास उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही.

तरी मे.रेमी सेल्स ॲन्ड इंजि. लि.मुंबई, यांचेकडून UDF-165 फ्रीजर दुरुस्त करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. 35,250/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमधील UDF-165 फ्रीजर मे.रेमी सेल्स ॲन्ड इंजि. लि.मुंबई, यांचेकडून दुरुस्त करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३५,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५४** **जादा वैद्यकीय बीलाचा परतावा अदा करणेस मंजूरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-** १) जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९८ दि.१६.०१.१९९९

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०२.२००९ निर्णय क्र.७५ अन्वये रु.१०,०००/- पर्यंत मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बीले ही मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कायम कर्मचा-यांची रु.१०,०००/- चे पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बीले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे.

**मागणी–**

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नांव | रुग्णालयाचे नांव | एकुण मागणी रक्कम रु. | एकुण देय रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ) श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय मध्ये उपचार होत नसल्यामुळे संस्थानच्या मान्य यादीत रेफर केले होते.** | | | | | | | |
| १ | क्षिरसागर राजेंद्र नामदेव विभाग- प्रसादालय हुद्दा- मुकादम | स्वतः | Durac AV Fistulla Embolisation | डॉ.म्हात्रे | बॉम्बे हॉस्पिटल | २१६०९९.०० | २०५०७५.०० | अ.नं.०१ ते १९ करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत |
| २ | शकीला सलीम शेख विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- मदतनीस | पती | Cancer | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३८५०.०० | ३८५०.०० | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नांव | रुग्णालयाचे नांव | एकुण मागणी रक्कम रु. | एकुण देय रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बाळासाहेब निवृत्ती डांगे विभाग- बांधकाम हुद्दा- मदतनीस | आई | Cancer | डॉ.खांदे | प्रवरा मेडीकल ट्रस्ट , लोणी | ४७७७.०० | ४७७७.०० | नसलेमुळे संस्थाच्या मान्य यादीतील हॉस्पिटल मध्ये पाठविणेत आले आहे. |
| ४ | लंके साहेबराव पांडूरंग विभाग- लेखाशाखा हुद्दा- लेखाधिकारी | आई | Cancer | डॉ.मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १४२३२.०० | १३७९३.०० | |
| ५ | कल्पना रघुनाथ मुसमाडे विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- परिचारीका | स्वतः व मुलगी | Hypothyrodiisum | डॉ.पोरवाल | दिनानाथ मंगेशकर, पुणे | ३५५४.०० | ३५५४.०० | |
| ६ | उज्वला मलक्का वडेर विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- परिचारीका | स्वतः | Gynac Treatment | डॉ.बगाडीया | प्रवरा मेडीकल ट्रस्ट , लोणी | ४७५४.०० | ४४७४.०० | |
| ७ | सुरेखा राजु गायकवाड विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा-परीचारीका | पती | Cancer | डॉ.राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १३३३८.०० | १३०००.०० | |
| ८ | बाबासाहेब काशीनाथ थेटे विभाग-व्दारावती विभाग हुद्दा- मदतनीस | स्वतः | Cancer | डॉ.गोरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १५०००.०० | १५०००.०० | |
| ९ | दिलीप गंगाधर बकरे विभाग- सा.प्र.नि. हुद्दा- प्र.अधिक्षक | स्वतः | CVA | डॉ.मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ६३६७.०० | ६३६७.०० | |
| १० | तुरकणे मधुकर रंगनाथ विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा-वॉर्ड बॉय | स्वतः | Angiography | डॉ.मोरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १४६००.०० | १४६००.०० | |
| ११ | जगनाथ देवराम डांगे विभाग- साईबाबा रुग्णालय हुद्दा- डायलेसीस टेक्नी. | स्वतः | Cancer | डॉ.कुलकर्णी / डॉ.जोशी | टाटा मेमोरियल हॉस्पी. मुंबई | ८५११६.०० | ८५११६.०० | |
| १२ | श्रीकांत संपत गुंजाळ विभाग-पा.पु. विभाग हुद्दा- फिल्टर ऑपरेटर | मुला | Haematology Disorder | डॉ.रचना साबळे / डॉ.अंत्रे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ९६४७२.०० | ९१४३२.०० | |
| १३ | बंदावणे सुभाष मल्हारी विभाग- ध्वनीक्षेपण हुद्दा- विदयुत पर्यवेक्षक | मुलगा | Renal Failure | डॉ.देसाई | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २३९४४.०० | १५८६८.०० | |
| १४ | स्वाती इंद्रभान कडू विभाग- ज्यु.कॉलेज हुद्दा- सहा. शिक्षिका | पती | Haemolytic Anemia | डॉ. गोरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | १९४९१.०० | १९४९१.०० | |
| १५ | प्रताप संपतराव कोते विभाग- फायर अॅन्ड सेफ्टी हुद्दा- कु. विक्रेता | वडील | Sensory Neural Heary Loss | डॉ. जोशी | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३२६५०.०० | ३२६५०.०० | |
| १६ | श्रीगणेश शिवकुमार बोलशेट्टी विभाग- साईनाथ रुग्णालय हुद्दा- मदतनीस | पत्नी | Perineal Abscess DKA č DM Acute Pyenephrity PNC | डॉ.जाधवर | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | १३२६३२.०० | १३२६३२.०० | |
| १७ | आण्णासो रामभाऊ डांगे विभाग- पाणीपुरवठा हुद्दा- प्लंबर | आई | Ca Vervix | डॉ. कांदळकर | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | ७२५२०.०० | ६२६८०.०० | |
| १८ | राधाकिसन हरिभाऊ गोंदकर विभाग- लाडु विभाग हुद्दा- मदतनीस | आई | Renal Failure | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ४०१४२८.०० | ३९१६७८.०० | |
| १९ | रविंद्र बाबासाहेब पवार विभाग- बांधकाम हुद्दा- लिपीक-टंकलेखक | वडील | DM č Sepsis č acute Renal Failure | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २५७३०४.०० | २५७३०४.०० | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नांव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नांव | रुग्णालयाचे नांव | एकुण मागणी रक्कम रु. | एकुण देय रक्कम रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **एकुण रक्कम रु.** | | **१४१८१२८.००** | **१३७३३४१.००** | |
| | **ब) संस्थानचे मान्य यादीत पाठविले परंतू उपचारासाठी विलंब होत असल्याने ह्याना निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार करणेस सांगितले.** | | | | | | | |
| १ | साळवी योगेश त्र्यबंक विभाग- लेखाशाखा हुद्दा- मदतनीस | स्वतः | Cancer | डॉ.खांदे | टाटा मेमोरियल, मुंबई व क्युरी मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक | ६७५५४.०० | ५०३८३.०० | ८०% रक्कम देता येईल असे मत आहे. |
| | | | | | | **६७५५४.००** | **५०३८३.००** | |
| | **क) संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले रुग्ण बाहेरगावी असताना निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार करणेस सांगितले.** | | | | | | | |
| १ | अंजिक्यदेव रामचंद्र गायकवाड विभाग- कन्याशाळा हुद्दा- स. शिक्षक | मुलगा | Viral Fever Myositis | डॉ.राजेंद्र गांधी | गांधी चिल्ड्रन हॉस्पिटल, औरंगाबाद | २२४६३.०० | १३७४६.०० | ८०% रक्कम देता येईल असे मत आहे. |
| २ | मंदा संजय थोरात विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- असि.मेट्रन | मुलगी | Accident | डॉ.उबंरकर | डॉ.उबंरकर ॲक्सीडेंट हॉस्पिटल, कोपरगाव | ११००.०० | ८८०.०० | बाहेरगावी असताना अपघात झाला ८०% रक्कम देता येईल असे मत आहे. |
| | | | | | **एकुण रु.-** | **२३५६३.००** | **१४६२६.००** | |
| | | | | **एकुण रक्कम अ + ब + क=** | | **१५०९२४५.००** | **१४३८३५०.००** | |

सदर बीलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छानंनी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु.१४,३८,३५०/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छानंनी केली असून देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील त्यांना देय असलेली रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ओ.टी.चे अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झालेले आहेत. सदरचे लिनन रोजच्या वापरामुळे खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक २७/१०/२०१५ नि.क्र.४०० अन्वये रु.३,८४,५२१/-(तीन लाख चौ-यांऐंशी हजार पाचशे एकवीस मात्र) इतक्या रकमेचे लिनन जाळुन नष्ट केलेले असुन, त्यानंतर दि.०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.५,५२,५०२/- (अक्षरी रु.पाच लाख बावन्न हजार पाचशे दोन मात्र) इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्याव खराब अवस्थेत असल्याने सद्य: परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैदयकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्टकरुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करणे गरजेचे आहे

तरी सदर लिनन हे साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करुन नोंद घेण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा बायोमेडिकल वेस्टेज नियमानुसार नष्ट करणेत येऊन, रजिष्टरमधून निर्लेखित करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५६** **श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जिकल वॉर्ड 1 व श्री साईबाबा रुग्णालयातील CRU II या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जिकल वॉर्ड I या विभागाने दि.१२/०४/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये Multiparameter Monitor एक नगाची मागणी केलेली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील CRU II या विभागाने दि.२१/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये Multiparameter Monitor दोन नगाची मागणी केलेली आहे.

सध्या दोन्हीही विभागामध्ये Multiparameter Monitor असून सर्व मॉनीटर व्यवस्थित कार्यान्वित आहेत, परंतु रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे सदरहू विभागांनीMultiparameter Monitor ची मागणी केलेली आहे.

उपरोक्त दोन्हीही विभागासाठी एकुण तीन नग Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु.३,००,०००/- याप्रमाणे रक्कम रु.९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>**मागणी**</u>– श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जिकल वॉर्ड I या विभागाने दि.१२/०४/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.१४/०४/२०१६) मागणी केलेली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील CRU II या विभागाने दि.२१/०१/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०१/०२/२०१६) मागणी केलेली आहे.

<u>**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**</u> १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

<u>**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**</u> श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जिकल वॉर्ड I व श्री साईबाबा रुग्णालयातील CRU II या दोन्हीही विभागामध्ये सध्या Multiparameter Monitor असून सर्व मॉनीटर व्यवस्थित कार्यान्वित आहेत, परंतु रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे सदरहू विभागांनी Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येतील.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जिकल वॉर्ड I या विभागाकरीता एक नग व श्री साईबाबा रुग्णालयातील CRU II या विभागाकरीता दोन नग असे एकुण तीन नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.९,००,०००/- (अक्षरी रु.नऊ लाख मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील सर्जिकल वॉर्ड I या विभागाकरीता ०१ नग व श्री साईबाबा रुग्णालयातील CRU II या विभागाकरीता ०२ नग असे एकुण ०३ नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५७** **श्री साईनाथ विभागातील Dental विभागाकरीता RVG X-ray Machine खरेदी करुन जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील Dental या विभागाने दि.०६/०४/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये RVG X-ray Machine १ नगाची मागणी केलेली आहे.

Dental विभागामध्ये सध्या एक Suz-Dent (India) Pvt.Ltd., या कंपनीचे Apexia Digirex या मॉडेलचे मशिन असून ते सन २०१४ मध्ये रक्कम रु.१,३५,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. रुग्णांचे दातांच्या विकाराचे निदान अचुक होण्यासाठी सदर मशिनचा उपयोग होतो. सदर मशिनव्दारे दातांचा X-ray काढल्यानंतर तो संगणकावर बघता येऊ शकतो, त्यामुळे X-ray काढल्यावर Film Develop करण्याची आवश्यकता नसते. सदरहू मशिनचा Sensor खराब झाल्यामुळे सध्या मशिन कार्यान्वित नाही. त्यामुळे Dental विभागाने नविन मशिनची मागणी केलेली आहे, तसेच बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन RVG X-ray Machine खरेदी करणेबाबत शिफारस केलेली असून नविन मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१,३६,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख छत्तीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.७५,९३७/- इतकी येत आहे.

<u>**मागणी**</u>– श्री साईनाथ रुग्णालयातील Dental या विभागाने दि.०६/०४/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१४/०४/२०१६) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान.-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्यरु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) जुन्या RVG X-ray Machine ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.७५,९३७/- इतकी येत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं. १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** Dental विभागामध्ये सध्या मशिनचा Sensor खराब झाल्यामुळे सध्या मशिन कार्यान्वित नाही. त्यामुळे Dental विभागाने नविन मशिनची मागणी केलेली आहे, तसेच बायोमेडीकल विभागाने जुने मशिन बायबॅक करुन नविन RVG X-ray Machine खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे, त्यामुळे जुने मशिन परत करुन नविन मशिन विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.७५,९३७/- इतकी येत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील Dental विभागाकरीता जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करुन नविन RVG X-ray Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.१,३६,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख छत्तीस हजार मात्र) चे खर्चास तसेच जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करुन नविन RVG X-ray Machine खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाच्या Dental विभागातील जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करुन नविन RVG X-ray Machine विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.१,३६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच जुने RVG X-ray Machine परत (Buyback) करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५८** **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदी करुन जुना 10 KVA UPS without battery परत (Buyback) करणेबाबत.**

**निर्णय क्र.५०३** व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेमध्ये हॉस्पिटल उपसमिती गठीत करणेत येऊन, त्या समितीसमोर सदरहू विषय सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५९** **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Anaesthesia Machine with Ventilator खरेदी करुन जुने Boyles Anaesthesia Machine (L & T) परत (Buyback) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाने दि.०२/०२/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये Anaesthesia Machine with Ventilator (Capable of Adult and Paediatric Ventilation) १ नगाची मागणी केलेली आहे.

कॅथलॅब विभागामध्ये सध्या एक Boyles Anaesthesia Machine उपलब्ध असून ते सन २००५ मध्ये रक्कम रु.१,९०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनचा उपयोग भुल देण्याकरीता व शस्त्रक्रिया करताना कृत्रिम श्वासोच्छवास देण्याकरीता केला जातो. सदरहू मशिन व्यवस्थित कार्यान्वित आहे, परंतु ते व्हेन्टीलेटरसह नाही, त्यामुळे त्यांनी Anaesthesia Machine with Ventilator (Capable of Adult and Paediatric Ventilation) ची मागणी केलेली आहे. नविन मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चाची माहिती घेणेकरीता मे. ग्लोबल मेडीकेअर यांचेकडून सदर मागणी केलेल्या मशिन्सचे अंदाजे किंमतीचे दरपत्रक मागविले होते, त्यानुसार त्यांनी दिलेल्या दि.११/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये रक्कम रु.९,४५,०००/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लाख पंचेचाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.८०२४.६८ इतकी आहे. तसेच बायोमेडीकल विभागाने जुने L&T कंपनीचे मशिन बायबॅक करुन नविन Boyles Anaesthesia Machine with Ventilator मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे.

**मागणी** – श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाने दि.०२/०२/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०४/०३/२०१६) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्यरु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधितविभागांना रु५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) जुन्या Boyles Anaesthesia Machine ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु.८०२४.६८ इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** कॅथलॅब विभागामध्ये सध्या केवळ एक L&T कंपनीचे Boyles Anaesthesia Machine उपलब्ध आहे. सदर मशिनव्दारे रुग्णांना शस्त्रक्रिया चालु असताना फक्त भुल दिली जाते. परंतु काही वेळेस काही रुग्णांना शस्त्रक्रिया करताना कृत्रिम श्वासच्छोवास देणे आवश्यक असते. त्यासाठी Ventilator उपलब्ध नाही. तसेच सध्याचे मशिन १० वर्ष पुर्व खरेदी केलेले असून सदर मशिनमध्ये त्यावेळचे तंत्रज्ञान उपलब्ध असून आजपावेतो त्यात अनेक सुधारणा झालेल्या आहेत. त्यामुळे सदर जुने मशिन बदलून नविन मशिन खरेदी करण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे. तसेच जुन्यामशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.८०२४.६८ इतकी आहे, म्हणजेच सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाकरीता जुने L&T कंपनीचे Boyles Anaesthesia Machine परत (Buyback) करुन नविन Boyles Anaesthesia Machine with Ventilator विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.९,४५,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख पंचेचाळीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कॅथलॅब विभागामधील जुने L&T कंपनीचे Boyles Anaesthesia मशिन परत (Buyback) करुन नविन Boyles Anaesthesia Machine with Ventilator मशिन विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.९,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड/ विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. विविध वॉर्ड/ विभागांनी मागणी केलेल्या फर्निचरचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५,५५,२००/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार दोनशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु.५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदारविभागांना मुभा देण्यात आली आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-</u>** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वॉर्ड / विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. त्यामुळे वॉर्ड / विभागाचे मागणीप्रमाणे हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.५,५५,२००/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार दोनशे मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागांसाठी आवश्यक असलेले विविध प्रकारचे हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु.५,५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६१** **तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत. (माहे नोव्हेंबर-२०१५)**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं:-**

१) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००६ निर्णय क्रं. ३४८ नुसार वैद्यकीय संचालक यांना दरमहारु. १,००,०००/- पर्यत तातडीचे औषध खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्रं.७५९ (२८-८) अन्वये वैद्यकीय संचालक यांनी त्याचे अधिकारात तातडीचे खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार दरमहा तातडीने औषध / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येते.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०३/२००९ निर्णय क्रं. २५४ अन्वये वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु.१,५०,०००/- पर्यत तातडीचे औषध खरेदी करुन बिले अदा करणेत यावी व रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याचे खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवावे असे ठरले.

४) मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १७/०४/२०१३ निर्णय क्रं. ३४१ अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत आंतररूग्ण विभागात उपचार घेणा-या रुग्णांसाठी उपलब्ध नसलेली औषधे संस्थान मार्फत स्थानिक विक्रेत्याकडून खरेदी करुन द्यावे असे ठरले आहे.

५) मा.त्रिसदस्य समिती सभा दि. ०९/१२/२०१४ निर्णय क्रं१०२१ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक यांना असलेल्या दरमहा तातडीने औषध /सर्जिकल साहित्य खरेदीस रक्कम रु १,५०,०००/- मात्र ऐवजी रु.३,००,०००/- मात्र करणेस मान्यता देण्यात आली.

<u>प्रस्ताविक</u>**:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, प्रयोगशाळा विभाग इत्यादी विभागाकरीता सर्जिकल मटेरियल, औषधे, केमिकल्स इ. तातडीने आवश्यकता होती. सदर मटेरियल औरंगाबाद, संगमनेर, कोपरगाव, श्रीरामपूर व लोणी येथून खरेदी केलेली आहेत सदर औषधे / केमिकल्स / सर्जिकल साहित्य आपणाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तातडीने खरेदी करणे गरजेचे होते. त्यासाठी एकूण रक्कम रु. ७४,१४१.०० (अक्षरी रुपये– चौ-याहत्तर हजार एकशे एकेचाळीस मात्र) इतका खर्च आलेला आहे. सदरची खरेदी ही माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये करण्यात आलेली आहे. सदरची खरेदी ही वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु ३,००,०००/- मात्र इतक्या तरतुदी व्यतिरिक्त रक्कम रु. ७४,१४१.०० (अक्षरी रुपये – चौ-याहत्तर हजार एकशे एकेचाळीस मात्र) इतक्या रक्कमेची आता पर्यत खरेदी झालेली आहे.

**मागणी:-**

| Sr. No. | Name of Party | Bill No. | Date | Amt. in Rs. | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Siddhi Medical Distributors., Aurangabad | 4529 | 17/011/2015 | 13100.00 | Blood Bank |
| 2 | M/s. Karwa Agencies, Sangamner | 16980 | 28/11/2015 | 12926.00 | Sainath Sub Store |
| 3 | M/s. Life Line Surgiacals, Kopargoan | 1611 | 25/11/2015 | 4830.00 | Saibaba Hospital |
| 4 | M/s. Surgilink, Shrirampur | 547 | 19/11/2015 | 20737.00 | Saibaba Hospital |
| 5 | M/s. Milan Enterprises, Ahmednagar | 2814 | 07/11/2015 | 7200.00 | Saibaba Hospital |
| 6 | M/s. Saitrons Medical Equipment, Loni | 78 | 10/11/2015 | 700.00 | All Wards |
| 7 | M/s. Kaivalyam Medical, Shrirampur | 1426 | 10/11/2015 | 14648.00 | Saibaba Hospital |
| **Total Amt. In Rs.** | | | | **74141.00** | |

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी,शासन निर्देश,तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्रं.१७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे.त्यानुसार संस्थान तर्फे दोन धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत -</u>** राजीव गांधी योजने अंतर्गत असलेल्या रुग्णांना लागणारी सर्व औषधे संस्थान रुग्णालयातून पुरवली जातात त्यांना बाहेरील औषध दुकानातून औषधे लिहून दिली जात नाही तसेच तातडीच्या प्रसंगी उपलब्ध नसलेली औषधे देखील स्थनिक विक्रेत्याकडून खरेदी करावी लागतात. त्यानुसार सदर खरेदी कलेली असून बिले अदा करावयाची आहे.

उपरोक्त प्रस्तावात तातडीने केलेल्या खरेदीची व खर्चाची नोंद घेणेकामीचे प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.५०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये औषधांची तातडीने केलेल्या खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.६२ **श्री योगीराज सदगुरु गंगागिरी महाराज १६९ वा अखंड हरिनाम सप्ताह निमित्त श्री साईबाबा संस्थान रुग्णालये मार्फत दि.०८/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१६ अखेर मोफत फिरते वैद्यकीय पथक पाठविणे बाबत.**

प्रस्ताव- मा.अध्यक्ष, सदगुरु योगिराज गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्तह १६९ वा, यांनी जावक क्रमांक७०४/२०१६ दि.१५/०५/२०१६ पत्रान्वये दिनाक ०८/०८/२०१६ ते दिनांक १५/०८/२०१६ अखेर खंडोबाचे माळ, तांदुळनेर, ता.राहुरी, जि.अहमदनगर येथे आयोजित करणेचे नियोजन आहे. श्री योगिराज सदगुरु गंगागिरी महाराज यांचे सप्ताहासाठी परिसरातील तसेच परिसरा बाहेरील भाविक मोठया संख्येने उपस्थित राहणार आहेत. करिता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी कडून सप्ताह काळात भक्ताचे सेवेसाठी सात दिवस वैद्यकीय पथक व औषधांची व्यवस्था करणेस सोबतच्या पत्राव्दारे अखंड हरिनाम सप्ताह कमिटीचे अध्यक्ष यांनी विनंती केलेली आहे

श्रीसाईबाबा हयात असतांना, समकालीन श्री योगीराज सदगुरु गंगगिरी महाराज यांचा बाबांशी कसा संबंध आहे हे श्री साई सत्त चरित्रात अध्याय क्र.०५ मधील पान नं. ५७ व ५८ वर खालील प्रमाणे उल्लेख आहे.

***ओवी क्र.३५ तैसेची एक गंगागिर | महाप्रसिध्द वैष्णववीर | गृहास्थाश्रमी पुणतांबेकर | शिरडीस वरचेवर आगमन ||३६|| आरंभी साई विहीरीवरी | उभय हस्ती मातीच्या घागरी | पाणी वाही देखोनि अंतरी | आश्चर्य करीत गंगागीर ||३७|| ऐसी ही साईची दृष्टादृष्ट | होतांचि बुवा वदले तैं स्फष्ट | धन्य शिरडीचे भाग्य वरिष्ठ | जोडलें श्रेष्ठ हें रत्न ||३८|| हा आज खादां पाणी वाही | परी ही मुर्ति सामान्य नाहीं | होतें या भुमीचें पुण्य कांही | तरीच ये ठायीं पातली ||***

श्री योगिराज सदगुरु गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्तह हा उपक्रम अतिशय चांगला असून सप्ताहाची फार जुनी परंपरा आहे सदर सप्ताह काळात लहान, थोर, तरुण व वयोवृध्द भाविकांची मोठया संख्येने गर्दी होत असते. त्यामुळे सदर ठिकाणी वैद्यकीय सुविधांची उपलब्धता असणे अत्यंत गरजेची बाब आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातर्फे दैनंदिन रुग्णालयातील सेवांव्यतिरिक्त प्रथमोपचार केंद्र, फिरते वैद्यकीय पथक, वृध्दश्रमातील रुग्णांना भेटी, उत्सव काळात पालखी मार्गावर मोबाईल सेवा तसेच साई आश्रम, भक्तनिवास व श्री साई प्रसादालय परिसरात प्रथमोपचार केंद्र अशा प्रकारच्या वैद्यकीय सुविधा देण्यात येतात.

करिता, श्री साईनाथ रुग्णालय मार्फत सप्ताह काळात सात दिवस मोफत फिरते पथक पाठविणेस हरकत नाही, असे रुग्णालय प्रशासनाचे मत आहे. परंतु, सध्या प्रत्येक आठवडयातील चार दिवस शिरडी परिसरातील १६ गावांमध्ये मोफत फिरते वैद्यकीय पथक पाठविले जात असून, उत्सव कालावधीमध्ये सदरचे फिरते वैद्यकीय पथक बंद ठेवण्यात येत असते. उपरोक्त कालावधीत शिरडी परिसरातील १६ गावांमध्ये फिरते वैद्यकीय पथक न पाठवता, श्री योगिराज सदगुरु गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्तह येथे पाठविता येईल, असे मत आहे.

तरी श्री योगिराज सदगुरु गंगागिरी महराज अखंड हरिनाम सप्तह १६९ वा खंडोबाचे माळ, तांदुळनेर ता.राहुरी, जि.अहमदनगर येथे दि.०८/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१६ अखेर सात दिवस श्री साईनाथ रुग्णालय मार्फत मोफत फिरते वैद्यकीय पथक पाठविणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री योगिराज सदगुरु गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह १६९ वा खंडोबाचे माळ, तांदुळनेर ता.राहुरी, जि.अहमदनगर येथे दि.०८/०८/२०१६ ते दि.१५/०८/२०१६ अखेर सात दिवस श्री साईनाथ रुग्णालय मार्फत मोफत फिरते वैद्यकीय पथक पाठविणे बाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन समितीचे मा.अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **<u>पुरग्रस्तांना अन्नपाकीटे पुरविणेबाबत.</u>**

प्रस्ताव- दि.03/08/2016 ते 07/08/2016 अखेर नाशिक, घोटी, ईगतपुरी या धरण क्षेत्रामध्ये अतिवृष्टी होवून दारणा, गंगापूर, पालखेड, नांदुर मधमेश्वर या धरणांमधून मोठया प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे गोदावरी नदीला महापुर आलेला होता. प्रामुख्याने शिर्डी परिसरातील गोदावरी नदीला महापुर आल्याने नदी काठचे शहर, गांव, वाडया व वस्त्यांमध्ये महापूराचे पाणी घुसल्याने तेथील रहिवाश्यांवर मोठीआपत्ती निर्माण झाली. त्यामुळे तेथील स्थानिक प्रशासनाने त्यांना सुरक्षित स्थळी हलविले अशावेळी पुरग्रस्तांचा जेवणाचा बिकट प्रश्न निर्माण झालेला असल्याने

मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेशानुसार प्रसादालयातून कोपरगाव पुणतांबा, शिंगवे, डाऊच, मुर्शतपूर, चासनळी, मंजूर, सुरेगांव, कोळगांव थडी, हिंगणी, धारणगांव, कोकमठाण, नेवासा, इ. व इतर पुरग्रस्त भागात अन्नपाकीटे तयार करुन पाठविणेबाबत सुचना दिल्यात. त्यानूसार खालीलप्रमाणे अन्नपाकीटे तयार करुन पाठविण्यात आलेले आहे.

| अ. नं. | अन्नपाकिटे दिले जाणा-या गावाची नांवे | 3/8/16 | 4/8/16 | 5/8/16 | 6/8/16 | 7/8/16 | एकूण विनामुल्य दिलेली पाकीटे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कोपरगांव | 500 | 1060 | 00 | 1000 | 1000 | 2560 |
| 2 | वारी | 250 | 400 | 00 | 00 | 00 | 650 |
| 3 | सडे | 100 | 200 | 00 | 00 | 00 | 300 |
| 4 | जेऊर कुंभारी | 200 | 200 | 00 | 00 | 00 | 400 |
| 5 | मायगांव देवी | 300 | 150 | 00 | 00 | 00 | 450 |
| 6 | मुर्शतपूर | 450 | 250 | 00 | 00 | 00 | 700 |
| 7 | कोळगांव थडी | 200 | 100 | 00 | 00 | 00 | 300 |
| 8 | सुरेगांव | 200 | 100 | 00 | 00 | 00 | 300 |
| 9 | डाऊच बु. | 130 | 200 | 00 | 00 | 00 | 330 |
| 10 | डाऊच खु. | 100 | 250 | 00 | 00 | 00 | 350 |
| 11 | मंजूर | 100 | 100 | 00 | 00 | 00 | 200 |
| 12 | हिंगणी | 00 | 100 | 00 | 00 | 00 | 100 |
| 13 | धारणगांव | 00 | 00 | 00 | 00 | 00 | 00 |
| 14 | चासनळी | 100 | 100 | 00 | 00 | 00 | 200 |
| 15 | कोकमठाण | 500 | 250 | 00 | 00 | 00 | 750 |
| 16 | पुणतांबा | 100 | 00 | 00 | 00 | 00 | 100 |
| 17 | पुणतांबा रस्तापूर | 100 | 00 | 00 | 00 | 00 | 100 |
| 18 | पुणतांबा बनकर वस्ती | 300 | 100 | 00 | 00 | 00 | 400 |
| 19 | पुणतांबा बजरंग वाडी | 00 | 100 | 00 | 00 | 00 | 100 |
| 20 | शिंगवे | 300 | 200 | 00 | 00 | 00 | 500 |
| 21 | बक्तरपूर | 00 | 50 | 00 | 00 | 00 | 50 |
| 22 | मायगांव देशमुख | 200 | 00 | 00 | 00 | 00 | 200 |
| 23 | कांचनवाडी | 150 | 00 | 00 | 00 | 00 | 150 |
| 24 | नेवासा | 00 | 1200 | 1500 | 1500 | 00 | 4200 |
| | **एकूण अन्नपाकीटे** | **4280** | **5110** | **1500** | **2500** | **1000** | **14390** |

दिनांक 03/08/2016 ते 07/08/2016 अखेर वरीलप्रमाणे एकूण अन्नपाकीटे पुरविलेले आहेत. आपणास अन्नपाकीट बनविण्यासाठी एका पाकीटास मजुरीसह सरासरी रु.13.29/- पर्यंत खर्च येतो. मात्र साईभक्तांस विक्री करतांना रु.5/- प्रमाणे विक्री करतो. वरील बनविलेल्या अन्नपाकीटाचा खर्च जमा नांवे करतांना अन्नपाकीट बनविणेसाठी पडणा-या किंमतीनूसार रक्कम जमा नांवे करणे योग्य राहील.

1) विनामुल्य पुरविलेली अन्नपाकीटे 14,390 x 13.29/- = 1,77,953.10
2) प्लास्टीक बारदान गोणी 240 x 5/- = 1,200.00 (अन्नपाकीटे पॅकींगसाठी)
3) वाहतूक खर्च = 6,314.00

एकूण रक्कम रु. = 1,98,757.10
पुर्णांकित रक्कम रु. = 1,98,757/-

पुरग्रस्तावर आलेली नैसर्गिक संकटसमयी देण्यात आलेल्या अन्नपाकीटासाठी खर्च झालेली रक्कम रु.1,98,757/- (रु.एक लाख अठ्ठयान्नव हजार सातशे सत्तावन्न मात्र) ही रक्कम आपत्कालीन बाब म्हणून अन्नपाकीटे पुरविण्यास मा.व्यवस्थापन सभेची कार्योत्तर मान्यता घेणे गरजेचे आहे. कार्योत्तर मान्यतेने वरीलप्रमाणे खर्च झालेली रक्कम प्रसादालयाचे अंदाजपत्रकातील आपत्कालीन (ग्रँट इन एड) खातेमध्ये वर्ग करणेस मान्यता असावी.

तसेच भविष्यात अशी आपत्कालीन परिस्थिती उद्धवल्यास मा.अध्यक्ष साहेब व उपाध्यक्ष साहेब यांचे सुचनेवरून मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने मदत करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

तरी वरीलप्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.५०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गोदावरी नदीला महापुर आल्याने नदी काठचे शहर, गांव, वाडया व वस्त्यांमध्ये महापूराचे पाणी घुसल्याने तेथील रहिवाश्यांवर मोठी आपत्ती निर्माण झालेली असल्यामुळे त्यांना नैसर्गिक संकटसमयी संस्थानमार्फत देण्यात आलेल्या अन्नपाकीटास व त्याकामी आलेल्या रु.१,९८,७५७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच भविष्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वरिष्ठांच्या सुचनेनुसार संस्थानमार्फत मोफत अन्नपाकिटे उपलब्ध करुन देण्यात यावी, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.५०९** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**(१)** पोलिस विभागाकडून एक गोपनीय पत्र प्राप्त झालेले असून सदर पत्रामध्ये रेल्वे स्टेशन, न्यायालये, देवस्थाने (शिर्डी साईबाबा) बॉम्ब स्फोटाद्वारे उडवून देणेची धमकी देणेत आलेली आहे साईभक्तांच्या व मंदिर सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून धमकी पत्राचे अनुषंगाने काही अनुचित प्रकार घडू नये याकरीता सदरहू बाब तात्काळ मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचे निदर्शनास आणून द्यावी व श्री साईबाबा मंदिर सुरक्षिततेकरिता फोर्स वन अथवा तत्सम दर्जाची प्रशिक्षीत सुरक्षा मिळणेबाबत लेखी पत्र देण्यात यावे. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**(२)** तिरुपती देवस्थानला माहिती अधिकार कायदा लागू नाही, तसेच ज्या संस्थांनासरकारकडून आर्थिक मदत मिळत नाही, अशा संस्थांनामाहिती अधिकार बंधनकारक नाही, अशी माहिती सभेस मिळाली. याबाबत मा.सुप्रिम कोर्टाचा आदेशाच्या आधारे महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येऊन, माहितीचा अधिकार- २००५ या कायद्यामधून श्री साईबाबा संस्थानला वगळणेसाठीचा तौलानिक प्रस्ताव सभेसमोर सादर करावा. (कार्यवाही- माहिती अधिकार कक्ष)

---

**(३)** संस्थानमधील वेगवेगळया कामांसाठी/ खरेदीसाठी वेळोवेळी प्रसिध्द होणाऱ्या जाहिराती शासकीय दराने देण्यात येत आहेत, त्यामुळे पुरवठादार/ ठेकेदार तसेच रिक्त पदे भरणेसाठी योग्य उमेवार यांचेकडून प्रतिसाद मिळत नाही. याकरीता सदरहू जाहिराती देशपातळीवरील नामांकित वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**(४)** संस्थान व संस्थान परिसरामधील ज्या ठिकाणी जुने बल्ब/ टयुब्स आहेत, अशा सर्व ठिकाणी नवीन एलईडी बल्ब बसविणेचा प्रस्ताव तात्काळ सभेसमोर सादर करण्यात यावा. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**(५)** सोलर रेडियेशन तपासून संस्थान मिळकतीवर (जमिनीवर) सोलर सिस्टीम बसविणेबाबतचा तौलानिक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ मेकॅनिकल विभागप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख)

---

**(६)** संस्थान रुग्णालयांसाठी औषधे खरेदी करणेसाठी All Over India जाहिरात प्रसिध्द करणेत यावी. तसेच रुग्णालयामधील सर्व रिक्त पदे भरणेसाठी व संस्थानचे मेडिकल कॉलेज सुरु करणेसाठीचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(७)** श्री साईप्रसादालयामधील प्रसाद भोजन व कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या अन्नपाकिटामधील प्रसादाच्या दर्जामध्ये सुधारणा करणेत यावी.
(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**(८)** राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून संस्थान कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबीतांचा मेडिकल विमा उतरवणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(९)** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचऱ्याचे पुन:प्रक्रिया करणेसाठी शासनास पत्रव्यवहार करावा.
(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**(१०)** संस्थानमधील सर्व डेडस्टॉकला बारकोड करुन घेण्यात यावा.
(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**(११)** यापुढे संस्थानममधील प्रसादालय, रुग्णालये तसेच सर्व निवासस्थानांसाठी यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग संबंधीत कामांसाठी एकाच वेळी एकत्र ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. त्यामुळे नामांकित कंपन्याची सेवा मिळेल.
(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ प्रसादालय विभागप्रमुख/ सर्व निवासस्थाने)

---

**(१२)** यापुढे कोणत्याही खरेदीसाठी कमीत-कमी ०३ कोटेशन/ निविदा/ ई-निविदा असतील तरच त्या उघडण्यात याव्यात, तिसऱ्यांदाची निविदा प्रक्रिया असेल तरीही.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ प्र.अधिक्षक, खरेदी विभाग, प्रकाशने / वैद्यकिय संचालक/ बांधकाम, विद्युत, मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**(१३)** नगर-मनमाड रस्त्यावरील वाहनांची रहदारी कमी होणेसाठी श्री.अमोल तांबे, अधिक्षक, रस्ते वाहतुक, महाराष्ट्र शासन यांचेशी पत्रव्यवहार करणेत येऊन, क्राऊड/ ट्रॉफीक मॅनेजमेंटबाबत त्यांचेकडून अभिप्राय घेण्यात यावा.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**(१४)** संस्थान मालकीच्या भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या जागा/ गाळे यांच्या करारनाम्याच्या मुदती व जागा भाडे याबाबतचा आढावा घेण्यात यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

वरील निर्णय क्र.४४६ ते ५०९ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (बाजीराव शिंदे) | (चंद्रशेखर कदम) |
| कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**